|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : १३ अंक : ११ सोमवार दि. २४ मार्च २०२५ ते रविवार दि. ३० मार्च २०२५ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ संभाजीनगर ■ लातूर ■ धाराशिव ■ सोलापूर ■ नांदेड


## अल्पवयीन मुलीची छेड काढून चुकला फेरीवाला म्हातारा जीवाला मुकला

वसई/क्राईम रिपोर्टर

आजकाल लोक इतके लंपट झाले आहेत कि त्यांना आपल्या वयाचाही विसर पडत चालला आहे. त्यातूनच काही लोक आपल्या मुलीच्या वयाच्या मुलींची छेडछाड करतात. अशाच एका इसमाला त्याच्या चुकीच्या कृत्याची शिक्षा मिळाली. पोलीस तपासात उघडकीस आलेल्या माहितीनुसार बोरीवली येथे राहणारा किशोर मिश्रा हा फेरीवाला एका मुलीची छेडछाड करायचा. अखेर तिने आपल्या मित्राच्या मदतीने किशोर मिश्रा याचा काटा काढला. ...पान २ वर

# वांझपणाने पत्नीला आयुष्यभर रडवले पतीला ठार मारुन तिने हौदात बुडवले

लासूर/क्राईम रिपोर्टर

संसारवेलीवर फुललेले फूल म्हणजे पती-पत्नीच्या नात्याला अनंत काळासाठी जोडून ठेवणारा एक मधुर आणि तितकाच मजबूत धागा असतो. पती-पत्नीमध्ये कितीही वाद झाले तरी मुलासाठी त्या दोघानां एकत्र रहावेच लागते. त्यामुळे लग्नानंतर प्रत्येक दांपत्याला मुल होण्याची प्रतीक्षा असते. काही लोकांनी भलेही फॅमिली प्लॅनिंग केलेला असला तरी मुलाशिवाय संसाराला परिपूर्णता लाभत नाही ही भावना प्रत्येकाच्या मनात असते. खास करून महिलांना तर मातृत्वाची ओढ लागलेली असते. त्यांच्यासाठी आई होण्याचे सुख हे इतर सर्व सुखांपेक्षा अधिक आनंद देणारे असते. मातृत्वामुळे स्त्रीत्वाला खऱ्या अर्थाने पूर्णत्व येते, अशी भावना महिलांमध्ये असते. आणि ती खरीच आहे. पण जगातल्या सगळ्याच महिलांच्या नशिबी हे सुख नसते. त्यामुळे अर्थातच त्या दुखी असतात. कारण समाजाकडून कुटुंबातील लोकांकडून त्यांच्या वाट्याला जे उपेक्षेचे दुःख येते, त्या दुःखाने अपत्यहीन महिला अक्षरशः कोलमडून जातात. अशा महिलांना वांझोटी म्हणून समाजाकडून जे हिणवले जाते. त्याचे दुःख मरणा इतकेच भयंकर असते. अर्थात मुल न होण्यामागे अनेक करणे असतात. ज्यामध्ये कधी पतीमध्ये तर कधी पत्नीमध्ये शारीरिक दोष असतो किंवा शरीर संबंधाच्यावेळी दोघांमधेही उत्कट भावना नसणे. केवळ नावापुरते शरीर संबंध होणे. या सगळ्या गोष्टी मुल न होण्याची करणे आहेत. सुदैवाने आजकाल तंत्रज्ञान इतके पुढे गेले आहे कि मुलं होण्याचे वय टाळून गेल्यानंतरही टेस्ट ट्यूब बेबी किंवा आयव्हीएफ तंत्रज्ञानाद्वारे गर्भधारणा होऊ शकते. पण त्यासाठी पती पत्नीमध्ये विश्वासाचे नाते आणि एकमेकांना सांभाळून घेण्या इतपत निस्सीम प्रेम असावे लागते. लासूर मधील सेवानिवृत्त शिक्षक पामुसिंग पापिया आणि त्यांच्या पत्नीच्या बाबतीत याच निस्सीम प्रेमाचा आणि विश्वासाचा आभाव होता. त्यामुळे मुल न होण्यामागे दोघांही एकमेकांना दोषी ठरवत होते. त्यातून दोघांमध्ये नेहमी भांडणे व्हायची आणि याच भांडणाला कंटाळून एके रात्री पमुसिंग यांची पत्नी भारती हिने झोपलेल्या पतीच्या डोक्यात दगड घालून त्याची हत्या केली व मृतदेह घरातील पाण्याच्या हौदात बुडवून ठेवला व पतीचा पाय घसरून पाण्याच्या हौदात पडून मृत्यू झाल्याचा बनाव केला. मात्र पोलिसांनी अवघ्या ५ दिवसात या हत्येतील रहस्याचा पर्दाफाश करून भारतीला अटक केली.



अखेर लासूर स्टेशनच्या निवृत्त शिक्षकाच्या खुनाची वाचा फुटली. मुलबाळ होत नाही म्हणून नवऱ्याचा डोक्यात दगड घालून खून केल्याची बायकोने कबुली दिली. शिल्लेगाव पोलीसांनी अवघ्या पाच दिवसात फोडली खुनाला वाचा मनोरुग्न पत्नीला बेड्या ठोकल्या. गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथील डोणगाव रोडवरील हनुमान मंदिर येथील सेवानिवृत्त शिक्षक पमुसिंग छगनसिंगग पपैया (६४) हे दि १३ मार्चला राहत्या घरी पाण्याच्या हौदात पडले व त्यात त्यांचा करून अंत झाला होता. दरम्यान, त्या शिक्षकांचा अपघाती मृत्यू हौदात पडून झाला की खून झाला याबाबत गावात उलटसुलट चर्चेला उधाण आले होते. मात्र, शिल्लेगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सलीम चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक योगेश खटाणे, पो.कॉ. हनुमंत सातपुते, अर्जुन तायडे यांनी निवृत्त शिक्षकाचा खून झाल्याचे उघड केले. अवघ्या पाच दिवसांत हा अपघात नाही तर खून असल्याचे तपासात पुढे आले. खून करून मृतदेह हौदात फेकलासंशयाची सुई मानसिक रुग्ण असलेल्या पत्नीभोवती फिरत होती. ...पान ६ वर

## शेतीच्या हद्दीचा वाद विकोपाला गेला चुलत भावानी सत्यजीतचा खून केला

सांगली/क्राईम रिपोर्टर



शेतीचे वाद सहसा मिटत नाहीत. अगदी न्यायालयाच्या निकाला नंतरही लोक आपली बाजू पुढे रेटण्याचा प्रयत्न करतात. मिरज तालुक्यातील कर्नल येथे दोन चुलत भावांमध्ये शेताच्या हद्दीवरून वाद होता. हा वाद काही केल्या मिटत नव्हता. न्यायालयाने सत्यजितच्या बाजूने निकाल दिल्यानंतर त्याने आपल्या हद्दीत खांब लावायला गेला, पण त्याच वेळी तिथे आलेल्या त्याच्या चुलत भावांनी त्याला विरोध केला. त्यावरून दोघांमध्ये वाद आणि हाणामारी सुरु झाली. यावेळी शुभमने सत्यजीतवर कोयत्याने वार केले. तसेच जखमी सत्यजीतला दगडाने ठेचून ठार मारले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.



सांगली जिल्हयातील मिरज तालुक्यातील कर्नाळ येथे विकास कांबळे हे आपल्या कुटुंबियासह राहयला आहेत. कर्नाळ ते डिग्रज रोडवर त्याची शेत जमीन आहे. त्याच्या शेजारी शैलेश कांबळे यांची शेती असून या दोघांत शेतीच्या हद्दीवरून बऱ्याच वर्षापासून वाद आहे. दोघांच्या मध्ये बांध असला तरी तो बांध माझ्या हद्दीत आहे की तुझ्या हद्दीत आहे यावरून त्याच्यात बऱ्याचदा भांडणे आणि मारामारी ही झाली होती. त्याचा हा वाद पोलीस स्टेशनपर्यत देखील गेलेला होता. तेथे देखील हा वाद मिटला नसल्याने कुणी कोणाचे ऐकायला तयार नाही. त्याचा हा वाद गावातील त्याच्या भावकीने आणि पंचमंडळीनी देखील मिटविण्याचा प्रयत्न केला परंतु त्याच्यासमोर देखील हा वाद मिटला नाही. गेल्या अनेक वर्षापासून हा वाद सतत पेटत राहिला आहे. विकास कांबळे आणि शैलेश कांबळे याची मुले देखील आता मोठी झालेली होती. त्याच्या पिढीत देखील हा वाद धुसमसत होता. विकास कांबळे याचा मुलगा सत्यजीत कांबळे आणि शैलेश कांबळे याची दोन्ही मुले शुभम आणि सोमेश कांबळे याच्यात या कारणातून नेहमी भांडणे होत होती. कागदोपत्री दोघे ही आपली हद्द दाखवित होते परंतु आपली हद्द तुझ्या शेतात सरकली आहे असे म्हणून हद्दीचा वाद वाढवतच होते. दोन तीन वेळा ...पान २ वर

## मुलानेच दिली जन्मदात्याला शिक्षा टेलरनी दाखवली तपासाची दिशा

बुलढाणा/क्राईम रिपोर्टर



दारुडा माणूस जेंव्हा दारूच्या व्यसनात आपले घरदार धनसंपत्ती सर्व काही घालवण्याचा प्रयत्न करीत असतो, त्यावेळी त्याच्या कुटुंबातील लोकांनाच त्याचा काहीतरी बंदोबस्त करावा लागतो. जामोद तालुक्यातील एका गावात राहणाऱ्या अशोक मिसळ याने चारित्र्याच्या संशयावरून बायकोला विहिरीत ढकलून तिचा खून करण्याचा प्रयत्न केला होता, सुदैवाने ती बचावली. त्यानंतर तिने अशोकला कायमचे सोडून आपल्या मुलासह माहेर गाठले. तेंव्हा पासून ती गेली २० वर्ष माहेरी राहत होती. दरम्यान मुलगा मोठा झाल्यावर त्याने बापाकडे त्याचा हिस्सा मागितला. पण बापाने नकार दिला. मात्र दारूच्या व्यसनात तो हळू हळू थोडी थोडी जमीन विकत होता. हे जर असेच चालू राहिले तर आपल्या वाट्याला काहीच शिल्लक राहणार नाही असे अशोकच्या मुलाला वाटत होते आणि याच विचारातून त्याने बापाला कायमचे संपवले. या प्रकरणी पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

अशोक विष्णू मिसाळ याचा विवाह २५ वर्षापूर्वी जामोद ता. जळगाव (जा) येथील सविता (काल्पनिक नाव) हिच्यासोबत समाजाच्या रितीरिवाजाने झाला होता. लग्नानंतर ...पान २ वर

## दोघांमधील ठसन एकाला पडली भारी हेमंतच्या पोटात रोहितने खुपसली सुरी

जळगाव/क्राईम रिपोर्टर



मयत हेमंत

आजकाल आई-वडिलांचा धाक नसल्याने लहान वयातच मुले वाया जातात. त्यांना नको नाको ती व्यसने लागतात. त्यातच हिंसक चित्रपट पाहून मुलांवर भाईगिरीचा प्रभाव पडतो आणि सिनेमातील हिरोची भाईगिरी त्यांच्यात उतरते आणि ते भाईसारखे वागू लागतात. अशा भाईगिरी करणाऱ्याकडे कुणी नजर उचलून पाहिलेले सुद्धा त्यांना सहन होत नाही. रोहित आणि हेमंत या दोन अल्पवयीन मुलांमध्ये अशीच ठसन होती आणि दोघांनीही एकमेकांना बघून घेऊ अशी धमकी दिली होती. एके दिवशी हे दोघे आमने सामने आले आणि त्यांच्यात हाणामारी झाली. यावेळी रोहितने आपल्याकडच्या चाकूने त्याची हत्या केली. या प्रकरणी आरोपीला अटक करण्यात आली आहे.



पीआय पवार

रोहीत गजानन लोणारी आणि हेमंत संजय सोनवणे हे दोघे तरुण पाचोरा शहरातील रहिवासी होते. दोघेही अवघे विस वर्षाचे होते. या वयात दोघांना साधी मिसरुढही फुटलेली नव्हती. कोवळ्या वयातील दोघा तरुणांमधे किरकोळ कारणावरुन धुसफुस सुरु होती. या वादातून हेमंत हा रोहीतकडे रागाने बघत असे. हेमंत आपल्याकडे रागाने बघतो हे रोहीतला आवडत नव्हते. त्यातून हेमंतला एके दिवशी बघूनच घेऊ असे रोहीत मनातल्या मनात म्हणत असे. त्याच्या मनातील हेमंतविषयीचा राग एके दिवशी प्रत्यक्षात आला आणि हिंसक घटना घडली. १९ फेब्रुवारी २०२५ चा दिवस रात्री बारा नंतर सुरु झाला. छत्रपती शिवाजी महाराजांची तिथीप्रमाणे या दिवशी जयंती होती. हा दिवस आपल्या जीवनातील अखेरचा दिवस असेल आणि या दिवसाची पहाट आपण बघणार नाही याची यत्किंचीतही कल्पना हेमंतला नव्हती. छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमीत्त पाचोरा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात मध्यरात्री महाराजांच्या आरतीचे आयोजन करण्यात आले होते. त्याठिकाणी गल्लीतील तिघा मित्रांसह हेमंत सोनवणे हा गेला होता. छत्रपती शिवाजी महाराजांची ...पान २ वर

## पत्नीवरच्या संशयामुळे सुडाने पेटला पोटच्या पोराचा बापानेच जीव घेतला

पुणे/क्राईम रिपोर्टर

आजकाल माणूस शीघ्रकोपी बनला आहे. तसंच त्याचा स्वभाव संशयी झालाय. खास करून पत्नीच्या चारित्र्यावर संशय असलेला माणूस जेव्हा सुडाने पेटलेला असतो तेव्हा त्याच्या हातून काहीही घडू शकते. अशावेळी तो रक्ताची नातीही विसरतो. पुण्यातील मुंढवा भागात पत्नीच्या चारित्र्यावर संशय असलेल्या एका माणसाने पत्नीवरचा राग आपल्या मुलावर काढला आणि साडे तीन वर्षाच्या पोटच्या पोराची हत्या केली.

अलीकडच्या काळात सातत्याने गुन्हेगारी घटनांचा केंद्रबिंदू ठरत असलेल्या पुण्यात आणखी एक धक्कादायक घटना घडली आहे. पुण्यातील खराडी परिसरात वडिलांनी आपल्या साडेतीन वर्षाच्या मुलाचा खून केला आहे. चंदन नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा प्रकार घडला. पती आणि पत्नीमधील वाद विकोपाला गेल्यामुळे संतापलेल्या वडिलांनी हे भयानक कृत्य केल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे चंदन नगर परिसरात एकच खळबळ उडाली आहे. पत्नीशी भांडण झाल्यानंतर नवरा आपल्या मुलाला घेऊन घराबाहेर पडला. पण रात्री उशीरापर्यत दोघे घरी आले नाहीत. त्यामुळे पत्नीने पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यानंतर पोलिसांनी सीसीटीव्ही आणि ऑनलाईन पेमेंटच्या मदतीने मुलाच्या वडिलांना शोधून काढले आणि हा प्रकार समोर आला. शुक्रवारी रात्री अडीच ...पान ६ वर

## दारूच्या व्यसनामुळे मंजुनाथ वाया गेला वडिल आणि भावानेच त्याचा खून केला

कितुर (कर्नाटक)/क्राईम रिपोर्टर



दारुडा माणूस सुधारण्या पलीकडे गेलेला असतो त्यामुळे तो कुटुंबातील लोकांसाठी डोकेदुखी ठरतो. कारण त्याच्या दारूच्या व्यसनाचा सर्वांनाच त्रास होत असतो. चिक्कनंदीहळ्ळी येथे राहणारा नागप्पा याला दोन मुले आहेत. थोरला सैन्यात तर धाकटा गावातच राहत असे. धाकटा मुलगा मंजुनाथ दारुडा असल्याने त्याचे लग्न होत नव्हते. पण याबाबत तो आई वडिलांना दोषी मानून त्यांना शिवीगाळ करीत होता. याच त्रासाला कंटाळून त्याच्या आई-वडिलांनी कसे तरी त्याचे लग्न जुळवले. पण त्यानंतरही तो दारू पिवू लागला. एके रात्री त्याने दारूच्या नशेत बापावर हात उचलला हे सैन्यातून लग्नासाठी परतलेल्या मोठ्या भावाला सहन नाही झाले, त्यानंतर बापलेकांनी दारुड्या मंजुनाथ याला बेदम मारहाण केली. त्यातच मंजुनाथचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी बापलेकाला अटक केली आहे.



कितुर तालुक्यातील चिक्कनंदीहळ्ळी येथे नागाप्पा उळागड्डी हे आपली पत्नी, दोन मुलासह राहयला आहेत. नागाप्पा याची गावातच शेती असून त्या शेतीवरच त्याच्या घरचा उदरनिर्वाह चालत होता. गेल्या चार पाच वर्षापुर्वी त्याचा मोठा मुलगा गुरूबसाप्पा हा सैन्य दलात नोकरीला लागला होता.त्याच्या लग्नाला तीन वर्ष झाली होती. त्याची बायको ही गावातच राहत असल्याने नागाप्पा आणि त्याच्या बायकोला शेती कामात तिची मदत होत होती. नागाप्पा याचा धाकटा मुलगा मंजुनाथ याचे ...पान २ वर

## चोरीचा संशय त्याच्या प्राणावर बेतला बाराशे रुपयांसाठी मजुराचा जीव घेतला

भिवंडी/क्राईम रिपोर्टर

आजकाल पैशांसाठी माणूस कुठल्याही थराला जाऊ शकतो. अशावेळी जर एखादा माणूस संशयित असेल तर त्याच्या डोक्यात जो संशयाचा किडा वळवळत असतो त्याने त्या माणसाच्या मनात सुडाची भावना निर्माण केलेली असते. आणि सुडाने पेटलेला माणूस काहीही करू शकतो. भिवंडीत अवघ्या १२०० रुपयांच्या चोरीच्या संशयातून एका कामगाराची हत्या करण्यात आली.

भिवंडी येथे बाराशे रुपये चोरल्याच्या संशयातून एका मजूराची त्याच्याच दोन सहकाऱ्यांनी लोखंडी वस्तूने मारहाण करुन हत्या केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी नारपोली पोलीस ठाण्यात बैतुल्ला खान आणि अजय या दोघांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.भिवंडी येथील वेहळे गाव भागातील एका मंडप व्यवसायिकाकडे अनिल बृजलाल (३६). बैतुल्ला खान, अजय यांच्यासह पाच ते सहा कामगार रोजंदारीवर कामाला आहेत. मंडप व्यवसायिकाच्या गोदामामध्येच ते राहत होते. होळी आणि धुलिवंदनाच्या निमित्ताने सुट्टी असल्याने अनिल, बैतुल्ला आणि अजय वगळता इतर कामगार बाहेर गेले होते. धुलिवंदनाच्या दिवशी सायंकाळी अनिल याला बेदम मारहाण झाली होती. त्याचा चेहरा सुजलेला होता. याबाबतची माहिती मंडप व्यवसायिकाला मिळाल्यानंतर त्यांनी अनिल याला उपचारासाठी ...पान ६ वर

## दुचाकीच्या वादात होत्याचे नव्हते झाले धाकट्या भावानेच थोरल्याला ठार केले

वास्को (गोवा)/क्राईम रिपोर्टर



एकत्रित कुटुंबात सहसा भावाभावांचे तसेच जावांचेही पटत नाही. अशावेळी ज्याची कमाई जास्त असते त्याचा कुटुंबात दरारा असतो. कर्नाटकातून कामधंद्यासाठी गोव्यात आलेल्या घिवारी कुटुंबात तीन भाऊ आणि त्यांचे आई वडील होते. मोठा श्रीकांत हा जीवरक्षक म्हणून नोकरी करीत असल्याने त्याला पगार जास्त होता. त्याच्याकडे दुचाकी सुद्धा होती. त्याची हीच दुचाकी त्याचा मधला भाऊ मल्लिकार्जुन वापरात असे. एके दिवशी तो सकाळी दुचाकी घेवून गेला तो संध्याकाळी परतला. त्यावरून मोठा भाऊ श्रीकांत भयंकर चिडला आणि याच वादातून दोन भावांमध्ये हाणामारी झाली. यावेळी मल्लिकार्जुन याने घरातील चाकूने मोठा भाऊ श्रीकांतवर वार करून त्याची हत्या केली. या प्रकरणी आरोपी मल्लीकार्जुनला पोलिसांनी अटक केली आहे.

गोव्या सारख्या सधन राज्यात बाहेरील राज्यातून अनेकजण मोलमजुरीसाठी येत असतात. येथे मोलमजुरी करता करता ते कधी इथलेच होऊन जातात हे त्याचे त्यांना समजत नाही. गेल्या १५ ते २० वर्षापूर्वी कर्नाटकातून बसवराज घिवारी आणि त्याची मुले व कुंटूंब हे गोव्यात मोलमजुरीसाठी आले. बसवराज यांचा मोठा मुलगा श्रीकांत दृष्टी या संस्थेत जीवरक्षक म्हणून काम करू लागला. मधला मुलगा मल्लिकअर्जुन हा सुरक्षा रक्षक वाहन चालक अशी कामे करत होता. तर लहान मुलगा महेश हा पेंटर म्हणून काम करीत होता. बसवराज आणि त्याची पत्नी हे दोघे ही आता वयोवृध्द झाल्याने ते कोणते ही कामधंदा करीत नव्हते. घिवारी कुंटूंब हे गोव्यात मोलमजुरीसाठी आल्याने ते गोवा पुनर्वसन मंडळाच्या वसाहतीमध्ये एकत्र कुंटूंब पध्दतीने राहत होते. श्रीकांत याला दृष्टीमध्ये जीवरक्षक म्हणून काम मिळाल्याने त्याला कंपनीकडून वास्को सडा येथे गोवा पुनर्वसन मंडळाच्या वसाहतीमध्ये राहण्यास क्वॉटर मिळालेली होती. घरात तो एकटाच जास्त कमवित असल्याने तो आपल्या ...पान ६ वर

24 TO 30 MARCH 2025 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 3/22/2025 7:34 PM Page 1



पान १ वरून...

## अल्पवयीन मुलीची छेड काढून चुकला...

या प्रकरणी पोलिसांनी त्या मुलीला व तिच्या मित्राला अटक केली आहे. मिसिंग असलेल्या ७५ वर्षीय वयोवृद्धाची एक महिन्यांपूर्वीच हत्या झाल्याचा प्रकार नायगाव पोलिसांनी उघड केला आहे. याप्रकरणी नायगांवच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पोलिसांनी एक मुलगी व एक मुलगा असे दोन अल्पवयीन आरोपींना अटक करून चौकशी व तपासासाठी उत्तन पोलिसांच्या ताब्यात दिल्याची माहिती जनसंपर्क अधिकारी व सपोनि शिवकुमार गायकवाड यांनी सोमवारी दिली. बोरिवलीत राहणारे व फेरीचा व्यवसाय करणारे किशोर मिश्रा (७५) हे घटनेच्या दिवशी नायगांव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील टीवरी रोडवरील सनटेक बिल्डिंगच्या परिसरात आले होते. पण ते त्यानंतर बोरिवली येथील घरी पोहचले नाही. घरच्यांनी नातेवाईक यांच्याकडे त्याचा शोध घेतला पण ते मिळून आला नाही. म्हणून त्यांच्या मुलाने १५ फेब्रुवारीला किशोर मिश्रा हे मिसिंग असल्याची तक्रार दिली. त्याचा तपास पोलीस हवालदार देविदास पाटील यांच्याकडे देण्यात आला. सदर मिसींग मिश्रा यांचा मोबाईल फोन बंद लागत असल्याने काही एक उपयुक्त माहिती मिळत नव्हती. सदर प्रकरणाची गांभीर्याने दखल घेवून नायगांवचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कदम यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे दोन वेगवेगळे पथके बनवून शोध घेण्याच्या सूचना दिल्या. तपासा दरम्यान मिळालेल्या सीसीटीव्ही फुटेज आधारे मिश्रा हे एक मुलीसोबत भाईंदर रेल्वे स्टेशन परिसरात उतरुन बाहेर पडताना दिसले. त्यानंतर मिश्रा व संशयीत मुलगी दिसून न आल्याने तांत्रिक विश्लेषन व माहितीच्या आधारे एक अल्पवयीन मूलगी व एक अल्पवयीन मुलगा यांना ताब्यात घेवून त्यांच्याकडे चौकशी केली. किशोर मिश्रा हे अल्पवयीन मूलीला कामाचे ठिकाणी कायम शिवीगाळी करायचे. त्याच गोष्टीचा राग मनात धरुन उत्तन येथील बालेशाह पीर दर्गाच्या बाजूला असलेल्या सार्वजनिक शौचालयाच्याजवळ दोन्ही अल्पवयीन आरोपींनी त्यांच्या डोक्यात दगड व परशीची लादी टाकुन हत्या करुन त्यांचा मृतदेह बाजूला असणाऱ्या झाडाझुडुपांमध्ये फेकून दिला. उत्तन पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करून दोन्ही आरोपींना त्यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. वरील कामगीरी पोलीस आयुक्त मधुकर पांण्डेय, अपर पोलीस आयुक्त दत्तात्रय शिंदे, पोलीस उपायुक्त पौणिमा चौगुले श्रींगी, सहाय्यक पोलीस आयुक्त नवनाथ घोगरे, नायगावचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक विजय कदम, पोलीस निरीक्षक (गुन्हे) प्रमोद पवार यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि रोशन देवरे व गणेश केकान, पोहवा देविदास पाटील, शेखर पवार, सचिन ओलेकर, सचिन मोहीते, सचिन खंताळ, जयवंत खंडवी, अमर पवार, चेतन ठाकरे, अशोक पाटील, पाडुरंग महाले, अमोल बरडे यांनी केली आहे.

## शेतीच्या हद्दीचा वाद विकोपाला गेला...

कांबळे कुटुंबियांनी मोजणी देखील करून घेतली, परंतु ही मोजणी कोणा एकाच्या मर्जीप्रमाणे झाली की दुसरा त्यात खोडा घालून मला हे मान्य नाही असे म्हणून त्यावर तोडगा काढण्या ऐवजी परत वाद घालत होते. त्यातच विकास कांबळे यांनी हे प्रकरण कोर्टात नेले असल्याने बऱ्याच वर्षानी याचा निकाल त्याच्या बाजूने लागला होता. ते कोर्टाच्या हुकमनाम्याप्रमाणे आपल्या शेतात आपल्या हद्दीबरोबर खांब घालण्याचा विचार करीत होते. तसा विचार त्यांनी मुलगा सत्यजीत याला बोलून दाखविला. त्याला ही हा विचार पटल्याने तो पुढे होऊन आपल्या शेतात आपल्या हद्दीबरोबर खांब लावूया असे त्याने वडिल विकास कांबळे यांना सांगितले. बाप लेकांनी विचार करून शेतात खांब लावण्याचा दिवस ठरविला. इकडे शैलेश कांबळे याची मुले शुभम आणि सोमेश हे दोघे सत्यजीत काय हालचाल करतो याच्यावर ते बारीक लक्ष ठेवून होते. कारण कोर्टाचा निकाल हा त्याच्या मनाप्रमाणे लागला नसल्याने ते थोडे नाराज होते. त्यांना ही कुठून तरी समजले होते की, सत्यजीत हा शेतात हद्दीबरोबर खांब लावणार असून तशा तयारीत तो आहे. त्यामुळे दोघे भाऊ सत्यजीत याला अडविण्याचा विचार करीत होते. कधी तो शेतात खांब लावण्यास येतो आणि आपण त्याला विरोध करतो असे त्यांना झाले आहे. खरे तर कांबळे कुटूंब हे नात्याने सख्ये चुलत भाऊ भाऊ होते. सख्या चुलत भावात शेताच्या हद्दीवरून सारखी भांडणे आणि मारामारी होत होती. कुणीच कोणाचे ऐकायला तयार नसल्याने जो तो माझेच बरोबर आहे असे म्हणत होते. त्यातच दोघांच्या ही कागदपत्रात बरीच तफावत होती. त्यामुळे दोघांनी कागदोपत्रे सुरळीत आणि बरोबर करून घेणे गरजेचे होते. सात बारा पत्रकी एक नोंद तर प्रत्यक्षात जमीन कमी जास्त होत होती, त्यामुळे हा वाद काही केल्या मिटत नव्हता. दोघे ही आपल्याकडील कागदपत्रे बरोबर आहेत असे म्हणत होते. आता विकास कांबळे आणि त्याचा मुलगा सत्यजीत कांबळे यांनी आपल्या हद्दीबरोबर शेतात खांब लावण्याचा विचार केलेला असल्याने ते दोघे बाप लेक आपल्या इतर दोन नातेवाईकासह मंगळवार दि.१८ मार्च २०२५ रोजी संध्याकाळी ४ वाजणेच्या सुमारास आपल्या शेतात खांब लावण्यास गेले. नेमकी याची माहिती शुभम आणि सोमेश कांबळे यांना लागली. त्यांनी तातडीने आपल्या बरोबर नात्यातील स्वराज कांबळे, हणमंत गायकवाड यांना बोलावून घेतले. ते सर्व जण डिग्रज रस्त्याला असणाऱ्या आपल्या शेतात तयारी निशीच गेले. त्यावेळी शेतात सत्यजीत हा आपल्या दोन नातलगासह आपल्या हद्दीबरोबर खांब लावीत होता. हे बघून शुभम आणि सोमेश यांनी त्याला अडवून तु खांब लावू नकोस तु जेथे खांब लावीत आहेस ती शेत जमीन आमच्या मालकीची आहे आमच्या शेतीची ती हद्द आहे. तु आमच्या बाजुला खांब लावून आमच्याकडे सरकू नकोस म्हणत वाद घातला. त्याला जशास तसे उत्तर ही सत्यजीत देत होता. बघता बघता दोघे ही हातघाईवर आले. दोघे ही एकमेकांच्या अंगावर जात होते. सत्यजीतच्या बाजुने त्याचे वडिल विकास आणि लहान भाऊ प्रणव हे होते. तर शुभम याच्याबरोबर सोमेश,हणमंत आणि स्वराज हे होते. दोघे ही आपआपली हद्द दाखवित होते.परंतु कुणी ही मागे सरकायला तयार नव्हते.सत्यजीत याच्या मते मी माझ्या शेताच्या हद्दीत खांब लावीत आहे, तुम्ही कोण मला अडविणार यावर शुभम हा त्याचेवर चिडला त्याला अर्वाच्च भाषेत शिव्या देत त्याला मारायला गेला. सत्यजीत देखील त्याच्या अंगावर जात होता. तु इथे खांब लावायचा नाहीस बघ म्हणत शुभम याने रागाच्या भरात सत्यजीत याच्या डोक्यावर आपल्याकडील कोयत्याने दोन तीन वेळा सपासप वार केले.त्यासरशी सत्यजीत हा रक्ताच्या थारोळयात ओरडत खाली पडला. त्याला सोडवायला म्हणून त्याचे वडिल विकास आणि त्याचा लहान मुलगा प्रणव हे दोघेजण पुढे आले असता स्वराज याने त्यांना अडवत आपल्याकडील काठीने बेदम मारहाण केली. ते ही ओरडत सैरभर पळू लागले. इकडे रक्ताच्या थारोळ्यात खाली पडलेल्या सत्यजीतवर परत शुभम याने कोयत्याने वार करीत थांब तुला आता जीवंतच सोडत नाही म्हणत परत त्याच्या डोक्यात जवलच पडलेला एक मोठा दगड हाणला. कोयत्याने आणि दगडाने केलेल्या मारहाणीत सत्यजीत हा गंभीर रित्या जखमी होऊन पडला. इकडे कांबळे याच्या शेतात कसला आरडा ओरडा चाललेला आहे म्हणून शेजारचे शेतकरी पळत घटनास्थळी आले.त्यावेळी त्यांन पळत येताना बघून शुभम, सोमेश, स्वराज आणि हणमंत हे घटनास्थळावरून पळून गेले. या घटनेत गंभीर रित्या जख्मी असलेल्या सत्यजीत याला खाजगी वाहनाने सांगली सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले. तेथे त्याच्यावर उपचार सुरू असताना गुरूवार पहाटे त्याचा मृत्यु झाला. त्याच्या मृत्युने कांबळे कुटुंबियावर मोठे संकट ओढावले. मयत सत्यजती कांबळे याचे वडिल विकास कांबळे यांनी या घटनेची माहिती सांगली ग्रामीण पोलीस ठाण्याला दिली. या घटनेची माहिती मिळताच सांगली ग्रामीण पोलीस स्टेशनचे पो.निरी.किरण चौगुले सपोनि श्रीमती शिंदे यांनी घटनास्थळी आपल्या सहकार्यासह भेट देऊन घटनेची माहिती घेतली. या घटनेचे माहिती मिळताच घटनास्थळी शहर विभागाचे उपाधिक्षक विमला एम यांनी घटनास्थळी भेट देवून या घटनेची माहिती घेऊन पोलीसांना तपासाच्या योग्य त्या सुचना देवून संशयीत आरोपींना जेरबंद करण्यास सांगितले. या घटनेचा तपास सांगली ग्रामीण पोलीसाबरोबर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस ही करीत होते. स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलीसांना या घटनेतील संशयीत आरोपी शुभम कांबळे आणि सोमेश कांबळे हे दोघेजण कर्नाळ बुधगाव रस्त्यावरील रेल्वे पुलाखाली लपून बसल्याची माहिती मिळताच या पथकाने तेथे सापळा रचून शुभम कांबळे आणि सोमेश कांबळे यांना ताब्यात घेतले. तर दुसऱ्या पथकाला या घटनेतील संशयीत आरोपी स्वराज कांबळे आणि हणमंत गायकवाड हे दोघे सांगली बस स्थानक परिसरात लपले असल्याची माहिती मिळाली. त्यांना ही तेथून ताब्यात घेण्यात आले. या चौघांना ही सांगली ग्रामीण पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले.पोलीसांनी त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्यांनी नाही होय म्हणत आपला गुन्हा कबुल केला. या घटनेची फिर्याद मयत सत्यजीत कांबळे याचे वडिल विकास कांबळे यांनी पोलीसात दिली असल्याने त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी सत्यजीत विकास कांबळे (वय २२) याच्या खून प्रकरणी आणि विकास कांबळे आणि प्रणव कांबळे यांना जबर मारहाण करून गंभीर रित्या जख्मी केल्या प्रकरणी शुभम शैलेश कांबळे (वय २४) सोमेश शैलेश कांबळे (वय १९) स्वराज उर्फ कुणाल बाळासाहेब कांबळे (वय २१) रा.सर्व जण कर्नाळ आणि हणमंत दिंगबर गायकवाड (वय १८) रा.समर्थ कॉलनी सांगली याच्या विरोधात भा.दं.वी.कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. या सर्वांना पोलीसांनी सांगली येथील प्रथमवर्ग न्यायालयात उभे केले असता मा.न्यायालयाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी शुभम कांबळे याच्याकडून गुन्हयात वापरलेला कोयता जप्त केला तर स्वराज कांबळे याच्याकडून काठी जप्त केली.या घटनेचा तपास पो.निरी.किरण चौगुले, स.पो.नी. श्रीमती शिंदे, उप निरीक्षक सोनकांबळे,कर्मचारी मेघराज रूपनर, नितीन पाटील, महेश जाधव, मनोज निळकंठ,बंडू पवार, अभिजीत पाटील, रणजीत घार्गे यांनी केला.

## मुलानेच दिली जन्मदात्याला शिक्षा...

काही दिवस खूप आनंदी गेले. अशोक आणि सविताच्या संसारवेलीवर प्रमोद उर्फ शुभम नावाचे फुलहीउमलते. मुलाचा जन्म झाल्यावर अशोक हा पत्नी सवितास शारीरिक व मानसिक त्रास देऊन मारहाण करू लागला. नवऱ्यामध्ये आज नाही तर उद्या सुधारणा होईल या आशेवर सविता सासरी रहात होती, मात्र एक दिवस अशोकने पत्नी सवितास जीवे मारण्याच्या उद्देशाने विहिरीत ढकलले. गावकऱ्यांनी धावाधाव करून तिला विहीरीतून बाहेर काढले. दैव बलवत्तर म्हणून सविताचा जीव वाचला. पण तिने दीड वर्षाचा प्रमोद उर्फ शुभम यास कडेवर घेऊन कायमचे माहेर जामोद गाठले. सविता हिने तेव्हापासून काबाडकष्ट करून प्रमोद उर्फ शुभमचा सांभाळ केला. पण अशोकला पत्नी आणि मुलाचे कोणतेही सोयरसुतक नव्हते. तो एकटा जीव सदाशिवप्रमाणे आपल्या गावी दानापूर येथे रहात होता. त्यानंतर २० वर्षाचा मोठा कालखंड लोटला. चिमुकला प्रमोद उर्फ शुभम आता तरुण झाला होता. मोलमजुरी व दुकानावर काम करून चरितार्थ चालवत होता. त्याला स्वतःच्या हक्काची जाणीव झाली होती. बापाने लहानपणापासून आपल्या आईला आणि आपल्याला दुर्लक्षित केले हे त्याच्या मनात ठासून भरले होते. अशोककडे शेती व गावात प्लॉट होते, त्यातील थोडी-थोडी शेती आणि एक-एक प्लॉट विकून अशोक चैन करू लागला. हे असेच सुरू राहिले तर बाप आपल्यासाठी काहीच ठेवणार नाही म्हणून प्रमोद उर्फ शुभमने आपले गाव गाठले. उर्वरित शेती व प्लॉट आपल्या नावावर करण्याची बापास विनंती केली, पण बाप अशोक काही ऐकत नसल्याने त्या दोघा बाप-लेकामध्ये चांगलीच खडाजंगी झाली. बाप ऐकत नसल्याने प्रमोदने रागातच जामोद गाठले. बाप असाच प्रॉपर्टी विकत राहिला तर आपल्याला काहीच ठेवणार नाही, म्हणून बापालाच संपवला पाहिजे. तो संपला तर वारसआपणच आहोत असा विचार करत प्रमोदने बापाची हत्या करण्याचा निश्चय केला. त्याने गावातील 'त्याचा जीवलग मित्र राहुल दाते यास सहकार्य करण्याची विनंती केली. संध्याकाळी प्रमोद उर्फ शुभम दानापूर येथे गेला. रात्री जेवण करून दोघे बाप-लेक झोपी गेले. रात्रीचे ११ वाजता प्रमोद उर्फ शुभम याने मित्र राहुल यास बोलावून घेतले. मध्यरात्री १२ वाजता दरम्यान राहुल दानापूर येथे मिसाळच्या घरी पोहचला. अशोक मिसाळ गाढ झोपेत होता. राहुल आणि प्रमोद यांनी अशोक मिसाळला विजेचा शॉक देऊन संपवण्याचे ठरवले. एक वायर घेऊन ती एक लोखंडी विळ्यास बांधली. त्या विळ्याची मूठ हातात घेऊन प्लग चालू करून विळा अशोकच्या अंगास लावला. या झटक्याने हादरून अशोक उठला. भांबावलेल्या अशोकने राहुल आणि प्रमोद या दोघांना समोर पाहिले. त्या दोघांचा अवतार पहाताच त्याच्या लक्षात आले की हे दोघे आपल्याला संपवतील. अशोकने ओरडण्याचा प्रयत्न केला, मात्र त्याचा पुत्र प्रमोद त्याच्या छातीवर बसला आणि जवळच पडलेला एक रूमाल घेऊन त्याने बापाचा गळा आवळला. टाचा घासत-घासत काही वेळात अशोक निपचित पडला, तरीही प्रमोद आणि राहुलने विळ्यांने त्याला विजेचा शॉक देऊन त्याचा श्वास बंद झाल्याची खात्री केली. त्यानंतर त्या दोघांनी रात्री २ वाजता अशोकचा मृतदेह एका गोणीत भरून मोटरसायकलवर घेतला. तिथून ते अकोला जिल्ह्याच्या सीमेवरून काटेल येथे गेले. काटेल येथील वाण नदीच्या. पात्रामध्ये वाळू उपसण्यासाठी केलेल्या एका खड्ड्यात त्यांनी तो मृतदेह टाकून त्याच्यावर दगड-धोंडे टाकले. रात्रीच्या अंधारात ३ वाजण्याच्या सुमारास त्यांनी तिथून पळ काढला.मृतदेह दगड-गोट्यांनी झाकल्याने कोणाच्या लक्षात येणार नाही असा त्या दोघांचा गैरसमज होता, त्यामुळे ते आपण काही केलेच नाही या अविर्भावात वावरू लागले होते. मात्र सकाळी वाण नदी पात्रात दगड- धोंड्याखाली एका इसमाचा मृतदेह असल्याची बातमी गावभर झाल्याने काही मिनिटात बघ्यांची घटनास्थळी तोबा गर्दी केली. दगडाखाली दबलेल्या मृतदेहाच्या पायाची बोटे उघडी पडल्याने तो मृतदेह पुरुषाचा असल्याचा कयास लावला जात होता. मृतदेहाची दुर्गंधी येत असल्याने तोंडाला रूमाल लावून दुरूनच मृतदेह पहात गावकरी शंका-कुशंका व्यक्त करत होते. या घटनेबाबत तामगांव पोलिसांना माहिती देण्यात आली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता ठाणेदार राजेंद्र पवार यांनी काही मिनिटात सहकाऱ्यांसह घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळी काटेल शिवारातील वाण नदीच्या कोरड्या पात्रात अंदाजे ५० वर्षीय व्यक्तीचा मृतदेह दगडाखाली झाकलेला होता. मृतदेह सडल्याने उग्र दर्प येत होता. पोलिसांनी वरीष्ठांना कल्पना देऊन मृतदेहाचा पंचनामा केला. मृतदेह सडल्याने चेहरा ओळखू येत नव्हता. मृतकाच्या अंगात असलेल्या पांढऱ्या रंगाच्या मळकट शर्टच्या कॉलरमागे कुले टेलर्स दानापूर असा इंग्रजीत टेलर मार्क होता. घटनास्थळी शवविच्छेदन करून त्याच गावात त्या अनोळखी इसमाच्या मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्यात आले. पोलीस स्टेशन हद्दीत ८ महिन्यात तीन खुनांचा यशस्वी तपास करणारे तामगांव पोलीस स्टेशनचे ठाणेदार सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र पवार यांनी त्या अनोळखी मृतदेहाची ओळख पटवून मारेकऱ्यांना गजाआड करण्यासाठी तपासाची सूत्रे वेगाने हलवण्यास सुरूवात केली. मृतदेहाची ओळख पटवण्यासाठी शोधपत्रिका काढून आजूबाजूच्या जिल्ह्यात आणि जिल्ह्यातील सर्व पोलीस स्टेशनला पाठवण्यात आली. तपासासाठी दोन पथके तयार करून वेगवेगळ्या दिशेला तपासासाठी पाठवण्यात आली. सहकाऱ्यांसह नजीकच्या अकोला जिल्ह्यातील दानापूर गावात कुले टेलरचा शोध घेऊन त्यास शर्ट दाखवून माहिती घेतली. तेंव्हा तो शर्ट गावातील अशोक मिसाळचा असल्याचे समजले. पोलिसांचा मोर्चा अशोक मिसाळच्या घराकडे वळला. मिसाळच्या घरी जाऊन चौकशी केली असता अशोक मिसाळ हा तीन दिवसापासून गावातून गायब आहे. त्याचा जामोद येथील मुलगा त्याच्याकडे मुक्कामास होता. दुसऱ्या दिवसापासून दोघेही बाप-लेक कोणालाही दिसले नसल्याचे नातेवाईकांनी पोलिसांना सांगितले. यामुळे सहाय्यक पोलीस निरीक्षक पवार यांचा संशय अशोक मिसाळच्या मुलावर गेला. तिथेच कुठेतरी पाणी मुरत असल्याचे त्यांचा अनुभव त्यांना सांगत होता. अशोक मिसाळ यांचा मुलगा प्रमोद उर्फ शुभम याचा मोबाईल क्रमांक प्राप्त करून तांत्रिक, पुरावें गोळा करण्याचा पोलिसांनी सपाटा लावला. तांत्रिक पुराव्यातही प्रमोद उर्फ शुभम याच्यावर संशय बळावल्याने वेळ न घालवता पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले. त्याला वडील अशोक मिसाळ यांच्या मृत्यूबाबत विचारणा करून मृतदेहावरील कपडे दाखवले. त्यावर ते कपडे आपल्या वडीलांचे नसून माझे वडील आषाढी एकादशीला पंढरपूरच्या वारीत गेले आहेत असे तो उसने अवसान आणून पोलिसांना सांगत होता, मात्र त्याच्या चेहऱ्यावरील भीतीचे सावट खाकी वर्दीने हेरून दणका दाखवताच प्रमोद उर्फ शुभमची बोबडी वळली. त्याने सरळ आपणच वडीलांचा मित्राच्या मदतीने खून केल्याचे कबूल करून सर्व घटनाक्रम सांगितला. केवळ शर्टच्या कॉलरवरील टेलर मार्कने एका खुनाचा गुन्हा चार दिवसात उघडकीस आणण्याची कामगिरी तामगांव पोलिसांनी केली. या घटनेचा तपास जिल्हा पोलीस, अधीक्षक सुनिल कडासने, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी डी. एम. गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली तामगांव पोलीस स्टेशनचे ठाणेदार सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र पवार, पोलीस उपनिरीक्षक विलास बोपटे, जीवन सोनवणे, सहाय्यक फौजदार रामकिसन माळी, पोलीस हवालदार अशोक वावगे, प्रमोद मुळे, संतोष मेहंगे, संतोष आखरे, सेवानंद हिवराळे करत आहेत.

## दोघांमधील ठसन एकाला पडली ...

आरती आटोपल्यानंतर मध्यरात्री साडेबारा वाजता हेमंत त्याच्या तिघा मित्रांसह परत येत होता. त्याचवेळी वाटेत व्ही.पी. रोडवरील धोबी गल्ली नजीक असलेल्या बच्छाव किराणा दुकानाजवळ रोहीत लोणारी याने हेमंतची वाट अडवली. जुन्या वादातून रोहीतने हेमंत सोबत बाचाबाची करण्यास सुरुवात केली. आज तुला सोडत नाही असे म्हणत रोहीतने त्याच्या कमरेला असलेला चाकू बाहेर काढला. हेमंतच्या पोटावर रोहीतने चाकूचे घाव घालण्यास सुरुवात केली. या चाकू हल्लूयात हेमंत जखमी अवस्थेत जमीनीवर कोसळला. हेमंत जखमी अवस्थेत खाली पडताच रोहीत घटनास्थळावर पळून जाण्यात यशस्वी झाला. झालेला प्रकार बघून जमलेल्या लोकांनी त्याला तशाच अवस्थेत तातडीने नजीकच्या खासगी रुग्णालयात वैद्यकीय उपचारार्थ दाखल केले. त्यानंतर पुढील उपचारार्थ त्याला लागलीच जळगाव येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात रवाना करण्यात आले. याठिकाणी वैद्यकीय अधिका-यांनी तपासणीअंती त्याला मयत घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच पाचोरा उप विभागीय अधिकारी धनंजय येरुळे यांच्यासह पाचोरा पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक अशोक पवार यांनी आपले सहकारी सहायक फौजदार रणजीत पाटील, पोलिस उप निरीक्षक सोपान गोरे, हे.कॉ. राहुल शिंपी, पो.कॉ. योगेश पाटील आदींसह घटनास्थळ गाठत पुढील कारवाईला वेग दिला. या घटने प्रकरणी कमलाकर श्रावण महाजन यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार पाचोरा पोलिस स्टेशनला संशयीत रोहीत गजानन लोणारी याच्या विरुद्ध रितसर गुन्हा दाखल करण्यात आला. अवघ्या दोन तासातच संशयीत रोहितला ताब्यात घेत अटक करण्यात आली. जुन्या वादातून हेमंत आपल्याकडे खुन्नसने बघतो या कारणावरुन आपण त्याच्यावर प्राणघातक हल्ला केल्याची कबुली रोहीतने पोलिसांना दिली. यात हेमंत सोनवणे ठार झाला. या हल्लूयानंतर गुन्ह्यात वापरलेला चाकू रोहीतच्या एका मित्राने लपवून ठेवला होता अशी माहिती चौकशीसह तपासात पुढे आली. त्यामुळे त्याला देखील संशयीत आरोपी करण्यात आले तसेचत्याला अटक करण्यात आली. तसेच या गुन्ह्यात एका विधी संघर्षित बालकाचा देखील सहभाग असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे त्याला ताब्यात घेत त्याची बाल सुधारगृहात रवानगी करण्यात आली. या विधी संघर्षीत अल्पवयीन मुलाने संशयीत आरोपी रोहीतला चाकू आणून दिला होता अशी माहिती पुढे आली. दरम्यान मयत हेमंत सोनवणे याच्या नातेवाईकांनी पाचोरा पोलिस स्टेशनवर धडक देत संशयीत आरोपीस आमच्या ताब्यात द्या, त्याला कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी केली. सुमारे तासभर हा प्रकार सुरु होता. या जमावात महिलांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता. पोलिस अधिकाऱ्यांसह प्रमुख नागरिकांनी समजूत काढल्यानंतर जमावाने हेमंतचा मृतदेह ताब्यात घेत त्याच्यावर अंत्यसंस्कार केले. या घटनेचा पुढील तपास पोलिस निरीक्षक अशोक पवार व त्यांचे सहकारी करत आहेत.

## दारूच्या व्यसनामुळे मंजुनाथ वाया ...

नात्यातील एका मुलीवर प्रेम होते. तो तिच्याशीच लग्न करू इच्छित होता. परंतु त्याला दारू पिण्याचे व्यसन लागले असल्याने नात्यातील पाहुणे मंडळी यांनी त्याला आपली मुलगी देण्यास नकार दिला होता. या कारणातून मंजुनाथ हा रोज दारू पिऊन येवून घरात आई वडिलांच्याबरोबर भांडण काढून त्यांना शिवीगाळ करीत मारहाण करीत होता. काही केल्या त्याला त्या मुलीशीच लग्न करायचे असल्याने घरच्यांना तो मी लग्न करीन तर त्या मुलीशीच असे म्हणत होता. त्याच्या दारू पिण्याच्या व्यसनामुळे नातलगांनी त्याला मुलगी देण्यास खरे तर नकार दिला असल्याने त्यात त्याच्या आई वडिलांचा काहीच दोष नव्हता तरी ही मंजुनाथ हा आपल्या आई वडिलांना याचा दोष देत तुमच्यामुळे माझे लग्न ठरत नाही याला तुम्हीच कारणीभूत आहात असे कन्नडमध्ये म्हणत त्यांना मारहाण करीत होता. त्याच्या या त्रासाला त्याचे आई वडिल कंटाळलेले होते. मंजुनाथ हा घरात आपल्याला मारहाण करीत असल्याची तक्रार नागाप्पा उळागड्डी यांनी आपला मोठा मुलगा गुरूबसाप्पा याला फोन करून सांगितले होते. यावर त्याने मी लवकरच सुट्टी घेऊन घरी येतो आणि यातून काही तरी मार्ग काढतो असे त्याने आपल्या वडिलांना सांगितले होते. वडिल नागाप्पा यांनी तसे भांडणाऱ्या मंजुनाथ याला सांगून पाहिले परंतु तो काही केल्या त्याचे ऐकायला तयार नव्हता. त्याची अवस्था ही उतावळा नवरा आणि गुडघ्याला बांशिंग अशी झालेली होती.कधी एकदा आपले लग्न होते असे त्याला झाले होते. त्याचे लग्न न होण्यासाठी आपले आई वडिल आणि माऊच जबाबदार आहेत असे त्याला वाटत होते. तो हल्ली काही ही कामधंदा न करता दिवस रात्र दारू पित होता दारू पिऊन आला की, घरात धाकट धिंगाणा घालून घर डोक्यावर घेत होता. याच्या शिवाय त्याला दुसरे काही सुचत नव्हते. त्याला त्या मुलीशी प्रेमविवाह करायचा होता या विवाहाला आपल्या घरच्या लोकांचा विरोध होत असल्याचे पाहून तो त्याचेवर चिडत होता. त्यांना मारहाण करीत होता. वडिल नागाप्पा यांनी देखील बऱ्याच वेळेला समजावून सांगण्याचा प्रयत्न केलेला होता. परंतु त्याच्या डोक्यात काही शिरतच नव्हते. याला ते तरी काय करणार होते. त्याला तुझे लग्न तु म्हणशील त्या मुलीशी करून देईन पण आधी दारू पिण्याचे कमी कर. काही तरी कामधंदा कर असे सांगत होते. पण मंजुनाथ याने आधी लग्न करायचे मग काही तरी कामधंदा करायचा असा त्याने विचार केलेला होता. त्याचा हा विचार फुसका आहे हे त्याच्या वडिलांना माहित होते कारण कोणत्या मुलीचे आई वडिल आपल्या मुलीला व्यसनी मुलाच्या आणि कामधंदा करीत नसलेल्या मुलाला कसे बरे देतील हे त्यांना ही माहित होते. तरीही काही झाले तरी मुलगा आपला आहे म्हणून त्यांनी त्या मुलीच्या आई वडिलांना भेटून लग्नाची बोलणी चालविली होती. तसा ते प्रयत्न करीत होते त्याच्या प्रयत्नाला यश ही येत होते. म्हणून नागाप्पा यांनी आपला मोठा मुलगा गुरूबसाप्पा याला सुट्टी घेऊन घरी लग्नाच्या तयारीसाठी बोलाविले होते. गुरूबसाप्पा ही काही दिवसाची सुट्टी घेऊन भावाच्या लग्नाच्या तयारीसाठी घरी आलेला होता.त्याने ही भावाच्या होणाऱ्या बायकोच्या आई वडिलांना भेटून लग्नाची तारीख ही पक्की केलेली होती. खरे तर ही गोष्ट मंजुनाथ याला देखील माहित होती. आता आपले लग्न होणार आहे आपण दारू पिण्याचे कमी करायला हवे असे त्याला वाटत नव्हते. लग्न ठरलेले असले तरी तो इतका दारू पित होता की, त्याला काही अंतच राहिलेला नव्हता. आता काय करायचे असा प्रश्न वडिल नागाप्पा आणि भाऊ गुरूबसाप्पा यांना पडलेला होता. ते दोघे ही त्याची समजुत घालून त्याला दारू पिऊ नकोस असे सांगत होते, परंतु मंजुनाथ याचे व्यसन काही सुटत नव्हते. त्याला दारूचा पेग आपल्या घशाखाली गेल्या शिवाय चैन पडत नव्हती. तो जर असाच दारू पित राहिला तर त्याचे होणारे लग्न देखील मोडले जावू शकते याची कल्पना वडिल नागाप्पा आणि भाऊ गुरूबसाप्पा यांना होती म्हणून ते दोघे ही त्याला दारू पिण्यापासून रोखत होते. याचा वेगळाच अर्थ मंजुनाथ काढत होता. काही तरी कारण सांगून वडिल आणि भाऊ आपल्या लग्नात खोडा घालत आहेत असे त्याला वाटत होते. म्हणून तो दारूच्या नशेत रोज त्याच्याशी भांडण काढत होता. घरात त्याच्या लग्नाची तयार चालू असताना शनिवार दि.८ मार्च २०२५ रोजी तो फुल्ल दारू पिऊन घरात आला. त्यावेळी रात्रीचे १०.०० वाजले असतील घरातील इतर मंडळी जेवण करून झोपण्याच्या तयारीत होते. त्यातच मंजुनाथ हा वडिल नागाप्पा आणि भाऊ गुरूबसाप्पा यांना कन्नडमध्ये शिवीगाळ करीत बाहेर थांबला होता. माझ्या लग्नाचे नाटक करीत आहात. तुम्हाला माझे लग्नच करायचे नाही तुम्ही दोघे माझ्या लग्नात खोडा घालत आहात असे म्हणत तो घाण घाण अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करू लागला. हे ऐकून वडिल नागाप्पा आणि भाऊ गुरूबसाप्पा याचा रागाचा पारा चढला. वडिल बाहेर येत त्यांनी मंजुनाथ याच्या कानाखाली दोन लगावल्या. त्यासरशी त्याची दारू सर्रकन उतरली. तो वडिलांच्या अंगावर जात त्यांना लाथा बुक्कांनी माराहाण करू लागला. वयोवृध्द वडिल मला वाचवा वाचवा म्हणत थोरल्या मुलगा बसाप्पाला बाहेर बोलवित होते. वडिलांचे ओरडणे ऐकून गुरूबसाप्पा हा बाहेर आला. त्याने बाहेर पडलेला लाकडी दांडका घेतला आणि मंजुनाथ याला मारायला सुरूवात केली. त्याला मारहाण होत असताना तो पळून जावू लागला. हे बघून वडिल नागाप्पा यांनी त्याला धरले आता ते दोघे ही त्याला आपल्या हातात सापडेल त्या वस्तुने मारत होते. दारूच्या नशेत असणारा मंजुनाथ हा ओरडत पळत असताना तो घराशेजारील एका दगडावर धापकन पडला. त्याच्या डोक्याला जबर मार लागला. तो तसाच तेथे पडला असताना देखील ते दोघे त्याला मारहाण करीत होते. त्यातच त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्त स्राव सुरू झाला. उळागड्डी याच्या घरासमोर चाललेला भांडणाचा प्रकार पाहून शेजारी ही तेथे जमा झालेले होते. एक दोन शेजाऱ्यांनी गुरूबसाप्पा याच्या हातातून लाकडी दांडके काढून घेतले होते. तरी ही ते दोघे त्याला मारण्याचे थांबत नव्हते. या मारहाणीत मंजुनाथ उळागड्डी याचा जागीच मृत्यु झाला होता. कुणी तरी या घटनेची माहिती कितुर पोलीसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच रात्री लगेच पोलीस चिक्कनंदीहळ्ळीतील उळागड्डी याच्या घराशेजारील घटनास्थळी पोहचले. घटनास्थळी बघ्यांची गर्दी हटवून पोलीसांनी पंचनामा करायला सुरूवात केली. घटनास्थळी रक्ताच्या थारोळ्यात मंजुनाथ उळागड्डी हा पडलेला होता. बाजुलाच हाताशपणे नागाप्पा उळागड्डी आणि गुरूबसाप्पा उळागड्डी हे बसले होते. त्याच्या चेहऱ्यावर पश्ताप दिसत होता. घडलेल्या घटनेला ते तरी काय करणार होते. कारण दारूच्या नशेत मंजुनाथ हा त्याच्या अंगावर गेला होता. त्यामुळे त्यांनी त्याला मारहाण केलेली होती. ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे याची माहिती पोलिसांना मिळालेली होती. त्यामुळे पोलीसांनी पंचनामा करून मृतदेह उतरीय तपासणीसाठी कितुर येथील सरकारी रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची लेखी फिर्याद मयत मंजुनाथ उळागड्डी याच्या नात्यातील एका कडून पोलीसांनी घेतली. त्याने दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी मंजुनाथ नागाप्पा उळागड्डी (वय २५) याच्या खून प्रकरणी त्याचे वडिल नागाप्पा उळागड्डी (वय ६८) मोठा मुलगा गुरूबसाप्पा उळागड्डी (वय २८) रा.तिघे ही चिक्कनंदीहळ्ळी ता. कितुर जिल्हा बेळगावी याच्या विरोधात कितुर पोलीस ठाण्यात आयपीसी कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेऊन कितुर येथील प्रथम वर्ग कोर्टात उभे केले. मा.कोर्टाने या दोघांची रवानगी बेळगावी येथील हिंडलगा जेलमध्ये केली. या दरम्यान पोलिसांनी या दोघाच्याकडून गुन्हयात वापरलेला लाकडी दांडका जप्त केला.या घटनेचा पुढील तपास कितुर पोलीस करीत आहेत.

# अपंग कल्याणकारी संस्थेचा वसईत दिव्यांग सक्षमीकरण उपक्रम




**वसई/प्रतिनिधी**

वसई विरार पालिका क्षेत्रातील दिव्यांग व्यक्तींसाठी वसई तहसील सभागृहामध्ये अपंग कल्याणकारी संस्थेतर्फे २० मार्च रोजी दिव्यांग सक्षमीकरण उपक्रमाचे आयोजन केले होते. या उपक्रमात दिव्यांगांसदर्भातील विविध योजना, दिव्यांगांचे बचत गट यांची माहिती देण्यात आली. अपंग कल्याणकारी संस्थेचे मुख्य सल्लागार आदिवासी सेवक गंगाधर म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्थेचे अध्यक्ष शमीम खान यांच्या संकल्पनेतून आयोजित केलेल्या या कार्यक्रमांमध्ये एकूण १२७ दिव्यांग व्यक्तींनी सहभाग घेतला. तसेच वसई विरार पालिकेच्या दिव्यांग विभागाच्या समन्वयक रुपाली कदम, महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त विकास महामंडळच्या आरती रंबन, नारी शक्ती संस्थेच्या राजल नाईक, डॉ. रोहन कुलूर, दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे उत्तम व्हटकर, सुशील ओगले, भाजप उपाध्यक्ष संतोष काकड इ. उपस्थित होते. पालिकेच्या दिव्यांग विभागाच्या समन्वयक रूपाली कदम यांनी दिव्यांग व्यक्तींचे बचत गट आणि त्यांची नियामावली याविषयी माहिती दिली. यातून मिळणारे अनुदान व त्या माध्यमातून दिव्यांगांच्या रोजगाराचा प्रश्न सोडवण्यासाठी बचत गटाचे महत्त्व पटवून दिले. महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त विकास महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापक आरती रंबन यांनी महामंडळाच्या योजनांची माहिती दिली. दिव्यांग महिलांना एक टक्का कमी व्याजदर असल्याचे सांगितले. महिला हक्कांसाठी लढणाऱ्या नारी शक्ती संस्थेच्या अध्यक्ष राजल नाईक यांनी दिव्यांग महिलेवर कोणत्याही प्रकारचा अन्याय झाला तर तिला पूर्ण मदत करण्याची ग्वाही दिली. डॉ. रोहन कुलूर यांनी दिव्यांग महिलांचे आरोग्यविषयी माहिती दिली. तसेच दिव्यांगांवर मोफत उपचार करण्याची ग्वाही दिली. दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे उत्तम वटकर म्हणाले, नुकताच पालिकेसोबत दिव्यांगांसाठी दिव्यांग योजना मार्गदर्शक पुस्तकाचे प्रकाशन मनपा आयुक्त अनिल पवार यांच्या हस्ते झाले. यासाठी जबाबदारी स्वीकारून संस्थेचे सल्लागार सुशील ओगले यांनी तहसीलदार यांचे आभार मानले. यावेळी दिव्यांगांच्या प्रश्नांचे उपस्थितांनी निरसन केले. दिव्यांगांना शासकीय योजनांचा लाभ मिळविण्यासाठी अनिवार्य असलेले युडीआयडी कार्डचे वाटप करण्यात आले. रोजगारासाठी दिव्यांग व्यक्तींना स्टॉल मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन करण्यात आले. कृत्रिम अवयव व सहाय्यभूत साधनांची आवश्यकता असलेल्या दिव्यांग व्यक्तींची नाव नोंदणी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी अपंग कल्याणकारी संस्थेचे सदस्य सत्यम थाटू, राकेश पाटील, दिगंबर दांडेकर, प्राजक्ता मॅडम, नरेश पाटील, सुभाष राठोड आदींनी परिश्रम घेतले.

# वसईत अनधिकृत व नियमबाह्य २४० रिक्षांवर परिवहन विभागाची कारवाई, ४५ रिक्षा जप्त!

**वसई/प्रतिनिधी**



शहरात रात्रीच्या सुमारास अनधिकृत व नियमबाह्य पद्धतीने चालविल्या जाणाऱ्या रिक्षांना आवर घालण्यासाठी प्रादेशिक परिवहन विभागाने भरारी पथके सक्रिय केली आहेत. मागील पाच दिवसात २४० रिक्षांवर कारवाई करीत ४५ रिक्षा जप्त केल्या आहेत. वसई विरार शहराच्या वाढत्या लोकसंख्ये सोबत रिक्षांची संख्या ही बेसुमार वाढली आहे. विशेषतः परवाने खुले झाल्या नंतर अधिक प्रमाणात रिक्षा शहरातील रस्त्यावर धावत आहेत. तर दुसरीकडे रात्रीच्या सुमारास शहरात अनधिकृत रिक्षांची चलती जोरात सुरू आहे. कोणत्याही प्रकारची कागदपत्रे नसलेल्या रिक्षा सर्रास पणे चालविल्या जात आहेत. कोणत्याही प्रकारच्या कारवाईला सामोरे जावे लागू नये यासाठी हे रिक्षाचालक रात्रीच रिक्षा घेऊन बाहेर पडत आहेत. यातील बहुतांश रिक्षाचालक हे गर्दुल्ले असून मारामारी, अरेरावी या सारखे प्रकार ही घडतात. या रिक्षा चालकांवर कोणताही अंकुश नसल्याने दिवसेंदिवस अशा रिक्षांचा सुळसुळाट वाढत आहेत. अनधिकृत पणे रिक्षा चालकांच्या विरोधात नागरिक व विविध सामाजिक कार्यकर्ते यांच्या मार्फत सातत्याने परिवहन विभागाकडे तक्रारी येत होत्या. अखेर प्रादेशिक परिवहन विभागाने रात्रीच्या सुमारास अनधिकृत रिक्षा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रिक्षा चालकांवर कारवाई करण्यासाठी भरारी पथके सक्रिय केली असूनन रिक्षांची तपासणी केली जात आहे. परवाना, बॅच, आवश्यक रिक्षांची कागदपत्रे या सर्व पडताळणी केली जात आहे. मागील पाच दिवसात ७३२ ऑटोरिक्षांची तपासणी केली असून या तपासणी करण्यात २४० रिक्षा दोषी आढळून आल्या आहेत.ज्या अनधिकृत आहेत त्या ४५ ऑटोरिक्षा जप्त करण्यात आल्या आहेत. त्यांच्याकडून आतापर्यंत १७ लाख ६७ हजार रुपये इतका दंड ही वसूल केला असल्याची माहिती परिवहन विभागाने दिली आहे. अनधिकृत रिक्षा चालविण्याचे प्रकार वाढत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. अशा अनधिकृत रिक्षांना पायबंद घालण्यासाठी विशेष मोहीम राबवून कारवाई केल्या जात असल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी अतुल आदे यांनी सांगितले.

दरम्यान वसई विरार शहरात पर राज्यातील रिक्षा चालक मोठ्या संख्येने आहेत. यात बहुतांश रिक्षाचालक हे गुन्हेगारी प्रवृत्तीचे आहेत. तर काही वेळा रात्रीच्या वेळेस मद्यपान करून धिंगाणा घालणे, प्रवाशांना दादागिरी करणे असे प्रकार ही समोर येत आहेत. अशा रिक्षा चालकांवर अधिक तीव्र कारवाई करून सर्वसामान्य रिक्षाचालक व प्रवाशांना दिलासा द्यावा अशी मागणी नागरिकांमधून करण्यात येत आहे.

# महिलेकडून पाच वर्षीय मुलीला बेदम मारहाण




**मिरा-भाईंदर/प्रतिनिधी**

एका पाच वर्षीय मुलीला तिचा सांभाळ करणाऱ्या महिलेकडून आणि तिच्या अल्पवयीन मुलाकडून बेदम मारहाण करून मुलीच्या अंगावर विविध ठिकाणी चटके दिल्याची धक्कादायक घटना मिरा रोड परिसरात उघडकीस आली आहे. पोलिसांनी मुलीला मारहाण करणार्या महिलेला अटक केली असून गंभीर जखमी झालेल्या पीडित मुलीवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पीडित मुलीची आई मुंबईतील अंधेरी येथे राहत आहे. तिच्या आईने मुलीला सांभाळण्यासाठी मिरारोड येथे राहणाऱ्या वैशाली डेढीया या महिलेकडे ठेवले होते. मंगळवारी रात्री त्या मुलीचा सांभाळ करणार्या महिलेने व तिच्या अल्पवयीन मुलाने पीडितेला जबर मारहाण केली. तसेच त्या महिलेच्या मुलाने जिव घेण्याच्या उद्देशाने तिला उचलून जोराने बेडवर जमिनीवर आपटले, अशी तक्रार आहे. त्यामुळे मुलीचा डोळा व डोक्याला जबर दुखापत झाल्याने ती बेशुध्द झाली. त्यानंतर वैशाली डेढीया यांना ती मुलगी बेशुध्द होण्याचे नाटक करत असल्याचे वाटल्याने त्यांनी उलतणे गॅसवर गरम करण्यास सांगून त्या उलतण्याने मुलीच्या गालावर व छातीवर, पोटावर, दोन्ही मांड्यांवर, डाव्या गुडघ्यावर, पाठीवर चटके दिले. यामध्ये पीडित मुलगी गंभीर जखमी झाली आहे. जखमी मुलीला सुरुवातीला उपचारासाठी भाईंदरच्या पंडीत भीमसेन जोशी रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु तिची तब्येत नाजूक असल्याने तिला मुंबईच्या केईएम रुग्णालयात हलविण्यात आले आहे. मुलीच्या आईला ही बाब समजल्यानंतर तिने नयानगर पोलीस ठाण्यात येऊन गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी पोलिसांनी वैशाली डेढीया आणि तिचा अल्पवयीन मुलगा यांच्यावर गुन्हा दाखल करत महिलेला अटक केली आहे. सदरील गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक इरफान नदाफ हे करत आहेत.

# जैन इरिगेशनला द टाईम्स क्रिकेट शिल्ड ट्रॉफी 'सी' डिव्हिजनचे विजेतेपद



**जळगाव/प्रतिनिधी**

जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.च्या 'ब' संघाने रिलायन्स ग्रृप स्पोर्टस क्लबच्या संघावर तीन विकेट ने विजय प्राप्त करून प्रतिष्ठित अशा द टाईम्स क्रिकेट शिल्ड ट्रॉफी 'सी' डिव्हिजनचे दिमाखात विजेतेपद पटकाविले. यात जैन इरिगेशनच्या शुभम शर्माने ४ महत्त्वपूर्ण विकेट घेतल्या तर कर्णधार प्रतिक शर्मा याने नाबाद शतकी खेळी साकारली. 'सी' डिव्हिजनच्या या विजयामुळे जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.चा 'ब' संघ आता पुढील वर्षी (२०२५-२६) 'बी' डिव्हिजन मध्ये पदोन्नित झाला आहे. या विजयाबरोबर जैन इरिगेशन संघाने मुंबईतील टाइम्स व कार्पोरेट चषकावर आपले नाव नोंदवून अतिशय उत्कृष्ट कामगिरी केली आहे. या विजयी संघाचे खेळाडू प्रशिक्षक यांचे अभिनंदन जैन इरिगेशन संघाचे संयोजक मयंक पारिख, अरविंद देशपांडे तसेच जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन, सहव्यवस्थापकीय संचालक अतुल जैन यांनी केले आहे. मुंबई पोलीस जिमखाना मैदानावर झालेल्या अंतिम फेरीचा सामना जैन इरिगेशन विरूद्ध रिलायन्स ग्रृप स्पोर्टस क्लब यांच्यात रंगला. या सामन्याची नाणेफेक जैन इरिगेशन व संघाचा कर्णधार प्रतीक यादव ने जिंकून रिलायन्स ग्रृप स्पोर्टस क्लब ला फलंदाजासाठी पाचरण केले. रिलायन्स स्पोर्ट्स क्लब यांनी चांगली सुरुवात करत वेदांत पाटील ५४ (५४) धावा, शुभम पुजार्थि २५ (३७) धावा वेदांत खांबे नाबाद ४७ (६१) आणि जगदीश जाधव नाबाद ४१ (२७) आठव्या गडासाठी नाबाद ८० धावांची महत्त्वपूर्ण भागिदारी करीत आपल्या संघाला २०० धावांचा पल्ला गाठून दिला. जैन इरिगेशन संघाने मंदगती गोलंदाजी केल्याने याचा फटका त्यांना बसला. रिलायन्स ग्रुप संघाला तब्बल ४० दंडात्मक धावा त्यामुळे बहाल केल्या व अशा प्रकारे रिलायन्स ग्रुप स्पोर्ट्स क्लब यांनी ४३ षटकात सात गडी गमावत २५२ धावा करून जैन इरिगेशन ब' संघासमोर २५३ धावांचे लक्ष्य ठेवले.

जैन इरिगेशनतर्फे गोलंदाजीमध्ये शिवम यादव व अमित गावंडे प्रत्येक १ विकेट तर शुभम शर्मा याने ४ विकेट घेत रिलायन्स ग्रृपचा डाव गुंडाळण्यास हातभार लावला. निर्धारीत ४५ षटकांत २५३ धावांचे लक्ष्य घेऊन मैदानात उतरलेल्या जैन इरिगेशनच्या 'ब' संघाची सुरवात अडखडत झाली. जैन इरिगेशन संघाचा कर्णधार प्रतीक यादव याने कर्णधारास साजेशी अशी नाबाद ११०(११८) धावांची खेळी करत संघाला विजयी पथावर नेले. त्यात त्याने ७ चौकार व २ षटकारांची आतिषबाजी केली. त्याला शिवम यादव ४० (२४) आरुष पाटणकर २६ (३८) व ऋषिकेश गोरे नाबाद २६ (१५) यांनी चांगली साथ दिली या दोघांनी आठव्या विकेटसाठी नाबाद ६४ धावांची भागिदारी करत संघाला विजयी केले. २५३ धावांचे लक्ष्य ४४.४ षटकांत पुर्ण करून अंतिम सामन्यात दिमाखदारपणे विजय प्राप्त केला.

# पाथरीत राडा; माजी आमदार बाबाजानी दुर्राणी, आलोक चौधरी यांच्यासह आठ जणांवर गुन्हा दाखल

## साईबाबा विकास आराखडा संदर्भातील बैठकीनंतर घडला मारहाणीचा प्रकार

**परभणी/लक्ष्मण उजगरे**

पाथरी नगर परिषदेच्या सभागृहात बुधवारी (दि.१२) साईबाबा विकास आराखड्यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीतील वादाचे पडसाद सभागृहाबाहेर येताच पडले आणि दोन गटांत मारहाणीची घटना घडली. या प्रकरणात आलोक चौधरी यांच्या तक्रारीवरून माजी आ. बाबाजानी दुर्राणी यांच्यासह चौघांवर तर बाबाजानी यांच्या गटाच्या वतीने दिलेल्या परस्परविरोधी तक्रारीवरून आलोक चौधरी यांच्यासह चार आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेमुळे दिवसभर पाथरीत तणावपूर्ण वातावरण होते.

याबाबत अधिक माहिती अशी, पाथरी नगर परिषद सभागृहात साईबाबा विकास आराखडा संदर्भात जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत शहरातील प्रतिष्ठित नागरिकांची बैठक दुपारी एक वाजता पार पडली. या बैठकीत आलोक चौधरी यांनी शॉपिंग कॉम्प्लेक्स व घरकुल घोटाळ्याचा मुद्दा उपस्थित केला. हा मुद्दा का उपस्थित केला म्हणून माजी आ. अब्दुल्ला खान दुर्राणी व इतर तिघांनी नगरपालिकेच्या प्रवेशद्वारावर आलोक नारायण चौधरी यांना थापड बुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली अशी तक्रार चौधरी यांनी पाथरी पोलीस ठाण्यात दिली. या प्रकरणी बाबाजानी दुर्राणी यांच्यासह चौघा जणांवर पाथरी पोलीस ठाण्यात थापड बुक्क्याने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याबाबत गुन्हा दाखल झाला आहे. गुन्हा दाखल झालेल्या आरोपींमध्ये तबरेज खान रहमान खान दुर्राणी, सहजाद खान, बक्तियार खान, हमीद खान शेरखान खान (रा.पोहेटाकळी) यांचा समावेश आहे. तक्रारीत माजी आ.अब्दुल्ला खान दुर्राणी यांचे ऐकून मला सार्वजनिक ठिकाणी मारहाण केली. तसेच जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याचे म्हटले आहे. या घटने बाबत माजी आ. दुर्राणी यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत राडा झाल्यामुळे शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी पाथरी पोलीस ठाण्यामध्ये गर्दी केली होती. त्यामुळे शहरांमध्ये काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. जादा पोलीस कुमकही मागवण्यात आली. यावेळी शिवसेनेचे राज्य सचिव असेफ खान शिवसेना जिल्हाप्रमुख नाना टाकळकर, माजी जि. प. सदस्य एकनाथ घाडगे, एकनाथ शिंदे, अमोल भाले पाटील, विक्रम पाटील, शाकेर सिद्दीकी, लक्ष्मण तिडके, शेख खालेद, हसिफ खान यांच्यासह शिवसैनिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

### पोलिस ठाण्यात गर्दीने तणावाचे वातावरण

बाबाजानी यांच्या विरोधात गुन्हा दाखल झाल्यानंतर त्यांचे समर्थक मोठ्या संख्येने पोलिस ठाण्यात जमा झाले. याप्रकरणी आधीच्या गुन्ह्यातील फिर्यादीविरोधात तक्रार देण्यात आली. बाबाजानी यांच्या गटाच्या वतीने पठाण हमीद खान शेरखान यांनी दिलेल्या तक्रारीवरून आसेफ खान शेरगुल खान, सातखान आसेफ खान, युनूस कुरेशी, आलोक चौधरी यांच्या विरोधात मारहाणीचाच गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बाबाजानी हे सध्या राष्ट्रवादीच्या शरदचंद्र पवार पक्षात आहेत तर त्यांचे कट्टर स्थानिक विरोधक शिवसेनेचे स्थानिक नेते सईद खान हे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत आहेत. दोघांमध्ये विधानसभा निवडणूकीच्याही आधीपासून राजकीय संघर्ष सुरु आहे. त्यातूनच परस्परांविरोधात सातत्याने तक्रारी आणि कुरघोड्या चाललेल्या आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर हा संघर्ष तीव्र झाला आहे.

# अखेर आदिवासी विकास महामंडळाकडून ३२ कोटींची धान उत्पादकांची देयके अदा

**जव्हार/प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सहकारी विकास महामंडळ मर्यादित नाशिक, प्रादेशिक कार्यालय जव्हार अंतर्गत आधारभूत किंमत खरेदी योजना पालघर व ठाणे जिल्हयात राबविण्यात येत आहे. सदरच्या योजनेअंतर्गत ३७ खरेदी केंद्र मंजूर असुन सदरच्या खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी करण्यात आली आहे. नोंदणीकृत शेतकऱ्यांकडून खरेदी केंद्रावर धानाची खरेदी सुरु असून अखेर ५ हजार ६५० शेतकऱ्यांना देयके अदा करण्यात आली असून २.७० लाख क्विंटल धानाची रक्कम रुपये ३२ कोटी ५० लाख ५४५६ रु. इतक्या रक्कमेच्या धानाचा मोबदला अदा करण्यात आला आहे. नोंदणीकृत धान विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांची कागदपत्रे अपूर्ण असल्याचे निदर्शनास आल्याने शेतकऱ्यांनी त्रुटींची पूर्तता करूनच धान विक्रीसाठी आणावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळामार्फत आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार अटी, शर्तींचे पालन करीत ३२ कोटींचे धान उत्पादकांची देयके अदा करण्यात आल्याची माहिती जव्हार येथील प्रादेशिक कार्यातून देण्यात आली आहे. खरेदी केंद्रावर नोंदणीकृत शेतकऱ्यांच्या कागदपत्रांची पडताळणी केली असता ७/१२ उतारावर खरीप पणन हंगाम २०२४- २५ चा पीक पेरा नसणे, प्रत्यक्ष बँक खाते क्रमांक व एनइएमएल पोर्टलवर नमूद खाते क्रमांकात तफावत असणे, नोंदणी करते वेळीचा शेतकरी फोटो व लॉट ऍन्ट्री करतानाचा शेतकरी फोटोमध्ये तफावत असणे, केवायसी फॉर्म बँकेकडून पडताळणी केलेले नसणे इ. बाबींची पडताळणी करण्यात आली असून धान विक्री केलेल्या शेतकर्यांचे धानाचे चुकारे अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे. धान उत्पादक कास्तकारांचे चुकारे अदा झाल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातवरण आहे. तसेच उर्वरित धान कास्तकारांनी आपला धान ३१ मार्च पर्यंत विक्री करून आधारभूत धान खरेदी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन प्रादेशिक कार्यालय जव्हार कार्यालयातून करण्यात आले आहे.

# बालिकेवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला सश्रम कारावासाची शिक्षा!

**कल्याण/प्रतिनिधी**

सहा वर्षापूर्वी अंबरनाथमध्ये राहत असलेल्या एका सात वर्षाच्या बालिकेवर एका ३३ वर्षाच्या इसमाने लैंगिक अत्याचार केला होता. अंबरनाथ पोलिसांनी याप्रकरणी इसमाला अटक करून त्याच्यावर कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयात खटला दाखल केला होता. याप्रकरणात कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाचे अपर जिल्हा न्यायाधीश पी. आर. अष्टुकर यांनी आरोपी इसमाला बाल लैंगिक अत्याचार कायद्याने २३ वर्ष सश्रम कारावास आणि सहा हजार रूपये दंडाची शिक्षा ठोठावली. आशुतोष कृपाशंकर चौबे (३३) असे कारावास झालेल्या इसमाचे नाव आहे. चौबे याच्यावर अंबरनाथ पोलीस ठाण्यात बाल लैंगिक अत्याचार कायद्याने पीडित मुलीच्या आईच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. याप्रकरणात सरकार पक्षातर्फे ड. सचिन कुलकर्णी यांनी काम पाहिले. हवालदार ए. आर. गोगरकर, हवालदार भालचंद्र पवार यांनी न्यायालय, पोलीस समन्वयक म्हणून काम पाहिले. याप्रकरणाचा तपास अंबरनाथ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बालाजी पांढरे, पोलीस निरीक्षक किशोर शिंदे, तपास अधिकारी महिला साहाय्यक पोलीस निरीक्षक रेखा घनवट यांनी केला होता. या गुन्ह्याची माहिती अशी, की पती, पत्नी, त्यांची एक मुलगी, एक मुलगा असे कुटुंब अंबरनाथ भागात राहते. पीडित मुलगी इयत्ता दुसरीत शिक्षण घेत होती. १९ जुलै २०१९ रोजी पीडित मुलीची तब्येत ठिक नसल्याने ती शाळेत न जाता घरीच होती. मुलीच्या आईने तिला डॉक्टरकडे नेऊन आणले होते. दुपारच्या वेळेत मुलीची आई घरातील कामे उरकून घरातच झोपली होती. पीडिता घराबाहेर उभी असताना त्यावेळी एका इसमाने पीडित मुलीला तुझे वडील तुला तिकडे बोलवत आहेत असे सांगत तिला जवळ बोलावून घेतले. तिला घट्ट मिठी मारून, तिच्या तोंडावर हात ठेऊन तिला झुडपे असलेल्या निर्जन ठिकाणी नेले. तेथे इसमाने पीडितेवर लैंगिक अत्याचार केले. पीडित मुलगी मोठ्याने ओरडू पाहत असल्याने इसमाने मुलीच्या दातावर जोरादार बुक्की मारून तिचा दात पाडला. तिच्या तोंडातून रक्त सुरू झाले. एक इसम एका बालिकेवर अत्याचार करत असल्याचे काही पादचाऱ्यांच्या निदर्शनास आले. त्यांनी पीडितेची इसमाच्या ताब्यातून सुटका केली. पादचाऱ्यांनी इसमाला पकडून ठेवले. पीडितेला तिच्या घरी आणले. पीडितेने घडला प्रकार आईला सांगितला. पादचाऱ्यांनी संबंधित इसमाला पीडितेच्या घराजवळ पकडून आणले होते. पीडितेच्या आई, वडिलांनी तात्काळ अंबरनाथ पोलीस ठाणे गाठून तेथे आरोपी इसम आशुतोष चौबे विरुध्द तक्रार केली. पोलिसांनी बाल लैंगिक अत्याचार कायद्याने गुन्हा दाखल केला होता.

# मुरबाडमधील नांदेणी गावच्या ग्रामस्थाला विद्यार्थी खून प्रकरणी जन्मठेप

**कल्याण/प्रतिनिधी**

मुरबाड तालुक्यातील नांदेणी गावातील एका ४८ वर्षाच्या ग्रामस्थाने गावातील एका ग्रामस्थाबरोबर असलेल्या वादातून त्याच्या चौथीमध्ये शिकणाऱ्या मुलाची सात वर्षापूर्वी गावातील जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात कोयत्याने निर्घृण हत्या केली होती. कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयात याप्रकरणी खटला सुरू होता. अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश पी. पी. मुळये यांनी या प्रकरणातील आरोपी ग्रामस्थाला सबळ पुराव्यांचे आधारे जन्मठेपेची शिक्षा सुनावली. जयवंत बबन भोईर (रा. नांदेणी, मुरबाड) असे जन्मठेप झालेल्या आरोपीचे नाव आहे. याप्रकरणात सरकारी वकील म्हणून ड. सचिन कुलकर्णी, ॲड. कदंबिनी खंडागळे यांनी काम पाहिले. आरोपीतर्फे ड. मंगेश देशमुख यांनी काम पाहिले. न्यायालय आणि पोलिसांचे समन्वयक म्हणून हवालदार अरविंद मोरे काम पाहत होते. मुरबाड पोलीस ठाण्याचे तत्कालीन साहाय्यक पोलीस निरीक्षक सुहास खरमाटे यांनी याप्रकरणाचा तपास केला होता.

याप्रकरणाची माहिती अशी, की मयत विद्यार्थी सुरज ज्ञानेश्वर भोईर (११) हा नांदेणी गावातील मुलगा गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत इयत्ता चौथीमध्ये शिक्षण घेत होता. मयत विद्यार्थी सुरज भोईर याचे कुटुंब आणि आरोपी जयवंत बबन भोईर यांच्यात पूर्ववैमनस्यातून काही वाद होते. २८ मार्च २०१८ रोजी सकाळची शाळा असल्याने सुरज भोईर नेहमीप्रमाणे गावातील ठाणे जिल्हा परिषदेच्या शाळेत सकाळी साडे सात वाजता गेला. गुरुजी शाळेत उपस्थित होते. विद्यार्थी आपल्या वर्गांची साफसफाई करत होते. वर्ग खोलीतील झाडलोट केलेला कचरा बाहेर टाकण्यासाठी सुरज भोईर, त्याचा मित्र संदेश भोईर हे शाळे जवळील आरोपी जयवंत भोईर यांच्या पडिक घराजवळ गेले. कचरा टाकून झाल्यानंतर सुरज याला लघुशंका आल्याने तो जयवंत भोईर याच्या पडिक घराजवळ लघुशंका करत होता. त्यावेळी तेथे असलेल्या जयवंत भोईर याने काही तरी कारणावरून सुरजशी वादावादी करून त्याच्यावर कोयत्याने वार करून त्याची निर्घृण हत्या केली. सुरजचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरानंतर जयवंत याने स्वता विष पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला होता. तो वाचला. नांदेणी शाळेतील शिक्षकाने याप्रकरणी मुरबाड पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. पोलिसांनी तपास करून जयवंत भोईर याला अटक केली होती. याप्रकरणात शिक्षण, विद्यार्थी असे एकूण आठ साक्षीदार तपासण्यात आले. याप्रकरणाचा तपास अप्पर पोलीस अधीक्षक भारत तांगडे, उपविभागीय पोलीस अधिकारी जगदीश शिंदे, पोलीस निरीक्षक संदीप गिते यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला होता.

# 'ऑब्जेक्शन माय लॉर्ड...'

लोकशाहीत लोकहिताचे कायदे असायला हवेत. घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना तयार करताना लोकांच्या मूलभूत हक्कांना कोणत्याही प्रकारची बाधा येणार नाही याचा विचार करूनच लोकांसाठी लोकांच्या हिताची घटना बनवली. दुर्दैवाने लोकांना केंद्रबिंदू मानून जी लोकशाही घटना बनवण्यात आली, तिचा लोकांनीच गैरफायदा घेतला. कायद्याला पळवाटा तयार केल्या. खुनासारख्या गंभीर गुन्ह्यात जामिनाची तरतूद असल्याने, व जामीनही सहज मिळत असल्याने तसेच कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या यंत्रणाही विश्वसनीय राहिलेल्या नसल्याने, गुन्हेगारांच्या मनात कायद्याची भीती राहिलेली नाही. बाबासाहेबांनी भलेही घटनेत लोकांच्या हिताला सर्वाधिक प्राधान्य दिलेले असले तरी, गेल्या ७५ वर्षात समाजातील प्रत्येक क्षेत्रात जे बदल घडत गेले त्याने न्यायव्यवस्था आणि बदललेली सामाजिक स्थिती यांना परस्परा पासून खूप दूर नेल्याने, लोकांना अपेक्षित न्याय मिळेनासा झालाय.कारण काळानुरूप कायद्यात जे परिस्थितीनुसार बदल व्हायला हवे होते ते बदल झालेच नाहीत. त्यामुळे काही खटल्यांमध्ये विचित्र निकाल दिले जात आहेत.उत्तर प्रदेशातील एक न्यायालयाने बलात्काराच्या प्रकरणात निकाल देताना म्हटले आहे, की स्त्रीच्या स्तनांना स्पर्श करणे म्हणजे बलात्कार नाही. किंवा स्त्रीच्या सलवारीचा नाडा सोडणे म्हणजे बलात्कार नाही. या दोन कृती भलेही प्रत्यक्षात बलात्कार नसल्या तरी, त्या बलात्काराच्या उद्देशानेच केलेल्या असल्याने त्या बलात्कारा कॅटेगरीत यायला हव्यात. कारण स्त्रीच्या स्तनांना हात लावणे व नंतर नाडा खोलून सलवार दूर केल्यावरच प्रत्यक्षात बलात्काराची घटना घडते. मग न्यायालय या दोन घटनांना बलात्काराच्या कॅटेगरी मधून कसे काय वगळू शकते. न्यायालयाकडून बलात्कारा सारख्या गंभीर गुन्ह्यात जर असे निकाल दिले गेले तर, कायदा आणि न्यायपालिकेवर कोण विश्वास ठेवील का? आणखी अशी कितीतरी उदाहरणे देता येतील की न्यायालयाने दिलेले काही निकाल लोकांना सहजपणे पटणारे नाहीत. असाच एक निकाल महाराष्ट्रातील सत्र न्यायालयाने दिला आहे. महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील मंत्री माणिकराव कोकाटे यांना न्यायालयाने भ्रष्टाचाराच्या प्रकरणात दोषी ठरवून दोन वर्षाची शिक्षा ठोठावली. तरी मुख्यमंत्र्यांनी त्यांना मंत्रिमंडळात कायम ठेवले. आश्चर्याची गोष्ट म्हणजे कोकाटेना अपात्र ठरवण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल केली असता, न्यायमूर्तींनी त्यांना अपात्र ठरवण्यास नकार दिला. काय तर म्हणे त्यांना अपात्र ठरवल्यास तिथे पुन्हा निवडणूक घ्यावी लागेल. त्यासाठी सरकारचा पैसा खर्च होईल .उद्या एखाद्या मंत्र्याने कुणाचा तरी खून केला किंवा एखाद्या महिलेवर बलात्कार केला आणि न्यायालयाने त्याला दोषी ठरवले तरी तो मंत्रिमंडळात राहू शकतो. त्याला आमदार म्हणून अपात्र ठरवता येत नाही. काय तर म्हणे पुन्हा निवडणूक घ्यावी लागेल सरकारचा पैसा खर्च होईल. महाराष्ट्रात सत्तांतर घडवून आणण्यासाठी ज्या आमदारांनी पक्षांतर केले. त्यांना अपात्र ठरवण्या बाबतच्या याचिकेवरील निर्णय अजूनही प्रलंबित असल्याचे समजते. हे जर अशा प्रकारचे निकाल दिले जाणार असतील तर लोकांनी न्यायालयावर कसा आणि का विश्वास ठेवावा? एकतर न्यायालयात वर्षेनवर्ष खटले प्रलंबित असतात. सतत तारीख पे तारीख चां खेळ सुरू असतो. आणि न्यायासाठी अनेक वर्ष वाट पहिल्या नंतर जर न्यायालय असे न पटणारे निकाल देणार असेल तर, लोक यापुढे न्यायालयात जाण्या एवजी सरळ कायदा हातात घेतील. आणि तसे झाले तर काय परिस्थिती निर्माण होईल याची कल्पनाही करवत नाही. म्हणूनच जे निकाल पटणार नाहीत त्याविरुद्ध केवळ वरच्या न्यायालयात अपील करुन् चालणार नाही तर, अशा निकालांच्या विरुद्ध लोकशाही मार्गाने आंदोलन करून अशा चुकीच्या निकाला विरुद्ध आवाज उठवायला हवा.तरच लोकशाही आणि न्यायपालिका किमान लोकांच्या दबापुढे का होईना टिकून राहील. वास्तविक परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे त्यामुळे प्रत्येक गोष्टीत काळानुरूप बदल व्हायलाच हवेत.दुर्दैवाने आपल्याकडे तसे प्रयत्न होताना दिसत नाहीत. खुद्द घटनाकार डॉ.आंबेडकर यांना असे बदल अपेक्षित होते पण ते झाले नाहीत.त्यामुळे जुनाट कायदे नवीन गुन्ह्यांना पायबंद घालू शकत नाहीत. परिणामी गुन्हेगारांवर कायद्याचा वचक राहिलेला नाही. त्यातच आजकाल न्यायपालिकेत सुधा सत्ताधाऱ्यांचा हस्तक्षेप वाढलेला आहे. अशा स्थितीत न्यायाधीशांवर सुधा निकाल देताना दडपण असते शिवाय न्यायपालिकेलाही भ्रष्टाचाराची वाळवी लागलेली आहे.अशा स्थितीत न्यायालयाकडून चांगल्या आणि निरपेक्ष न्यायाची अपेक्षा कशी करता येईल. न्यायदान निरपेक्ष व्हावे आणि कायद्यात बदलत्या काळानुसार बदल व्हायला हवा तरच लोकांना खऱ्या अर्थाने न्याय मिळू शकेल. वास्तविक न्याय पालिकेशी संबंधित लोकांनी ही बाब सरकारच्या निदर्शनास आणून द्यायला हवी कारण सर्वसामान्य जनतेचा आवाज सरकारपर्यंत पोहचत नाही. आणि ही वस्तुस्थिती आहे.परंतु त्याचबरोबर कायद्यात सुधारणा होणे आणि न्यायाधीशांची मानसिकताही बदलणे गरजेचे आहे.कारण एखाद्या पीडित माणसाच्या समोर न्यायालय हा दाद मागण्याचा अंतिम पर्याय असतो अशावेळी तिथेही जर न्यायालयाकडून त्याची निराशा झाली. तर नाईलाजाने त्याला कायदा हातात घ्यावा लागतो. म्हणूनच लोकांवर ती वेळ येऊ नये याच विचारसरणीत करायला हवा.

## भविष्यवेधी विकास आणि तंत्रज्ञानाधरीत नियोजन प्रक्रियेतील गतिमानतेसाठी 'महाटेक' संस्था उभारावी –मुख्यमंत्री फडणवीस



**मुंबई/प्रतिनिधी**

भविष्यवेधी विकास आणि नियोजन प्रक्रियेत गतिमानता आणून एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेच्या उद्दिष्टपूर्ततेला चालना देण्यासाठी राज्यातील भूस्थानिक (Geo-spatial) तंत्रज्ञानाची आणि माहिती तंत्रज्ञानांची सांगड घालून व्यवस्था बळकट करण्यासाठी महाटेक' संस्थेची निर्मिती करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. भू स्थानिक (Geo-spatial) तंत्रज्ञानासंदर्भात विधीमंडळातील कार्यालयात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. मुख्य वन संरक्षक रविकिरण गोवेकर यांनी यावेळी सादरीकरणाद्वारे भू स्थानिक (Geo-spatial) तंत्रज्ञान आणि अवकाश तंत्रज्ञानाच्या प्रशासनातील वापरासंदर्भात केंद्र शासनाची स्वायत्त संस्था असलेल्या भास्कराचार्य राष्ट्रीय अवकाश अनुप्रयोग आणि भू-माहितीशास्त्र संस्था व महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटरसंबंधीचे सादरीकरण केले. लोकाभिमुख, पारदर्शक प्रशासन आणि विकासात्मक गती वाढविण्यासाठी तसेच शासकीय विभागांची नियोजन प्रक्रिया, मालमत्ता व्यवस्थापन आदींसाठी भू स्थानिक माहितीची जोड देणे आवश्यक असून त्यासाठी अवकाश तंत्रज्ञानाचा (स्पेस टेक्नॉलॉजीचा) वापर करण्यासाठी महाटेक' ही संस्था महत्त्वाची भूमिका बजावेल. 'महाटेक'च्या उभारणीसाठी केंद्र शासनाची स्वायत्त संस्था असलेल्या भास्कराचार्य राष्ट्रीय अवकाश अनुप्रयोग आणि भू-माहितीशास्त्र संस्थेची (भास्कराचार्य नॅशनल इस्टिट्यूट फॉर स्पेस ॲप्लिकेशन अँड जिओ इन्फॉर्मेटिक) सुरुवातीच्या काळात सल्लागार म्हणून मदत घ्यावी. महाटेक, माहिती तंत्रज्ञान आणि एमआरसॅक यांचे इंटिग्रेशन करून सर्व विभागांच्या समन्वयाने कामास गती देता येईल, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले. राज्यात महाराष्ट्र रिमोट सेन्सिंग ॲप्लिकेशन सेंटर (एमआरसॅक) ही संस्था कार्यरत आहे. राज्यातील नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन आणि देखरेख करण्यासाठी तसेच शहरी समाजातील विकास आणि बदलांसाठी अवकाश तंत्रज्ञानाचा वापर आणि अंमलबजावणी करण्याचे काम ही संस्था दीर्घ काळापासून करत असून या संस्थेकडे मोठ्या प्रमाणात डेटा आहे. मात्र, त्याचा योग्य उपयोग होण्यासाठी नागपूर व पुणे केंद्राचे सक्षमीकरण आणि बळकटीकरण करण्यात यावे. त्यासाठी या संस्थेसाठी नागपूर येथे स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच मुंबईमध्येही आधुनिक उपकेंद्र सुरू करावे, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले. राज्यात प्रधानमंत्री गतीशक्ती योजनेची व्याप्ती वाढविण्यासाठी गतीशक्तीचा वेगळा सेल नियोजन विभागात निर्माण करावा, असेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, वित्त विभागाचे प्रधान सचिव सौरभ विजय, माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव पराग जैन नानुटीया, उद्योग विभागाचे सचिव पी. अन्बलगन आदी यावेळी उपस्थित होते.

## टीसीएस आणि एअर न्यूझीलँड यांच्यात एआय-सक्षम परिवर्तनासाठी भागीदारी

**मुंबई/प्रतिनिधी**

टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (TCS) आणि एअर न्यूझिलँड यांनी पाच वर्षांची भागीदारी जाहीर केली आहे. या कराराअंतर्गत, टीसीएस एअरलाइनच्या डिजिटल पायाभूत सुविधा सुधारणार असून, एआय-सक्षम नवकल्पना आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी सहाय्य करणार आहे. या सहयोगामुळे एअर न्यूझिलॅडच्या डिजिटल क्षमता वाढणार असून, प्रवासी अनुभव सुधारेल आणि तांत्रिक कार्यक्षमता मजबूत केली जाईल. यामध्ये फ्लिट मॅनेजमेंट, क्रू शेड्युलिंग आणि ग्राउंड सर्व्हिसेस यांसारख्या प्रमुख सेवा क्षेत्रांचा समावेश आहे. मुंबईतील टीसीएस येथे झालेल्या कराराच्या औपचारिक घोषणेसाठी न्यूझीलंडचे प्रधानमंत्री क्रिस्टोफर लक्सन, टाटा समूहाचे अध्यक्ष नटराजन चंद्रशेखरन, एअर न्यूझिलँडचे मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रेग फोरन आणि टीसीएसचे मुख्य कार्यकारी अधिकारी के. कृतिवासन आदी उपस्थित होते. न्यूझिलंडचे क्रिस्टोफर लक्सन म्हणाले की, टाटा समुहाने भारताच्या विकासात आणि उद्योगांच्या वृद्धीमध्ये मोठा प्रभाव टाकला आहे. न्यूझिलंड आंतरराष्ट्रीय स्तरावर गुंतवणुकीसाठी उत्सुक आहे. न्यूझिलंड आणि भारत या दोन देशांमधील आर्थिक संबंध अधिक दृढ करण्यासाठी उत्सुक असल्याचे त्यांनी सांगितले.



टाटा समुहाचे अध्यक्ष नटराजन चंद्रशेखरन म्हणाले की, भारतीय अर्थव्यवस्था अतिशय वेगाने वाढत आहे. त्याचबरोबर रस्ते, ग्रामीण भागातील सुविधा, गोदामे, बंदरे, सुविधा केंद्रे, विमानतळ, रूग्णालये आणि शाळा यांची गरज आहे. उत्पन्नाच्या संधी वाढत असून ही वाढ बऱ्याच काळ सुरू राहणार आहे. त्यामुळे न्यूझिलँड आणि भारत यांच्यातील व्यापार वाढेल आणि यात भारत सक्रिय सहभाग घेईल. एअर न्यूझिलँडचे मुख्य कार्यकारी अधिकारी ग्रेग फोरन म्हणाले की, टीसीएसच्या अत्याधुनिक तंत्रज्ञान कौशल्याचा वापर करून आम्ही ग्राहक अनुभव सुधारू, ऑपरेशन्स अधिक सुरळीत करू आणि सायबरसुरक्षा तसेच डेटा संरक्षण मजबूत करू. या भागीदारीमुळे आमच्या डिजिटल प्रवासाला गती मिळेल. टीसीएसचे मुख्य कार्यकारी अधिकारी के. कृतिवासन म्हणाले की, एअर न्यूझिलँड सोबत ही भागीदारी करताना आम्हाला आनंद होत आहे. आमच्या नवकल्पनाशील तंत्रज्ञानाच्या मदतीने एअरलाइन ऑपरेशन्समध्ये नवीन मानके प्रस्थापित करू. ही भागीदारी जागतिक स्तरावर डिजिटल परिवर्तनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल असेल. एअर न्यूझिलँडला डिजिटलदृष्ट्या प्रगत एअरलाइन बनविण्याच्या उद्देशाने ही भागीदारी करण्यात आली असून एआय, ऑटोमेशन आणि क्लाउड तंत्रज्ञानाच्या मदतीने एअरलाइनच्या कार्यपद्धती सुधारल्या जातील. त्याचबरोबर प्रवाशांसाठी अधिक वेगवान, सुरक्षित आणि सुलभ सेवा निर्माण करण्यात येणार आहेत. टीसीएसच्या कस्टमाइज्ड डिजिटल सोल्यूशन्सच्या मदतीने कार्गो सेवा, डिस्रप्शन मॅनेजमेंट, रिटेल ऑफरिंग्स, मेंटेनन्स सिस्टीम आणि क्रू ऑपरेशन्स यामध्ये मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्यात येणार आहे. टीसीएस ही गेल्या ३७ वर्षांपासून न्यूझीलंडमधील डिजिटल परिवर्तनासाठी विश्वासू भागीदार आहे. ऑकलंडमधील कार्यालयातून बँकिंग, रिटेल, बांधकाम, उत्पादन आणि स्थानिक प्रशासन क्षेत्रातील वीसपेक्षा जास्त प्रमुख कंपन्यांसाठी सेवा देत आहे. एअर न्यूझिलँड दरवर्षी १५ दशलक्षाहून अधिक प्रवाशांना सेवा देते, आणि आठवड्यातून ३ हजार ४०० हून अधिक उड्डाणे पार पाडते. या नव्या करारामुळे एअरलाइनच्या डिजिटल रीटेल आणि लॉयल्टी प्रोग्रॅम मध्येही सुधारणा होणार आहे. या महत्त्वाच्या भागीदारीमुळे एआय-सक्षम डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन च्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले असून, एव्हिएशन इंडस्ट्रीसाठी हा एक महत्त्वाचा टप्पा असेल.

## घरकुल योजनांमधील लाभार्थ्यांना एकसारखा निधी देण्याबाबत निर्णय घेऊ - अतुल सावे

मुंबई : राज्यात राबविल्या जाणाऱ्या विविध घरकुल योजनांमधून लाभार्थ्यांना वेगवेगळे अनुदान दिले जाते. या योजनांना एकसारखे अनुदान देण्याबाबत निर्णय घेण्याचे निर्देश विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले असून त्यानुसार मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत चर्चा करुन निर्णय घेण्यात येईल, असे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी विधानपरिषदेत सांगितले. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेतील पात्र लाभार्थ्यांना अनुदान मिळण्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता. या अनुषंगाने झालेल्या चर्चेदरम्यान सभापती प्रा. शिंदे यांनी निर्देश दिले. सदस्य सर्वश्री विक्रम काळे, एकनाथ खडसे, श्रीमती भावना गवळी यांनी या चर्चेत सहभाग घेतला. इतर मागास बहुजन कल्याण मंत्री श्री. सावे म्हणाले, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेतील पात्र लाभार्थ्यांना सध्या चार टप्प्यांमध्ये १.२० लाख रुपये दिले जातात. ही रक्कम वाढवून देण्याबाबत तसेच या घरकुलांना पाच ब्रास वाळू देण्याबाबत देखील मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात येईल. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील ३२९ लाभार्थ्यांची नोंदणी आवास सॉफ्ट प्रणालीवर करण्यात आली असून त्यापैकी २४१ लाभार्थ्यांना मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. त्यापैकी १७१ लाभार्थ्यांना १५ हजार रुपयांचा पहिला हप्ता वितरित करण्यात आला असून उर्वरित लाभार्थ्यांची पी एफ एम एस प्रणालीवर बँक खाते पडताळणी प्राप्त होताच पहिला हप्ता वितरित करण्यात येईल, असे श्री. सावे यांनी यावेळी सांगितले.

### विधानपरिषद प्रश्नोत्तरे

## वीज पुरवठा अधिक सक्षम करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरून नवीन प्रकल्प कार्यान्वित होणार – ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

मुंबई : राज्यातील वीज निर्मिती सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरून टप्प्याटप्प्याने नवीन प्रकल्प कार्यान्वित होत आहेत. तसेच भविष्यात वीज पुरवठा अधिक सक्षम केला जाईल, असे ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी विधानपरिषदेत सांगितले. राज्यात महानिर्मितीचे पाच संच बंद असल्याने विजेचा तुटवडा निर्माण होत असल्याबद्दल सदस्य मनिषा कायंदे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना राज्यमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर बोलत होत्या. राज्यमंत्री श्रीमती साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले की, वीज निर्मिती संच बंद असण्याची ही पहिली वेळ नसून नियमित देखभाल दुरुस्तीच्या कामांसाठी काही संच बंद ठेवावे लागतात तसेच तांत्रिक बिघाडांमुळे काही संच बंद राहतात. प्लान्ट लोड फॅक्टर (PLF) बाबत महाराष्ट्राचा दर हा देशातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वोच्च दर आहे. केंद्र सरकारच्या निर्देशानुसार २०३० पर्यंत काही जुने प्रकल्प चालू ठेवण्याची गरज आहे. त्यामुळे सरकार आणि खासगी वीज निर्मिती कंपन्यांची तुलना योग्य नाही, असे त्यांनी सांगितले. राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी स्पष्ट केले की, जानेवारी महिन्यात ८२.५ दशलक्ष युनिट वीज खरेदी करण्यात आली असून तिचा दर ३.३१ रुपये प्रति युनिट होता. हा दर खासगी कंपन्यांच्या तुलनेत अधिक नव्हता. तसेच, सरकारकडील जुने वीज प्रकल्प टप्प्याटप्प्याने नव्या तंत्रज्ञानाने अद्ययावत केले जात आहेत. भुसावळ येथे ६६० मेगावॅटचा नवीन प्रकल्प कार्यान्वित होत असून, चंद्रपूरमध्ये ८०० मेगावॅटचा प्रकल्प प्रगतीपथावर असल्याचे राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी सांगितले.

## फायबर बोटी वापरामुळे चालक व मालक यांची आर्थिक उन्नती

मुंबई : राज्यातील समुद्र किनाऱ्यांवर सध्या मोठ्या प्रमाणावर लाकडी बोटी वापरल्या जातात. त्यांचा वेग कमी असतो. त्यामुळे फेऱ्याही कमी होतात. त्याऐवजी फायबरच्या हलक्या बोटी वापरल्यास फेऱ्या वाढून बोट चालक आणि मालक यांचे उत्पन्न वाढेल व त्याची आर्थिक प्रगती होईल, अशी माहिती मत्स्य व्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी विधानपरिषदेमध्ये दिली. सदस्य मिलिंद नार्वेकर यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मत्स्य व्यवसाय मंत्री राणे बोलत होते. यावेळी सदस्य भाई जगताप, शशिकांत शिंदे, सचिन अहिर यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला. मत्स्य व्यवसाय मंत्री राणे म्हणाले की, राज्यात वर्षानुवर्ष लाकडी बोटी वापरली जात आहेत. त्याऐवजी फायबरची बोट वापरण्याचे शासनाचे धोरण आहे. बोट मालकांना नव्या फायबरच्या बोटी खरेदी करता याव्यात यासाठी त्यांना आर्थिक मदत करण्याचेही शासनाचे नियोजन आहे. मुंबई बँकेच्या सहकार्याने हे अर्थसहाय्य करण्यात येणार आहे. बोटधारकांचे उत्पन्न वाढविण्यासाठी विभाग प्रयत्नशील आहे. यासाठी सहकारी बँकांसोबतच खासगी आणि राष्ट्रीय बँकांचेही सहकार्य घेण्यात येईल. बोट धारक आर्थिक सक्षम होतीलच त्याशिवाय पर्यटन वाढीच्या दृष्टीनेही त्याचा फायदा होणार आहे. तसेच नीलकमल बोट अपघात प्रकरणी नौदल, पोलीस आणि बंदरे विभाग या तिन्ही विभागांकडून चौकशी सुरू आहे. चौकशी अंती दोषींवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असेही राणे यांनी सभागृहात सांगितले.

## नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना १२ हजार २६२ कोटींचा निधी वितरीत

मुंबई : राज्यात विविध नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असते. या नुकसान भरपाईसाठी यंदाच्या वर्षी आतापर्यंत १२ हजार २६२ कोटींचा निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच १३ हजार ३६१ कोटीचा निधी मंजूर करण्यात आला आहे, अशी माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी आज विधानपरिषदेमध्ये दिली. सदस्य परिणय फुके यांनी याबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री पाटील बोलत होते. यावेळी विरोधीपक्ष नेते आंबादास दानवे, सदस्य प्रविण दरेकर, सदाभाऊ खोत यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला. मंत्री श्री. पाटील म्हणाले की, विभागाच्या शंभर दिवसांच्या नियोजनामध्ये नुकसान भरपाईची रक्कम १०० टक्के वितरीत करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. राज्यात अनेक शेतकऱ्यांची बँक खाती ही आधार संलग्न नाहीत, तसेच ई केवायसीही शिल्लक आहेत. यासर्व गोष्टी युद्धपातळीवर पूर्ण करण्याचे नियोजन आहे. त्यासाठी आधार संलग्न बँक खाती नसलेल्या शेतकऱ्यांची यादी, ई केवायसी नसलेल्या खात्यांची माहिती चावडीच्या ठिकाणी प्रसिद्ध करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ही कामे पूर्ण झाल्यानंतर उर्वरित नुकसान भरपाईचे वितरणही तातडीने करण्यात येईल. कोणत्याही नुकसानग्रस्त शेतकऱ्याची भरपाईची रक्कम शिल्लक राहणार नाही, असेही मंत्री पाटील यांनी सभागृहात सांगितले.

## वाळू तस्करीला आळा घालण्यासाठी सर्वकष वाळू धोरण

मुंबई : वाळू तस्करीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सध्या राज्यात महसूल आणि पोलीस दलाकडून संयुक्त कारवाई करण्यात येते. परंतु राज्यात वाळू माफिया आणि वाळू तस्करीच्या घटना वाढतच आहेत. यासाठीच राज्य शासन सर्वकष वाळू धोरण तयार करणार आहे, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषदेमध्ये दिली. विरोधीपक्ष नेते अंबादास दानवे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री बावनकुळे बोलत होते. यावेळी सदस्य प्रविण दरेकर, शशिकांत शिंदे, एकनाथ खडसे यांनी चर्चेमध्ये सहभाग घेतला. राज्यात वाळू माफियांना आणि वाळू तस्करांना संरक्षण मिळणार नाही अशी ग्वाही देऊन मंत्री बावनकुळे म्हणाले की, गोदावरी खोऱ्यातील वाळू उपसाबाबत ७ दिवसात चौकशीकरून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल. राज्य शासन नव्या वाळू धोरणाबाबत काम करत असून यानुसार आता एम सॅन्ड म्हणजेच दगडापासून तयार केलेल्या वाळूच्या वापरावर भर देण्यात येणार आहे. यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात वाळू क्रशर उभारण्यात येणार आहे. त्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात किमान ५० ते १०० अशा प्रकारचे क्रशर उभारण्याचे नियोजन आहे. यामुळे वाळूची उपलब्धता वाढून सध्या वाळू पुरवठा आणि मागणीमध्ये असलेली तफावत दूर होणार आहे. त्यामुळे वाळू माफियांवर आपोआप नियंत्रण येईल. तसेच वाळू तस्करीबाबत महसूल व पोलीस अधिकारी यांना कारवाईचे समान अधिकार देण्याचाही वाळू धोरणामध्ये समावेश असणार आहे. वाळू धोरण तयार करताना लोकांच्या सूचनांचाही त्यामध्ये अंतर्भाव करण्यात आला आहे. त्याशिवाय रत्नागिरी, रायगड जिल्ह्यामध्ये सुरू असलेल्या सक्शनपंपाच्या सहाय्याने वाळू उपशाची चौकशी करून कारवाई करण्यात येईल, असेही मंत्री बावनकुळे यांनी सभागृहात सांगितले. तसेच सदस्य शशिकांत शिंदे यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री बावनकुळे म्हणाले की, सातारा जिल्ह्यातील खटाव येथील प्रकरणी विभागीय आयुक्तांमार्फत ७ दिवसात चौकशी करुन चौकशीमध्ये दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि.पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): **राम पाटोळे,** कायदेशीर सल्लागार : **ॲड.रूपेश शिंदे.** न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

24 TO 30 MARCH 2025 - Page 5 (CRIME SANDHYA):Layout 1 3/22/2025 7:39 PM Page 1



# जल जीवन मिशनअंतर्गत उभारलेल्या पाण्याच्या टाकीचा स्लॅब कोसळून दोन विद्यार्थिनींचा मृत्यू





**डहाणू/प्रतिनिधी**

जल जीवन मिशनअंतर्गत उभारलेल्या पाण्याच्या टाकीवर चढताना स्लॅब कोसळून दोन विद्यार्थिनींचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. डहाणू तालुक्यातील सुखडआंबा गावातील शिरसोन पाडा जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थिनी बरोबर घडलेल्या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. जिल्हा परिषद शाळेच्या पासून काही अंतरावर असलेल्या सुमारे ३० फूट उंचीच्या पाण्याच्या टाकीवर शालेय विद्यार्थी चढले होते. सायंकाळी ४:३० च्या सुमारास या टाकीच्या बांधकामावरील काही भाग कोसळल्याने हा अपघात घडल्याचे सांगण्यात येते. या अपघातामधील जखमींना सायवन प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रथम नेण्यात आले होते. त्या ठिकाणाहून त्याला कासा उपजिल्हा रुग्णालयात आणले असता दोन मुलींचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. हर्षला रघू पागी (११), इयत्ता सहावी आणि शिरसन संजना प्रकाश राव (१२), इयत्ता सातवी अशी असून रीना रशू फरारा (११) ही सहावीतील विद्यार्थिनी गंभीर जखमी आहे. जल जीवन मिशन प्रकल्पाचे काम ठेकेदार हरेश बोअरवेल यांच्याकडे होते. मात्र, या कामात हलगर्जीपणा झाल्याचे आरोप ग्रामस्थांनी केले असून पाण्याच्या टाकी उभारणीच्या कामाचा दर्जा निकृष्ट असल्याचे उघड झाले आहे. चळणी सुकडआंबा ग्रुप ग्रामपंचायत सरपंच सरिता भोई ग्रुप व ग्रामस्थांनी यांनी या घटना संदर्भात सखोल चौकशी करण्याची मागणी केली असून या दोषी ठेकेदार, संबधित पाणी पुरवठा विभागाचे अभियंता यांच्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

# महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्सच्या स्पर्धांना महिला वकिलांचा चांगला प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाच्या पार्श्र्वभूमीवर महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्स असोसिएशनच्या वतीने फक्त महिला वकिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या उपक्रमांचे आयोजन महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्सच्या अध्यक्षा ॲड. जयश्रीताई पाटील, ॲड. अरुणा वाघमारे, ॲड. वसुधा नाळापुरे, ॲड. अभिलाषा गवारे, ॲड.पल्लवी कुलकर्णी यांनी केले होते. जागतिक महिला दिन सर्वत्र विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा केला गेला. त्याच धर्तीवर महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्स असोसिएशनच्या वतीने लातूरमध्येही सांस्कृतिक व सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. तसेच महिला वकिलांसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धा, गायन स्पर्धा व कायदेविषयक विषयावर भाषण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांना लातूरच्या महिला विधिज्ञांनी भरभरून प्रतिसाद दिला. महिला विधिज्ञांना दैनंदिन कामकाजाच्या




ताणतणावातून मुक्त राहून त्यांच्यातील विविध कलागुणांना वाव देण्याच्या उद्देशाने या उपक्रमाचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून माजी क्रीडा अधिकारी मीरा पाटील, ॲड. किरण चिंते, ॲड. मीरा कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

परीक्षक म्हणून, ॲड. बबिता संकाये, जयाताई शिंदे, सुनेरा शिंदे या उपस्थित होत्या. पारितोषिक वितरणास ॲड. तेजस्विनी जाधव, ॲड. अनघा पाटील, लातूर वकील मंडळाच्या पदाधिकारी ॲड. मनिषा दिवे, ॲड. तृप्ती इटकरी यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमास ॲड. अंजली जोशी, ॲड. कल्पना भुरे, ॲड. सुरेखा शृंगारे, ॲड. सपना बोरा, ॲड. छाया मलवाडे, ॲड.प्रतिभा घोडके, ॲड. अपेक्षा जाधव, ॲड.कोमल राठोड, ॲड. प्रिया चव्हाण, ॲड.श्रद्धा पाटील, ॲड. सुरेखा डोके, ॲड. माया तादलापुरे, ॲड.आरती सुरवसे, ॲड.आयेशा शेख, ॲड. रेश्मा शेख, ॲड.कीर्ती जाधव, ॲड. नीतिशा गुराळे, ॲड. शितल जगताप, ॲड.कोमल गवळी, ॲड. काजल सुरवसे, ॲड. प्राजक्ता कुलकर्णी, ॲड.करिष्मा शेख, ॲड. मानसी शिंदे, ॲड. मानसी हाके, ॲड.सुचिता कोंपले, ॲड. तृष्णा सुरवसे आदी महिला विधिज्ञ उत्स्फूर्तपणे सहभागी झाल्या होत्या.

# औसा पोलिसांनी तेलंगण आणि ओडिसा राज्यातील गांजा तस्करांना अटक

**औसा/शिवाजी मोरे**

औसा शहर पोलीस ठाणे हद्दीतील महात्मा फुले नगर येथे गांजा विक्री करण्यासाठी आलेल्या तेलंगण आणि ओडिसा राज्यातील दोन गांजा तस्करांच्या मुस्क्या आवळत ११६ किलो गांजासह १५ लाख ८१,४०० चा मुद्देमाल जप्त करत असा पोलिसांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. औसा पोलिसांच्या या कारवाईमुळे औसा शहरासह परिसरातील गांजा तस्करांचे धाबे दणाणले असून सराईत गांजा तस्कर माफिया पोलिसांच्या रडावर आले आहेत. याप्रकरणी औसा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून फरार आरोपी परशुराम देविदास कांबळे याच्या मागावर पोलिसांचे एक पथक रवाना झाली आहे.




याबाबत पोलीस सूत्राकडून मिळालेली माहिती अशी की, दिनांक १९ मार्च २०२५ रोजी औसा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनिल रेजितवाड यांना गोपनीय आणी खात्रीलायक माहिती मिळाली की, औसा शहरातील महात्मा फुलेनगर येथे एक व्यक्ती त्याचे साथीदारसह राहते घरामध्ये स्वताच्या आर्थिक फायदयासाठी मानवी आरोग्यास अपायकारक असलेला मादक पदार्थ गांजा अवैधरित्या ताब्यात बाळगुन त्याची चोरटी विक्री करीत आहे. सदरची माहिती वरीष्ठांना कळवून शासकीय पंचसह महात्मा फुलेनगर,औसा येथे १६.२६ वाजता छापा मारला. सदर ठिकाणी एक संशयीत स्कार्पीओ वाहन क्रमांक ए.पी. २० एन. ३६३७ दिसुन आली. त्यामध्ये दोन इसम रमेश आर यादाईह (वय ४५ वर्ष रा. ओबलपुर, जाफरगड वरगंल राज्य तेलंगणा) व निबास लक्ष्मीकांत बडइ (वय ५४ वर्ष रा. एमपीव्ही ८२ मलकागिरी, मलाभरम राज्य ओडिसा) असे मिळून आले. सदर वाहनाची झडती घेतली असता सदर वाहनात मध्ये गांजाचे प्लॉस्टीकने रॅपींग केलेले पॉकीटे व मोबाईल मिळाले. त्यादोघाकडे अधिक चौकशी केली असता त्यांनी सदरचा गांजा परशुराम देविदास कांबळे (रा. फुलेनगर औसा) याने आमच्याकडून विकत घेतला असल्याचे सांगितले. त्यावरून परशुराम कांबळे यांचे घराची झडती घेतली असता त्याच्या घरातपण पाच प्लॉस्टीकच्या गोण्या मध्ये लाहन मोठ्या आकाराचे प्लॉस्टीकने रॅपींग केलेले पॉकीटे व गाडी मध्ये मिळून आलेले असे एकुण ६७ गांजाची पॉकिटे मिळून आले. ११६.१४ किलो ग्रॅम वजानाचा ओला व सुखा गांजा, एक सिल्वर ब्लॅक रंगाची महिंद्रा स्कार्पीओ क्रमांक ए.पी. २० एन. ३६३७, दोन मोबाईल फोन असा एकुण १५ लाख ८१ हजार ४०० रुपयेचा माल मिळून आला. नमूद आरोपी विरुद्ध पोलीस ठाणे औसा येथे गुरनं. १०८/२०२५ कलम २० गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोव्यापारावर परिणाम करणारे मादक पदार्थ अधिनियम १९८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून दोन आरोपीतांना सदर गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे. दरम्यान परशुराम देविदास कांबळे राहणार फुलेनगर औसा हा आरोपी फरार आहे. पोलीस त्याचा शोध घेत आहेत. सदरची कामगिरी लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक .सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे, औसा उपविभागीय पोलीस अधिकारी कुमार चौधरी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सुनिल रेजितवाड, सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब नरवटे, प्रमोद बोंडले, सफौ. संजय कांबळे, पोलीस अंमलदार रामकिशन गुटे,मुबाजोददीन सय्यद, मोतीराम घुले, भरत भुरे, गोविंद पाटील, बालीका सरवदे यांनी उत्कृष्ठरित्या पार पाडली आहे.

# लातूर कॉलेज ऑफ फार्मसीमध्ये माजी विद्यार्थी मेळावा



**औसा/प्रतिनिधी**

श्री वेताळेश्वर शिक्षण संस्था संचलित लातूर कॉलेज ऑफ फार्मसी महाविद्यालयाच्या वतीने आयोजित माजी विद्यार्थ्याचा मेळावा मोठ्या उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाला. या विद्यार्थी मेळाव्याच्या अध्यक्ष स्थानी संस्थेचे सचिव वेताळेश्वर बावगे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात संचालक नंदकिशोर बावगे, प्राचार्य डॉ.श्रीनिवास बुमरेला यांच्या शुभहस्ते सरस्वती मातेच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राचार्य डॉ.श्रीनिवास बुमरेला यांनी केले. यावेळी अनेक माजी विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयातील उत्तीर्ण होऊन गेलेले विद्यार्थी देशाच्या नामांकित कंपनीमध्ये कार्यरत आहेत तसेच स्वतःचा व्यवसाय, मार्केटिंग इत्यादी क्षेत्रामध्ये कार्यरत आहेत. याप्रसंगी संचालक नंदकिशोर बावगे यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर व सखोल असं मार्गदर्शन केले. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना भविष्यामध्ये स्वतःचा व्यवसाय करण्यासाठी अडचणीमध्ये संस्था व महाविद्यालय सदैव तुमच्या पाठीशी उभे आहे असं प्रतिपादन संस्थेचे सचिव वेताळेश्वर बावगे यांनी केले. दरम्यान या कार्यक्रमात माजी विद्यार्थी ऋत्विक पारशेट्टे याला उत्कृष्ट माझी विद्यार्थी या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सर्व माजी विद्यार्थ्यांचे शाल व बुके देऊन सत्कार करण्यात आले. या कार्यक्रमाला शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी व माजी विद्यार्थी उपस्थित होते.

# हत्तरचंद कुडल येथे नदीत बुडून युवकाचा मृत्यू

**सोलापूर/प्रतिनिधी**



सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तरसंग कुडल येथील भीमा नदीच्या पात्रात पोहण्यासाठी गेलेल्या युवकाचा पाण्यात बुडून मृत्यू झाल्याची घटना बुधवारी दुपारी चार वाजण्याच्या सुमारास घडले आहे. व्यंकटेश सतीश शिंदे (२६) असे मरण पावलेल्या युवकाचे नाव आहे. बुधवारी व्यंकटेश शिंदे हा आपले मित्र संतोष पद्माकर दीक्षित, विशाल किरण तपासे व प्रवीण गाभणे सर्व राहणार सोलापूर हे कुडल येथे देवदर्शनासाठी आले होते. यावेळी त्यांनी नदीत पोहण्याचा निर्णय घेतला हे चारही तरुण नदीपात्रात होत असताना यापैकी व्यंकटेश शिंदे याला पाण्याचा अंदाज न आल्याने नदीपात्रात बुडाला. यावेळी त्याच्या तिन्ही मित्रांनी शोध घेतला असता तो सापडला नाही. या घटनेची माहिती मिळताच मंद्रूप पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज पवार, सहाय्यक फौजदार संदीप काशीद, हवालदार संदीप काळे यांनी घटनास्थळी धाव घेतले. यावेळी पोलीस तसेच भोई समाजाचे पाच तरुण चिंचपूरचे पोलीस पाटील गावकरी यांनी पोहोच तसेच होडीद्वारे नदीत रात्रभर शोध घेतला असता तो सापडला नाही. गुरुवारी सकाळी पुन्हा शोध कार्य सुरू केले असता सकाळी आठ वाजता व्यंकटेश हा मृता वस्तीत मिळून आला व्यंकटेश यांच्या निधनामुळे त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखांचा डोंगर कोसळला आहे. व्यंकटेशा मेडिकल क्षेत्रात कार्यरत होता. त्यांच्या पश्चात आई-वडील, एक भाऊ, एक बहीण असा परिवार आहे. दरम्यान सध्या भीमा नदीत मोठ्या प्रमाणात पाणी येत आहे. त्यामुळे पाण्याचा अंदाज कोणाला येत नाही, ज्यांना पोहता येत नाही त्यांनी अजिबात नदीकाठी येऊ नये तसेच नदी पोहण्यासाठी कोणीही जाऊ नये अथवा विनाकारण कोणीही नदीपात्रात उतरण्याचा प्रयत्न करू नये, असे सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांनी सांगितले.

# मोखाडा तालुक्यात 'बोहाडा' उत्सव साजरा

**मोखाडा/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यातील अतिदुर्गम मोखाडा तालुक्यात होळीकोत्सवानंतर दुसऱ्या दिवसापासून आठ दिवस जगदंबा उत्सव (बोहाडा) साजरा करण्याची शेकडो वर्षाची अखंडित परंपरा आहे. धूलिवंदनापासून सुरुवात झालेल्या या उत्सवात सर्व जाती धर्मातील नागरिक सहभागी होतात. या उत्सवाचे शेवटचे काही दिवस शिल्लक आहेत. फाल्गुन वद्य प्रतिपदा ते वद्य अष्टमी असे आठ दिवस उत्सवाचे आहेत. धूलिवंदनालाच गणरायाच्या मिरवणुकीने उत्सवाला प्रारंभ झाला आहे. जगदंबा मंदिरासमोरील मंडपामध्ये गणरायाचे विधीवत पूजन करण्यात आले. द्वितीयेस मत्स्यावतार, तृतियेस कुर्मावतार, चतुर्थीला वराह अवतार, पंचमीस भीम- हिडींबा राक्षणीचा विवाह आणि भीम बकासुर युध्दाचा महाभारतातील प्रसंग, षष्ठीस लहान बोहाडा आणि सप्तमीला रात्री ८ ते अष्टमीच्या सकाळी ८ वाजेपर्यंत असा रात्रभर मुख्य बोहाडा ऊत्सव साजरा केला जातो. अष्टमीला सकाळी जगदंबेची भव्य महापूजा केली जाते. देवी-महिषासूर, शुंभ-निशुंभ यांच्या युध्दाचा थरारक प्रसंग -साकारला जातो. त्यानंतर जगदंबेची विजयी मिरवणूक काढली जाते. यावेळी रस्त्यावर प्रत्येक घरासमोर सडा, रांगोळी काढली जाते. देवीच्या मिरवणुकीत फुले, अक्षता, कुरमुरे व लाह्या ऊधळल्या जातात. त्यानंतर कुस्त्यांचा जंगी फड भरतो. यामध्ये कुस्त्यांची दंगल पहावयास मिळते. बोहाडा उत्सवात देव देवतांचे मुखवटे घालून, संबळच्या तालावर, टेंभ्याच्या प्रकाशात विशिष्ट तालावर सोंगे नाचवली जातात.

आदिवासी नागरी संस्कृतीचे प्रतिक म्हणून मोखाड्याचा बोहाडा संबंध महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे. आदिवासींच्या परंपरागत देवता, रामायण, महाभारत, रामविजय, विष्णुपुराण, पांडव प्रताप ईत्यादी धार्मिक ग्रंथातील देवता, या उत्सवासाठी निवडल्या गेल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे.

# वसई-विरार महानगरपालिकेच्या सहकार्याने अवयवदान चळवळीला मिळणार नवी गती!



**विरार/प्रतिनिधी**

द फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशनचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम पवार व त्यांच्या शिष्टमंडळाने १२ फेब्रुवारी २०२५ रोजी वसई-विरार शहर महानगरपालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार यांची भेट घेऊन अवयवदान, नेत्रदान, त्वचादान आणि देहदान केलेल्या कुटुंबियांचा नागरी सत्कार आयोजित करणे तसेच अवयवदान जनजागृतीसाठी महानगरपालिकेच्या वतीने विविध योजना राबविण्याबाबत विनंती अर्ज सादर केला होता. सदर मागण्यांच्या अनुषंगाने ४ मार्च २०२५ रोजी सकाळी आयुक्त कार्यालयात आढावा बैठक आयोजित करण्यात आली. अतिरिक्त आयुक्त संजय हेरवडे आणि वैद्यकीय आरोग्य उपायुक्त समीर भूमकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला क्रिडा विभाग, माहिती व तंत्रज्ञान विभाग, जाहिरात विभाग, उद्यान विभाग आणि मुख्य लेखा व वित्त अधिकारी उपस्थित होते. द फेडरेशन ऑफ ऑर्गन अँड बॉडी डोनेशनतर्फे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम पवार, ज्येष्ठ सल्लागार अशोक ग्रोवर, पालघर जिल्हा अध्यक्ष पायस मच्याडो, निलेश मिश्रा, सागर वाघ आणि सीमा राऊत उपस्थित होते. महापालिकेच्या वतीने अवयवदान केलेल्या कुटुंबीयांचा १ ऑगस्ट ते १० ऑगस्ट दरम्यान महापालिकेच्या सभागृहात नागरी सत्कार आयोजित करण्यात यावा. या कार्यक्रमात त्यांना सन्मानपत्र प्रदान करून त्यांच्या महान योगदानाची दखल घेण्यात यावी. महापालिकेने शाळा व महाविद्यालयांमध्ये अवयवदान विषयावरील निबंध, चित्रकला आणि वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करावे. मृत्यू प्रमाणपत्र (त्रीा ४अ) वर नेत्रदानासह त्वचादान व देहदानाचा उल्लेख करावा. महापालिकेच्या आरोग्य विभागातर्फे शाळा, महाविद्यालये, महापालिका कर्मचारी, पोलीस कर्मचारी, अंगणवाडी व आशा वर्कर्स यांच्यासाठी जनजागृतीपर कार्यक्रम आणि कार्यशाळांचे आयोजन करावे. वसई-विरार व पालघर जिल्ह्यात अवयवदानाविषयी जनजागृती वाढत असल्याने विशेषतः नेत्रदान आणि त्वचादानासाठी नागरिक मोठ्या संख्येने पुढे येत आहेत. ते स्वीकारण्यासाठी महापालिकेचे डॉक्टर कर्मचारी उपलब्ध करावेत. देहदान करू इच्छिणाऱ्या कुटुंबीयांना मृत्यूपत्र मिळण्यासाठी महापालिकेच्या डॉक्टरांनी त्वरित उपलब्ध करून द्यावे. महापालिकेची शववाहिनी सेवा विनामूल्य उपलब्ध करून द्यावी. शहरात प्रॅक्टिस करणाऱ्या डॉक्टरांच्या कन्सल्टिंग बाहेर अवयवदान माहिती असलेले बॅनर व पोस्टर्स लावण्याची अट घालावी. महापालिकेच्या परिवहन बसेसवर अवयवदानाचा प्रचार करणारे फलक लावावेत. स्मशानभूमी, कबरस्थान व ग्रेवयार्डमध्ये अवयवदानाबाबत माहिती फलक लावून जनजागृती करावी. शहरातील प्रमुख चौकांमध्ये बॅनर व पोस्टर्सच्या माध्यमातून अवयवदानाचा संदेश पोहोचवावा. महापालिकेच्या एखाद्या उद्यानाला 'अंगदानी गौरव उद्यान' असे नाव देऊन त्या ठिकाणी अवयवदान विषयक माहिती फलक किंवा शिल्प स्थापित करावे. अवयवदान करणाऱ्या व्यक्तींच्या स्मरणार्थ वृक्षारोपण करावे. अवयवदान जनजागृतीसाठी महापालिकेच्या अंदाजपत्रकात विशेष निधीची तरतूद करावी. नेत्रदान, त्वचादान, देहदान आणि अवयवदान याबाबत सविस्तर माहिती व संपर्क क्रमांक महापालिकेच्या अधिकृत वेबसाइटवर उपलब्ध करून द्यावा. फेडरेशनला या वेबसाइटवर माहिती अद्ययावत करण्याची सुविधा द्यावी. धार्मिक व सामाजिक संस्थांच्या सहकार्याने अवयवदान जनजागृती उपक्रम राबवन्यासाठी मंदिरे, चर्च, मशिदी आणि गुरुद्वारांमध्ये अवयवदानासंदर्भात माहिती पोहोचवावी. या मागण्या करण्यात आल्या त्यावर बैठकीत महानगरपालिका स्तरावर अवयवदान जनजागृती मोहिमेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ठोस निर्णय घेण्यात आले. अतिरिक्त आयुक्तांनी उपस्थित सहाय्यक आयुक्त तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रत्येक प्रस्तावाच्या अंमलबजावणीसाठी कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. मान्य झालेल्या या सकारात्मक निर्णयांची वेळेत अंमलबजावणी झाल्यास वसई-विरार शहरात अवयवदान चळवळीला विशेष गती मिळेल असा विश्वास पुरुषोत्तम पवार यांनी व्यक्त केला.

# घोडबंदर येथे केक तलवारीने कापल्या प्रकरणी तरुणावर गुन्हा दाखल

**भाईंदर/प्रतिनिधी**

काशीगाव पोलीस ठाणे हद्दीतील घोडबंदर येथे वाढदिवसाचा केक तलवारीने कापल्याप्रकरणी तरुणावर काशीगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करुण तरुणाला अटक केली आहे. मिरा- भाईंदर, वसई- विरार पोलीस आयुक्तालय हद्दीत महाराष्ट्र पोलीस अधिनियमानुसार मनाई आदेश जारी केले असून त्याद्वारे कोणत्याही इसमास शस्त्रे, तलवारी, भाले, बंदुका, लाठ्या किंवा शारिरीक इजा करण्यासाठी वापरण्यात येईल अशी कोणतीही वस्तू अथवा हत्यार, बाळगणे तसेच बरोबर घेऊन फिरण्यास मनाई करण्यात आलेली आहे. तरी देखील दुर्वेश वाघमारे याने ४ मार्च रोजी त्याच्या वाढदिवसानिमित्त घोडबंदर येथील मॉर्डेन कंपनीजवळ, घोडबंदरहून वेलकर नगरकडे जाण्यार्या रस्त्याचा कडेला तलवारीने केक कापून वाढदिवस साजरा केल्याची माहिती बुधवारी काशिगाव पोलीस ठाणे येथील गुन्हे प्रकटीकरण शाखेतील उपनिरीक्षक परदेशी यांना मिळाली. या घटनेची परदेशी यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश तोगरवाड यांना माहिती दिली असता त्यांनी कारवाई करण्याचे आदेश दिले. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक राणा परदेशी, पोलीस शिपाई किरण विरकर, नामदेव देवक्ते यांच्यासह मॉर्डन कंपनी घोडबंदर येथे गेले. दुर्वेश वाघमारे याच्या घरी गेले असता दुर्गेश घरीच मिळून आला. त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने वाढदिवशी तलावारीने केक कापला असल्याचे सांगितले. पोलिसांनी तलवार कोठे आहे याबाबत विचारणा केली असता त्याने तलवार माझ्याकडे आहे असे सांगितले. तलवार त्याच्याकडून घेवून त्याला ताब्यात घेतले. त्याच्या विरोधात भारतीय हत्यार कायदा कलमासह महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

24 TO 30 MARCH 2025 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 3/22/2025 7:40 PM Page 1



पान १ वरून....

## पत्नीवरच्या संशयामुळे सुडाने पेटला...

वाजण्याच्या सुमारास स्वरुपा टिकैती ही महिला चंदन नगर पोलीस ठाण्यात आली होती. तिने तिचा साडेतीन वर्षाचा मुलगा हिंमत टिकैती हा बेपत्ता असल्याची तक्रार नोंदवली. त्यानुसार पोलिसांनी अपहरणाचा गुन्हा दाखल करुन तपासाला सुरुवात केली होती. सुरुवातीला पोलिसांनी चौकशी सुरु केली तेव्हा मुलाचे अपहरण झाल्याचा संशय होता. तेव्हा पोलिसांनी अधिक खोलात जाऊन चौकशी केली असता मुलगा त्याच्या वडिलांबरोबर गेल्याची माहिती समोर आली. त्यानंतर वडील एका लॉजवर जाऊन झोपले होते. पोलिसांनी या लॉजचा दरवाजा तोडून माधव टिकैती याला ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता माधव टिकैती याने मुलाची हत्या केल्याची कबुली दिली. माधव टिकैती याने आपल्या साडेतीन वर्षांच्या मुलाला चाकू भोसकून ठार मारले. माधव टिकैती याने मुलाला ठार मारल्याची कबुली दिली आहे. त्याने मुलाचा मृतदेह जिथे टाकून दिला होता, ती जागाही पोलिसांना दाखवली. यानंतर पोलिसांनी मुलाच्या वडिलांविरोधात हत्या आणि पुरावा नष्ट करण्याचा गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणाचा पुढील तपास सुरु असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली. मात्र, प्राथमिक तपासात पती आणि पत्नी यांच्यातील भांडणातून माधव टिकैती याने आपल्या चिमुकल्या मुलाचा खून केल्याचे समोर आले आहे. आता पोलीस चौकशीत याप्रकरणाचा आणखी तपशील समोर येईल.

## दुचाकीच्या वादात होत्याचे नव्हते ...

मर्जीप्रमाणे आपल्या आई वडिलांना भावांना वागवित होता. मल्लिकअर्जुन आणि धाकटा महेश यांना सारखे सारखे काम मिळत नसल्याने घरात त्याचे काही चालत नव्हते. सगळे कसे श्रीकांत चालवित होता. त्याचा हुक्कमी एक्का घरात चालत होता. त्यामुळे त्याला कुणी जरा सर जरी म्हटले तरी तो त्याचेवर चिडत होता. एक तर तो मोठा असल्याने घरातील कारभार तोच करीत होता. त्यातच त्याला शिकारीचा नाद असल्याने तो कधी कधी आपल्या मित्रासह शिकारीला ही जात असल्याने त्याला त्या वसाहतीत शिकाऱ्या ही म्हणून ओळखले जात होते. त्याचा मधला भाऊ मल्लिकअर्जुन आणि त्याचे कधीच पटत नव्हते. दोघांची घरात सारखी भांडणे होत होती. त्यामुळे दोघाच्या ही बायकांना एकमेकांना पाण्यात बघत होत्या. त्यामुळे घरात शांतता ही नव्हती. नेहमी कोणाची ना कोणीची भांडणे ही होत होती. श्रीकांत याची बायको दीर मल्लिकअर्जुन आणि महेश यांना घालून पाडून बोलत होती. आपल्या नवऱ्याची कोणती ही गोष्ट ती त्या दोघांना वापरू देत नव्हती. घरात सगळ्यात मिळून एकच दुचाकी गाडी असल्याने मल्लिकअर्जुन हा ती गाडी नेहमी वापरत होता. खरे तर ती दुचाकी गाडी ही श्रीकांतची होती. त्याला कामावर जाताना किंवा बाहेर कुठे तरी जाताना ती गाडी लागत होती. त्यामुळे तो आपल्या दोन्ही भावांना आपल्याला न विचारता त्या गाडीला तो हात ही लावू देत नव्हता. तिघा ही भावांना दारू पिण्याचे व्यसन होते. त्यामुळे घरात दारू पिऊन आले की वादावादी ही व्हायचीच त्यातच श्रीकांत हा चिडखोर आणि तापट स्वभावाचा होता. त्याला त्या दोघांनी केलेली कोणतीही गोष्ट खपत नव्हती. यामुळे त्याचेत रोज भांडणे ही होत होती. अलिकडे तर मल्लिकअर्जुन हा जास्तच दारू पित होता. तो दारू पिऊन घरात आला की, त्याची मोठा भाऊ श्रीकांत याचेबरोबर भांडणे ही ठरलेलीच होती. या भांडणाला किरकोळ कारण ही पुरसे ठरत होते. त्यामुळे वसाहतीतील कुणी ही त्याची भांडणे सोडवायला येत नव्हते. श्रीकांत याची दुचाकी गाडी मल्लिकअर्जुन हा नेहमी घेवून फिरत होता. याचा राग श्रीकांत याला येत होता. गुरूवार दि.१३ मार्च रोजी गोव्यात होळीचा सण मोठया उत्साहात साजरा होत होता. या दिवशी मल्लिकअर्जुन हा नेहमीप्रमाणे श्रीकांत याची दुचाकी गाडी घेऊन गेलेला होता. सकाळी घेऊन गेलेली गाडी रात्री उशिरापर्यत त्याने घराकडे आणली नाही. त्यामुळे दिवसभर श्रीकांत याचे सगळी कामे खोळबुंन राहिलेली होती. त्याने दिवसभर मल्लिकअर्जुनला फोन लावलेला होता. त्याने त्याला कोणताही प्रतिसाद दिलेला नव्हता. एक तर फोन ही उचलत नाही आणि दुचाकी गाडी ही आणली नाही म्हणून तो मल्लिकअर्जुनवर चिडलेला होता. त्यातच रात्री १०.३०च्या दरम्यान मल्लिकअर्जुन हा दारूच्या नशेत झिंगतच भावाची गाडी घेऊन घरात आला. त्यावेळी चिडलेल्या श्रीकांत याने त्याला जाब विचारीत तु माझी गाडी मला न विचारता का नेलास अशी विचारणा करीत त्याला शिवीगाळ करू लागला. मोठा भाऊ श्रीकांत हा शिवीगाळ करीत असताना मल्लिकअर्जुन हा ही त्याला मारायला त्याच्या अंगावर जावू लागला. दोघात हाणामारी सुरू झाली. घरातील बायका त्याची भांडणे सोडवायला आली. परंतु ते दोघे ही कोणाचे ऐकायला तयार नव्हते. दोघे ही एकमेकांच्या अंगावर पडून एकमेकांना मारहाण करीत होते. त्यातच मल्लिकअर्जुन हा घरात गेलेला गेला आणि घरातून धारदार चाकू घेऊन बाहेर आला. त्याच्या हातातील चाकू बघून शेजारचे लोक त्याला अडवित होते. परंतु तो इतका पिसाळलेला होता की, तो श्रीकांत याला मारूनच टाकतो असे म्हणत होता. त्याने मागचा पुढचा विचार न करता खाली पडलेल्या श्रीकांत याच्यावर आपल्याकडील चाकूने सपासप वार केले. श्रीकांत हा रक्ताच्या थारोळ्यात ओरडत पडला तरी तो थांबला नाही. त्याला राग इतका अनावर झाला की, त्याने परत श्रीकांत याच्या पोटावर, छातीवर, हातावर वार केले. त्यामुळे श्रीकांत हा निपचिप रक्ताच्या थारोळ्यात पडला. त्याला तशा अवस्थेत पडलेला बघून घरातील बायका धायमोकलून रडू लागल्या. श्रीकांत याला मारून मल्लिकअर्जुन हा तेथून घटनास्थळी चाकू टाकून निघून गेला. घटनास्थळी पडलेल्या श्रीकांत याला तेथे जमलेल्या लोकांनी चिखली येथील उप जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. परंतु तेथील उपचारापूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे तेथील डॉक्टरांनी नातेवाईकांना सांगितले. या घटनेची माहिती मयत श्रीकांत याचा धाकटा भाऊ महेश घिवारी याने मुरगाव पोलीसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच मुरगाव पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटना स्थळाचा पंचनामा करून या घटनेची माहिती महेश धिवारी याच्याकडून घेतली. त्यामुळे ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे. आणि यातील संशयीत आरोपी कोण आहे याची माहिती पोलिसांना मिळालेली होती. घटनास्थळी पोलीस उपाधिक्षक गुरूदास कामत आणि पोलीस निरीक्षक धीरज देवीदास यांनी भेट दिली. घटनेनंतर संशयीत मल्लिकअर्जुन धिवारी हा घटनास्थळावरून पळून गेला असल्याने पो.निरी. देवीदास यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीसांचे एक पथक त्याचा शोध घेत होते. पोलीस त्याचा शोध घेत असताना तो दारूच्या नशेतच एके ठिकाणी पोलीसांना तो मिळून आला. त्याला ताब्यात घेऊन त्याचेकडे या घटनेची पोलिसांनी चौकशी केली असता त्याने नाही होय करीत आपला गुन्हा मान्य केला. त्याने आपला गुन्हा मान्य केल्यावर पोलीसांनी या घटनेची लेखी फिर्याद महेश घिवारी याच्याकडून घेतली. त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार मुरगाव पोलीसांनी श्रीकांत बसवराज घिवारी (वय ५०) याच्या खून प्रकरणी त्याचा मधला भाऊ मल्लिकअर्जुन बसवराज घिवारी (वय ४५) याच्या विरोधात भा.दं.वी. कलम १०३(१) प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला वास्को येथील कोर्टात उभे केले. मा.कोर्टाने त्याला दोन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस कोठडी दरम्यान पोलिसांनी मल्लिकअर्जुन याच्याकडून गुन्हयात वापरलेला चाकू जप्त केला. या घटनेचा पुढील तपास मुरगाव पोलीस स्टेशनचे पो.निरी. धीरज देवीदास याच्या मार्गदर्शनाखाली मुरगाव पोलीस करीत आहेत. दोन भावातील वाद हा होळीच्या सणाच्या दिवशी विकोपाला गेला. त्यातच रागाच्या भरात आणि दारूच्या नशेत धाकटया भावाने मोठया भावाचा खून केल्याने परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत होती. दारूची नशा करी जीवानाची दुर्दशा असे म्हटले जाते, परंतु पिणाऱ्याला त्याचे कोणतेच सोयर सुतक नसते तो गम हो खुशी म्हणून पितच असतो.नशेत असणाऱ्याचा ताळतंत्र राहत नसल्याने खूनासारख्या अशा घटना घडतात हेच या घटनेवरून दिसून येते.

## वांझपणाने पत्नीला आयुष्यभर रडवले...

अखेर शिल्लेगाव पोलिसांनी मृताची पत्नी भारती पमुसिंग पपैया (५१) हिस चौकशीसाठी ताब्यात घेतले. भारती यांनी नवऱ्याच्या खुनाची कबुली दिली. लग्न झाल्यापासून मुलबाळ होत नव्हते. त्यामुळे आमच्यात कायम खटके उडायचे, सतत भांडण व्हायचे. १३ मार्च रोजी देखील आमच्यात झाले. रात्री पलंगावर झोपेत असलेल्या नवऱ्याच्या डोक्यात दगड घालून खून केला. त्यानंतर मृतदेह घरातच असलेल्या पाण्याच्या हौदात ओढत नेऊन टाकला, अशी माहिती शिल्लेगाव पोलिसांनी दिली आहे.

## चोरीचा संशय त्याच्या प्राणावर बेतला...

एका खासगी रुग्णालयात दाखल केले. अनिल याला कोणी मारले याबाबत अजय आणि बैतुल्ला यांना मंडप व्यवसायिकाने विचारले असता, अनिल याने त्याचे बाराशे रुपये चोरल्याने त्याला मारहाण केल्याचे बैतुल्ला याने सांगितले. दरम्यान, रात्री १० वाजताच्या सुमारास अनिल याची उपचारा दरम्यान प्रकृती बिघडली. शनिवारी मध्यरात्री अनिलचा मृत्यू झाला. मंडप व्यवसायिकाने गोदामामधील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले असता, अनिल यास अजय आणि बैतुल्ला यांनी लोखंडी वस्तूने मारहाण केल्याचे दिसले. त्यानंतर मंडप व्यवसायिकाने याप्रकरणी नारपोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या आधारे गुन्हा दाखल झाला आहे.

## एक कोटी रुपयांचे अंमली पदार्थ जप्त

मिरा-भाईंदर : काशिगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत अंमली पदार्थ विक्री करता घेऊन आलेल्या तीन जणांना अमली पदार्थ विरोधी कक्ष पथकाने ताब्यात घेतले आहे. न्यू ओम कॉम्प्लेक्स बिल्डिंगकडून फर्स्ट स्टेप ग्लोबल स्कूलकडे जाणाऱ्या रोड वर अंमली पदार्थ विरोधी पथक पेट्रोलिंग करत असताना तीन व्यक्ती संशयास्पद स्थितीमध्ये आढळून आल्या. पोलिसांनी पंचांसमक्ष त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याकडे विक्रीकरिता घेऊन आलेला मेफेड्रोन आणि हेरॉईन नामक अंमली पदार्थ मिळून आले. यात एकूण तीन जणांना ताब्यात घेतले असून त्यात जगदीश दिवानसिंग कोहली यांच्या ताब्यात २७७.८ ग्राम वजनाचे ५५ लाख ४० रुपये किमतीचे मेफेड्रोन तर विजय चंद्रावत याच्या ताब्यात १२६ ग्राम वजनाचे २५ लाख २० हजार रुपये किमतीचे हेरॉईन व मोहम्मद जफर शेख याच्या ताब्यात १०८.३ ग्राम वजनाचे २१ लाख ६० हजार किमतीचे मेफेड्रोन असा एकूण १ कोटी ३ लाख ७६ हजार ३०० रुपये किंमतीच मुद्देमाल मिळून आला. तीन जणांना मुद्देमालासोबत ताब्यात घेण्यात आले आहे.

पान ८ वरून....

## सामूहिक शेतीला तंत्राची जोड देऊन ...

सेंद्रीय शेतीला समूह शेतीची, गट शेतीची जोड दिली पाहिजे. त्यातून नियोजित कल्स्टर उभं करता येईल. त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा या मूलमंत्रानुसार कार्य केले पाहिजे. जैन हिल्सच्या शेती संशोधन केंद्रातील शेती पाहून त्यातून कमी पाण्यातून उत्पन्न वाढीची शेती कशी करता येईल, शेत मालाचे संरक्षण आणि तंत्रज्ञानाचा वापर कसा करता येईल हे शिकले पाहिजे. संघटित होऊन गट तयार करून त्याला कंपनीचे स्वरूप दिले पाहिजे जेणे करून आपण विश्वासू पुरवठादार होऊ आणि सकारात्मक हेतूने संघर्ष हा आपला, कुटुंबाचा, राज्याचा आणि देशाच्या विकासासाठी केला पाहिजे असे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद म्हणाले. जैन इरिगेशनच्या करार शेतीचे प्रमुख गौतम देसर्डा यांनी कांदा, टोमॅटो, मिरची, हळद, लसूण, आलं यासह अन्य मसाले पिकांबाबतच्या करार शेतीची माहिती दिली. बारमाही शेतीसाठी फक्त घाम गाळून चालणार नाही तर आपण तंत्रज्ञानाची जोड दिली पाहिजे. ठिबक, स्प्रिंकलर्सच्या माध्यमातून विकास साधता येतो. शेती लहान असो की मोठी त्याला हवामान बदलाचा फटका बसतोय त्यावर तंत्रज्ञानातून मात करता येऊ शकते असे गौतम देसर्डा म्हणाले.

### सातपुडा सुजलाम् सुफलाम करूया -अशोक जैन

जैन इरिगेशनचे संस्थापक श्रद्धेय भवरलालजी जैन यांनी जैन हिल्स परिसरातील खडकाळ टेकड्यांवर अत्याधुनिक शेती विकसीत केली. जैन हिल्स ला अशी शेती उभी राहू शकते तर सातपुड्यामधील डोंगराळ भागातसुद्धा ती उभी राहू शकते हा आत्मविश्वास याठिकाणाहून वनहक्कधारक शेतकऱ्यांनी घेऊन जावा, गुणवत्ता, पारदर्शकतेतून जैन इरिगेशन, महाराष्ट्र शासन आणी आदिवासी बांधव यांनी एकत्रीत मिळवून सातपुड्याच्या डोंगररांगात सुजलाम् सुफलाम करण्याचा संकल्प केला पाहिजे असे मनोगत प्रमुख अतिथी म्हणून जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांनी व्यक्त केले. जिल्हा परिषद सीईओ मिनल करनवाल यांनी मनोगत व्यक्त करताना, शेतकरी नेहमी चिंतेत असतो शेतातील पिक येणार की नाही आले, तर बाजारात चांगला भाव कसा मिळेल मात्र जैन इरिगेशनने करार शेती करून हक्काचे मार्केट उपलब्ध करुन दिल्याने ते शेतकऱ्यांसाठी चांगले पाऊल असून त्याचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी फायदा करुन घ्यावे असे आवाहनही त्यांनी केले. शेतकऱ्यांच्या वतीने जनाबाई बारेला, मुस्तफा तडवी, पिंटु बारेला, फुलसिंग बारेला यांनी मनोगत व्यक्त केले. शेतकऱ्यांच्या वतीने ताराचंद बारेला, कस्तुरीबाई यांनी मनोगत व्यक्त केले. युनूस तडवी यांनी सूत्रसंचालन केले. संदीप पाटील यांनी आभार मानले.

## आदिवासी आणि दलितांच्या विकास...

असल्याची टीकाही हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. राज्यात शेतमालाला भाव नाही, शेतकरी संकटात आहे, बेरोजगारी वाढली आहे. नुकताच मांडलेल्या तुटीच्या अर्थसंकल्पामुळे खर्च आणि उत्पन्नाचा मेळ हुकल्याने विकास योजनांकरिता हे सरकार निधी देऊ शकत नाही. कायदा आणि सुव्यवस्था पूर्णपणे ढासळली आहे. मात्र या मुद्यांवरून लक्ष हटवण्यासाठी धार्मिक ध्रुवीकरणाचे राजकारण करत असल्याचे म्हणत, भाजप आणि संघाविरोधात आम्ही वैचारिक लढाई लढत असल्याचेही ते म्हणाले. यावेळी मागील ४० वर्षापेक्षा जास्त काळ कांग्रेसची विचारधारा वसई मध्ये पुढे नेणाऱ्या कांग्रेसच्या प्रमुख ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ ह्यांच्या हस्ते झाला. यामध्ये प्रामुख्याने अण्णासाहेब वर्तक सभागृह ट्रस्टचे अध्यक्ष विकासबंधू वर्तक, ट्रस्टी मोहन घरत, नेप डायस, आशिष फरेल, नवीन साळगावकर, सुभाष कुर्लेकर आणि रोहिणी कोचरेकर ह्यांचा समावेश होता. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, प्रदेश उपाध्यक्ष गणेश पाटील, प्रदेश सरचिटणीस विजय पाटील, वसई विरार जिल्हाध्यक्ष ओनिल आल्मेडा, प्रदेश सचिव कॅ. निलेश पेंढारी, मनिष गणोरे, जेष्ठ नेते विकास वर्तक, समीर वर्तक, रामदास वाघमारे, प्रविणा चौधरी, डॉ. दिनेश कांबळे, नितीन उबाळे, शहजाद मलिक, विल्फ्रेड दिसूझा, डॉमनिक डिमेलो, लक्ष्मी नायर, रतन तिवारी, निखिलेश उपाध्याय, अर्शद डबरे, प्रकाश पाटील आदी उपस्थित होते. सूत्र संचलन मीडिया प्रमुख संदीप फिगर आणि स्वागत विन्सेंट परेरा ह्यांनी केले. मोठ्या प्रमाणात कांग्रेस पदाधिकारी आणि कांग्रेस प्रेमी मेळाव्यासाठी उपस्थित होते.

## केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या...

त्यांनी सांगितले. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाची सायकल रॅली गुजरातमधील कच्छ येथील लक्षद्विप किल्ला आणि पूर्व किनारपट्टीवरील आणि पश्चिम बंगालमधील बक्खाली येथून दोन सायकल पथकांनी ही रॅली सुरू केली आहे. ९ राज्यातून किनारपट्टीवरील ६ हजार ५५३ किलोमीटरचा प्रवास करणार आहे. किनारपट्टी सुरक्षा, पर्यावरण रक्षण, भारताच्या आर्थिक समृद्धीचे रक्षण करण्याबाबत बांधिलकी दर्शवणे, स्थानिक मच्छीमार समुदायांना सागरी किनारा सुरक्षेबद्दल जागरूक करणे, त्यांना सुरक्षा यंत्रणांबरोबर जोडणे या उद्देशाने ही सायक्लॉनथॉन रॅली सुरू झाली आहे. या सायक्लोथॉनमध्ये १४ महिलांसह एकूण १२५ केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाचे कर्मचारी सहभागी झाले आहेत. सायकलस्वार भारताच्या किनारपट्टीच्या प्रदेशांमधून प्रवास करतील, ज्यामध्ये सूरत, मुंबई, गोवा, मंगळुरू, कोची, हल्दिया, कोणार्क, पारादीप, विशाखापट्टणम, चेन्नई, पुदुचेरी यांसारख्या शहरांचा समावेश आहे. दोन्ही पथके १ एप्रिल २०२५ रोजी तामिळनाडूमधील कन्याकुमारी येथील स्वामी विवेकानंद स्मारक येथे एकत्र येऊन रॅलीचा समारोप करतील.

## वसई तहसीलदारांना माहिती अधिकार...

अथवा नाकारली जाते अशावेळी सदर कार्यालयाचे प्रमुख म्हणून तहसीलदार हेच अपीलीय अधिकारी असणे आवश्यक असते, परंतु या ठिकाणी नायब तहसीलदारांना प्रथम अपिलीय अधिकारी तर माहिती अधिकारी म्हणून सहाय्यक महसूल अधिकारी अर्थातच वरिष्ठ लिपिक यांना करण्यात आलेले आहे. शासनाच्या नियमावलींना मोडून घेतलेल्या या निर्णयामुळे माहिती अधिकार कार्यकर्ते नाराज झाले आहेत. यापुढे एखाद्या प्रकरणात माहिती सादर न केल्यास कुठल्या अधिकाऱ्याला दंड आकारणी करायची ? किंवा राज्य माहिती आयोगाकडे दाद मागितल्यास माहिती न दिल्याचा ठपका कुणावर ठेवायचा? जिल्ह्यातील विविध तालुक्यात अपीली अधिकारी म्हणून तहसीलदारांना नियुक्त केले आहे. असे असताना वसई तहसील कार्यालयामध्ये वेगळा नियम का? असे अनेक प्रश्न निर्माण झालेले आहेत. याबाबत वसईचे तहसीलदार अविनाश कोष्टी यांना विचारणा केली असता, माहितीसाठी संबंधित विभागांची नियुक्ती केली आहे. तसेच अपीली अधिकारी म्हणून नायब तहसीलदार आहेत, अशी माहिती दिली आहे.

तहसीलदार कार्यालयाच्या या निर्णयामुळे अधिकारी व कर्मचारी यांच्यातच वेगवेगळे मताधिक्य आहेत. इतकेच नाही तर त्यांच्यात वाद-विवादही आहेत. माहिती अधिकाराचा काटेरी मुकुट आपल्या डोक्यावर परिधान करण्यास कुणीही सहसा तयार होत नाहीत. त्यामुळे अधिकारी व कर्मचारी वर्ग याबाबतच्या जबाबदाऱ्या व नियम सोयीनुसार किंवा शासनाच्या परिपत्रकानुसार दाखवत असतात. आता नव्या जबाबदारी व त्या स्वरूपाच्या फलकामुळे या कार्यालयाच्या माहिती अधिकार कायद्याचे निकषच बदलणार आहेत.

## पोद्दार हॉस्पिटल अँड ट्रॉमा केअर सेंटर...

येते. त्या पाणपोईचे उद्घाटनही शुक्रवारी मोफत अस्थिरोग शिबिरासोबत करण्यात आले. नागरिकांना पिण्याचे शुद्ध पाणी मिळावे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. डॉ.अशोक पोद्दार व देशमुख कुटुंबियांचे अतिशय स्नेहपूर्ण संबंध आहेत. या कौटुंबिक स्नेहापोटी दरवर्षी हा सामाजिक उपक्रम अग्रक्रमाने राबविण्यात येतो. आयोजित या शिबिरात एकूण ९६ रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले. यामध्ये ६० रुग्णांची हाडांची ठिसूळता, ४२ रुग्णांचे एक्सरे, ६५ रुग्णांची फिजिओथेरपी व २२ रुग्णांच्या रक्ताची तपासणी करण्यात आली. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना गृह पोलीस उपअधीक्षक गजानन भातलवंडे यांनी पोद्दार हॉस्पिटल आणि मोफत अस्थिरोग तपासणी शिबीर हे समीकरण आता सगळ्यांना माहिती झाल्याचे सांगितले. या हॉस्पिटलच्या वतीने सातत्याने अशा प्रकारच्या मोफत शिबिरांचे आयोजन केले जाते व त्याचा लाभ समाजातील सर्वच स्तरातील गरजू रुग्णांना होतो. या उपक्रमाबद्दल डॉ.अशोक पोद्दार यांचे व त्यांच्या सहकाऱ्यांचे कौतुक करावे तेवढे कमी असल्याची भावनाही पोलिस अपअधिक्षक गजानन भातलवंडे यांनी व्यक्त केली. माजी उपमहापौर कैलास कांबळे यांनी यावेळी बोलताना डॉ. अशोक पोद्दार यांना मोफत आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्याचा जणू छंद असल्यानेच ते नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणावरून शिबिरे घेतात असे सांगून त्यांच्या या रुग्णसेवेचा छंदाचा सामान्य, गरजू रुग्णांना मात्र चांगलाच फायदा होतो असे सांगितले. डॉ. चेतन सारडा यांनी आपल्या मनोगतात डॉ.अशोक पोद्दार यांच्यामुळे लातूरच्या रुग्णांना मोफत आरोग्य शिबिरांची माहिती प्राधान्याने झाल्याचे मत व्यक्त केले. रुग्णसेवेत नेहमीच अग्रेसर असणारे डॉ. अशोक पोद्दार सामाजिक जबाबदारी ओळखून अशा उपक्रमांना प्राधान्य देत असल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. डॉ. दीपक गुगळे यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी सिकंदर पटेल, अरुण कामदार, डॉ. अशोक पोद्दार, डॉ. इमरान कुरेशी, डॉ. पल्लवी जाधव, डॉ. निकिता ब्रिजवासी, डॉ. किरण तांदळे, डॉ. ऋषिराज दोरवे, डॉ. भोसगे, डॉ.अनिशा, डॉ. गायत्री बनसोडे, व्यवस्थापक वसीम शेख यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

## 'जायकवाडी'च्या पाण्यासाठी उद्या घेराव ...

त्याचे गांभीर्य अद्याप पर्यत ओळखले नाही. अशी खंत खा.जाधव यांनी रविवारी परभणीत आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेतून व्यक्त केली. जायकवाडीच्या स्थानिक पातळीपासून ते वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यत आपण पूर्ण क्षमतेने पाणी पुरवण्यासंदर्भात वारंवार बोलल्यानंतर त्या गोष्टीची दखल घेतल्या जात नसल्यामूळे सोमवारी जायकवाडीच्या कार्यालयास हजारो कार्यकर्ते व शेतकरी उद्या घेराव घालून टाळे ठोकतील, जायकवाडीच्या अभियंता या ज्वलंत प्रश्न विषयी जाणीव निर्माण करून देतील असा विश्वास खासदार जाधव यांनी व्यक्त केला. यावेळी शिवसेनेचे नेते गंगाप्रसाद आणेराव, सभापती पंढरीनाथ घुले आधी उपस्थित होते.

## पालघर जिल्ह्यातील ६०,२८८ घरकुल ...

असलेल्या ग्रामपंचायतींमध्ये विविध खातेप्रमुख व अधिकाऱ्यांच्या गावभेटीचे नियोजन करण्यात आले होते. जिल्ह्यात आणि डहाणू तालुक्यात गंजाड ग्रामपंचायत मध्ये सर्वाधिक म्हणजे ८६७ घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांनी सावरे एंबुर येथे महिलांशी चर्चा करत घरकुल योजनेच्या अंमलबजावणीबाबत मार्गदर्शन केले. तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक डॉ. रूपाली सातपुते यांनी महिलांना सूचना आणि मार्गदर्शन केले. तुमच्या स्वप्नातील घर साकारण्यासाठी आम्ही मदत करू, पण तुम्हीही सहकार्य करा. लवकरात लवकर घर बांधायला सुरुवात करा आणि घरकुल पूर्ण करा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांनी यावेळी लाभार्थ्यांना केले. घरकुल योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय अधिकारी, कर्मचारी, ग्रामसेवक, सरपंच आशा सेविका, अंगणवाडी सेविका आणि उमेद अभियानातील अधिकारी, सीआरपी ताई, गटांच्या महिला यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. घरकुल मार्टमुळे लाभार्थ्यांना साहित्य वेळेत आणि माफक दरात मिळणार असून, महिलांना रोजगाराच्या संधीही निर्माण होणार आहेत. त्यामुळे बांधकाम प्रक्रियेला वेग येणार असून, उद्दिष्ट लवकर पूर्ण होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुरू असलेल्या घरकुलांना भेटी देऊन नव्याने सुरू करण्यात येणाऱ्या घरांचे भूमिपूजन केले. तसेच ज्या लाभार्थ्यांची माहिती गुगल फॉर्म मध्ये भरली नसेल ती त्वरित भरून घेण्याचे आदेश यावेळी संबंधित कर्मचाऱ्यांना दिले.यावेळी पालघर गट विकास अधिकारी बापूराव नाळे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. तन्वीर शेख, ग्रामसेविका करुणा राऊत, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### 'घरकुल मार्ट' संकल्पना

घरकुल लाभार्थ्यांना घरकुलाच्या बांधकामासाठी आवश्यक साहित्य माफक दरात आणि वेळेत उपलब्ध व्हावे, यासाठी 'घरकुल मार्ट' संकल्पना राबवण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अभियान अंतर्गत स्थापन झालेल्या महिला ग्रामसंघाच्या माध्यमातून ही विक्री केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. यामुळे लाभार्थ्यांना त्यांच्या गावातच माफक दरात बांधकाम साहित्य मिळणार आहे आणि उमेदच्या महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

## सारशी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी ...

ठाकरे यांची सर्वानुमते बिनविरोध निवड घोषित करण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य दिपाली कोदे, नरेश फडवले, उज्वला बांगर, जितेश कोंढारी उपस्थित होते. नवनिर्वाचित उपसरपंच आरती ठाकरे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. फटाक्यांच्या आतषबाजीत ठाकरे यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. याप्रसंगी युवा कार्यकर्ते जयूर ठाकरे, अनिल ठाकरे ग्रामविकास अधिकारी अरुणा शेखर मडके आदींसह ग्रामस्थ व कर्मचारी उपस्थित होते.

## गावाच्या विकासासाठी महिलांनी...

अकादमीच्या माध्यमाने स्त्रीरोग आरोग्य शिबिर तसेच महिलांच्या भावनांचा आदर करत हळदी कुंकू समारंभाचे आयोज केले होते. या भव्यदिव्य मेळाव्यात वाडा पोलिस निरीक्षक दत्तात्रय किंद्रे तसेच पोलिस उपनिरीक्षक सुप्रिया मांढरे यांनी उपस्थित राहून महिलाना मार्गदर्शन केले. ग्रामपंचायत सदस्य तथा महिला मेळावा आयोजन समितीचे प्रमुख भरत जाधव आणि कुलदीप पाटील यांनी सदर कार्यक्रमासाठी नियोजनबद्ध आखणी करून पूर्णत्वास नेण्यासाठी परिश्रम घेऊन महिला सदस्या धनश्री पाटील, कल्याणी साठे, भावना रायात, स्मिता चिमडा, मनिषा मुकणे, कल्पेश आमले, निखिल पाटील यांच्या समवेत तसेच ग्रामपंचायत अधिकारी संजय पाटील व ग्रापंचायत कर्मचारी यांना सोबत घेऊन सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यात सहकार्य केले. सदर कार्यक्रमाप्रसंगी सरपंच साक्षी साठे, उपसरपंच सुप्रिया पाटील यांनी ग्रामपंचायत हद्दीतील दाई अर्थात सूइनबाई यांचा मान्यवरांच्या हस्ते मानपत्र, शाल, श्रीफळ देऊन यथोचित सन्मान करून समाजातील सर्व घटकाना उजेडात आणण्याचा स्तुत्य उपक्रम राबवून समाजाला नवीन दिशा देण्याचा प्रयत्न केला असे सूतोवाच गावाच्या पोलिस पाटील सीमा पाटील यांनी त्यांचे कौतुक करताना केले. या अतिशय सुंदर आणि दिमाखदार सोहळ्यासाठी सिनेअभिनेत्री रसिका धामणकर, वाडा पोलिस निरीक्षक दत्तात्रय किंद्रे , पोलिस उपनिरीक्षक सुप्रिया मांढरे, ठाणे जिल्हा परिषदेच्या माजी सदस्य दिव्य म्हसकर, सरपंच साक्षी साठे, उपसरपंच सुप्रिया पाटील, पोलिस पाटील सीमा पाटील, माजी ग्रामपंचायत सदस्या आरती पाटील, कविता गवारी, हर्षला पाटील, पाटील, मनिषा जाधव तसेच शेकडो महिला उपस्थी उपस्थित होत्या.

## सकल मातंग समाजाकडून विविध...

क्रांतिवीर लहुजी साळवे मातंग अभ्यास आयोगाच्या सरकारने स्वीकारलेल्या ६८ शिफारशीची आर्थिक तरतूद करून तत्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. अशा विविध मागण्या शासनाकडे प्रलंबित आहेत. शासनाने वेळीच मार्गी लावून समाजाच्या हितासाठी ठोस पावले उचलावे असे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना वसई तहसीलदार यांच्यामार्फत निवेदन देण्यात आले आहे. अगर येत्या जून महिन्यापर्यंत या मागण्या मार्गी नाही लागल्या तर मातंग समाजासह वंचित उपेक्षित जाती मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर उतरतील आणि सरकारच्या विरोधात उग्र आंदोलन करतील त्या सर्वच जबाबदार सरकार असेल असे सकल मातंग समाज पालघर जिल्हा प्रमुख रणधीर जी. कांबळे यांनी आपल्या निवेदनात व प्रसार माध्यमांना सांगितले आहे. वसई तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. यावेळी तालुक्यातील समाज बांधव कार्यकर्ता उपस्थित होते.

24 TO 30 MARCH 2025 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 3/22/2025 7:40 PM Page 1



# सेवा विवेक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी आणि खासदार डॉ.हेमंत सवरा यांनी राष्ट्रपतींची घेतली सदिच्छा भेट!



**वाडा/प्रतिनिधी**

पालघर जिल्ह्यातील बांबू हस्तकलेच्या माध्यमातून आदिवासी समाजाच्या सशक्तीकरणासाठी कार्यरत असलेल्या सेवा विवेक संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांची दिल्ली येथे सदिच्छा भेट घडवून दिली. या भेटीदरम्यान संस्थेच्या कार्याचा आढावा घेत विविध सामाजिक आणि विकासात्मक विषयांवर चर्चा करण्यात आली. गेल्या १४ वर्षापासून सेवा विवेक संस्था आदिवासी बांधवांना सन्मानजनक रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी कार्यरत आहे. संस्थेच्या वतीने महामहीम राष्ट्रपतींना पालघरच्या प्रसिद्ध बांबू कलेतून साकारलेली भेटवस्तू प्रदान करून सन्मानित करण्यात आले. राष्ट्रपती महोदया यांनी संस्थेच्या कार्याबद्दल कौतुक व्यक्त करत यापुढील वाटचालीसाठी मौलिक मार्गदर्शन केले. या विशेष प्रसंगी खासदार डॉ. हेमंत विष्णु सवरा, पदमश्री रमेश पतंगे- मार्गदर्शक सेवा विवेक, प्रदीप गुप्ता - संचालक सेवा विवेक, श्रीमती राजकुमारी गुप्ता - संचालिका सेवा विवेक, लुकेश बंड -मुख्य कार्यकारी अधिकारी बांबू हस्तकला, प्रगती भोईर मुख्य सक्षमता अधिकारी, व बांबू महिला कारागीर विद्या दळवी, दीपाली दांडेकर, संध्या दांडेकर भेटी दरम्यान उपस्थित होते.

# वहिनीची हत्या करून फरार आरोपीला २३ वर्षानंतर अटक

**वसई/क्राईम रिपोर्टर**



२३ वर्षांपूर्वी आपल्या वहिनीची हत्या करून फरार झालेल्या इसमाला मध्यवर्ती गुन्हे शाखेने अटक केली आहे. पोलिसांना चकमा देण्यासाठी तो ओळख लपवून डोंबिवली येथे रहात होता. विरार मध्ये राहणार्या फिरोज अन्सारी १९९७ मध्ये शबाना परवीन हिच्यासोबत लग्न झाले होते. मात्र हे लग्न फिरोजच्या कुटुंबियांना मान्य नव्हते. त्यांनी या लग्नाला विरोध केला होता. त्यामुळे शबाना परवीन ही गोवंडी येथे वेगळी रहात होती. दरम्यानच्या काळात फिरोज अन्सारी याने अफरीन बानू हिच्याशी दुसरे लग्न केले आणि विरार येथे राहू लागला. त्याला शबाना परवीन पासून ५ वर्षांचा मुलगा देखील होता. त्याने दोन्ही पत्नीसोबत संसार सुरू ठेवला होता. लग्नाच्या ५ वर्षानंतर म्हणजे ३ जून २००२ रोजी शबाना परवीन ही विरार येथे फिरोज अन्सारीच्या घरी ५ वर्षाच्या मुलाला घेऊन आली. त्यामुळे फिरोजच्या कुटुंबियांनी तिला विरोध केला. यावेळी झालेल्या भांडणात फिरोजचा मोठा भाऊ तरबेज आणि दुसरी पत्नी आफरीन या दोघांनी मिळून शबाना परवीनची धारदार शस्त्राने हत्या केली आणि त्यांच्या ५ वर्षाच्या मुलाला पळवून नेले होते. या प्रकरणी विरार पोलीस ठाण्यात ६ जून २००२ मध्ये हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. तेव्हापासून आरोपी तरदेब आणि आफरीन हे दोघे फरार होते. संवेदनशील आणि प्रलंबित गुन्ह्यांचा तपास करण्याचे आदेश पोलीस उपायुक्त (गुन्हे) अविनाश अंबुरे (गुन्हे) आणि सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) मिलिंद बल्लाळ यांनी गुन्हे शाखेला दिले होते. त्यानुसार या प्रकरणाचा तपास नव्याने मध्यवर्ती गुन्हे शाखेने हाती घेतला होता. त्यांनी आरोपी तरबेज याचे बिहार राज्यातील नालंदा जिल्ह्यातील चमन गाव गाठले. मात्र तेथून तरबेज डोंबिवली येथे रहात असल्याचे समजले. त्यानंतर पोलिसांनी डोंबवलीत त्याचा शोध सुरू केला. तेव्हा तो पोलिसांना चकमा देण्यासाठी ओळख बदलून रहात असल्याचे समजले. मध्यवर्ती गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक तपास करून तरबेज याला डोंबिवली येथून अटक केली. तब्बल २३ वर्षाने त्याला अटक करण्यात पोलिसांना यश आले. या प्रकरणात दुसरी आरोपी असलेली आफरीन हिला देखील लवकरच अटक केली जाईल, अशी माहिती मध्यवर्ती गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविराज कुराडे यांनी दिली. या आरोपीला अटक करण्यात माहिती मध्यवर्ती गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविराज कुराडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक दत्तात्रय सरक, नितीन बेंद्रे, प्रशांत गांगुर्डे, पुष्पराज सुर्वे आदींच्या पथकाने मोलाची भूमिका बजाबली.

# निष्कसनापूर्वी अतिक्रमण धारकांच्या झोपड्यांबाबत सुनावणी घेऊन पात्र अपात्रतेची कारवाई करा; प्रजा सुराज्य पक्षाचे प्रशासनाला निवेदन



**वसई/प्रतिनिधी**

वसई तालुक्यातील सरकारी जागेवरील व गायरान जमिनीवरील अतिक्रमणे निष्काशीत करण्यासंदर्भात तहसीलदार वसई यांनी अतिक्रमण धारकांना नोटीसी दिल्या आहेत. ह्या नोटीसीच्या अनुषंगाने वसई विरार शहर पालिका हद्दीतील गाव मौजे मालोंडे सर्व्हे नं. ३९ व ६९ तसेच वसई तालुक्यातील वसई विरार पालिका हद्दीतील अतिक्रमण धारकांवर कारवाई करण्याअगोदर महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाने २०१८ व २०१९ साली निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने अतिक्रमण धारकांच्या झोपड्याबाबत सुनावणी घेऊन पात्र अपात्रतेची कारवाई केल्याशिवाय कुठल्याही प्रकारचे अतिक्रमण निष्कषित करण्याची कारवाई करण्यात येऊ नये, असे निवेदन प्रजा सुराज्य पक्षाच्या वतीने तहसीलदार वसई तसेच उपविभागीय अधिकारी वसई आणि जिल्हाधिकारी पालघर यांना देण्यात आले. यावेळी पक्षाचे संस्थापक, अध्यक्ष अण्णासाहेब तिगोटे, सचिव शिवदास मोरे, सुरेश पुजारी, निलेश देशपांडे, गणीभाई, अनिल वाघेला, धर्मराज व्हटकर, दिपक माने इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुलीवर वडिलांकडूनच लैंगिक अत्याचार



**उल्हासनगर/प्रतिनिधी**

उल्हासनगर मध्यवर्ती पोलीस ठाण्याच्या हद्दीत अतिशय धक्कादायक प्रकार समोर आलाय. इथे पोटच्या ११ वर्षाच्या मुलीवर वडीलच लैंगिक अत्याचार करत होता. विशेष म्हणजे पोलिसांकडून प्रत्येक शाळेत जाऊन गुड आणि बॅड टच संदर्भात माहिती दिली जातीय.त्यामुळे अल्पवयीन मुलीला वडील आपल्या गैरप्रकार करत असल्याचं या लेक्चरच्या माध्यमातून समजलं. त्यानंतर या अल्पवयीन मुलीने आपल्या शिक्षिकेला वडीलांकडून रोज कशाप्रकारे लैंगिक अत्याचार केला जातो याची माहिती दिली गेली. शिक्षिकेने मुलीच्या आईला याची माहिती दिली. त्यानंतर आईने मध्यवर्ती पोलीस ठाण्यात वडिलांविरोधात तक्रार दिली. पोलिसांनी या संदर्भात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करून आरोपी वडिलाला अटक केलीय. पीडित मुलीची आई ही विभक्त राहते. त्यामुळे तिच्या दोन मुलींचा ताबा हा वडीलांकडे आहे. त्याच दरम्यान वडील या मुलीवर लैंगिक अत्याचार करत होता.

# पाण्यासाठी वाडा शहरतील सहयोग नगर रहिवास्यांची नगरपंचायत कार्यालयाला धडक



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा शहरतील सहयोग नगर येथे मागील अनेक वर्षापासून पाणी टंचाई असून याबाबत वारंवार तक्रारी अर्ज देऊनही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे. कार्यालयातील इंजिनिअर बघतो, करतो, अशी उडवाउडवीचे उत्तरे देवून वेळ मारुन नेत असतात. गेल्या दहा दिवसापासून नगरातील नळाला एक थेंबही पाणी आलेले नाही. आता मात्र तिव्र पाणी टंचाई सुरु असून पिण्याचे पाणी व वापरण्यासाठी सुध्दा पाणी विकत आणावे लागत आहे. पाण्यासाठी एवढा खर्च करावा लागला तर आम्ही नगरवासीयांनी जगाचे कसे असा संतप्त सवाल करत सोमवारी (दि.१७) सहयोग नगरतील महिलांनी वाडा नगरपंचायत कार्यालयाला धडक दिली. मात्र यावेळी मुख्याधिकारी मनोज पष्टे किंवा पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी सुद्धा कार्यालयात उपस्थित नव्हते. सहयोग नगरतील नागरिकांची पाणी समस्या कायमची सोडविण्या बाबत निवेदन देऊन लवकरात लवकर पाणी पुरवठा झाला नाही तर नगरतील महिला उपोषणाला बसतील असा इशारही निवेदनातून देण्यात आला आहे. यावेळी परिसरातील नागरिकही उपस्थित होते.

# घरफोडीचे पाच गुन्हे उघडकीस; सोनारासह तीन चोरट्यांना अटक

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सोलापूर शहर गुन्हे शाखेने सोनार व तीन चोरट्यांना गजाआड करून त्यांच्याकडून घरफोडीचे पाच गुन्हे उघडकीस आणून सुमारे साडेचार लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सोलापूर शहरांमध्ये मागील काही दिवसांमध्ये रात्रीच्या वेळी बंद घरांमध्ये चोरी करून ऐवज पळून नेत असल्याने हे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठांनी गुन्हे शाखेचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना मार्गदर्शन केले होते. त्या अनुषंगाने गुन्हे शाखेचे पथक आरोपींचा शोध घेत होते त्याचबरोबर शहरातील विविध ठिकाणावरून प्राप्त सीसीटीव्ही फुटेजची पाहणी करून त्यांचे तांत्रिक विश्लेषण केले. दरम्यान पथकास यातील आरोपी रुपा भवानी मंदिराच्या परिसरामध्ये स्मशानभूमी जवळ चोरटे येणार असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने सिद्धू शामराव काळे (३९), बजरंग नागनाथ चव्हाण (२९), नरसिंह नागप्पा बल्लारी, सचिन दामोदर सावंत (३५) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे विचारपूस केली असता सिद्धू काळे व बजरंग चव्हाण यांनी त्यांच्या इतर तीन साथीदारांसह मिळून फेब्रुवारी २०२५ मध्ये रात्रीच्या वेळी धनलक्ष्मी नगर जुना विडी घरकुल येथे घरपोडी करून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम चोरी केल्याची कबुलीत दिली. तसेच नरसिंह बल्लारी यांच्यामार्फत तिने त्यांच्या वाटणीस आलेले सोन्याचे दागिने सोनार सचिन दामोदर सावंत यास विक्री केले असल्याचे सांगितले. त्यानंतर आरोपी हे पोलीस कोठडीत असताना त्यांच्याकडे कौशल्यपूर्ण तपास केला असता या टोळीने एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीसह अन्य चार ठिकाणी रात्रीच्या वेळी घरफोडी केल्याची कबुली दिली आरोपी बल्लारी यांच्यामार्फत आरोपी सोनार सचिन सावंत यास हे सोने विक्री केल्याचे सांगितले आहे. आरोपी सिद्धू काळे व बजरंग चव्हाण यांच्याकडून ६२ हजार रुपये रोख रक्कम जप्त केली आहे. तसेच आरोपी सोनार सावंत यांच्याकडून चार गुन्ह्यातील चोरीस गेलेले सोन्याचे चांदीचे ३ लाख ९० हजारांचे ९६ ग्रॅम सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत. ही सदरची कामगिरी सोलापूर शहर पोलीस आयुक्त एम राजकुमार, पोलीस उपायुक्त दिपाली काळे, गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस आयुक्त राजन माने, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेश खेडकर, फौजदार अल्ताफ शेख, पोलीस अंमलदार बापू साठे, वसीम शेख, सुभाष मुंडे, राजकुमार पवार, विनोद रजपूत, इमरान शेख, उमेश पवार, सतीश काटे, बाळासाहेब काळे यांनी केली आहे.

# विकासकामांच्या मंजुरी प्रतीक्षेत विरार-मनवेलपाडा!

## बहुजन विकास आघाडीच्या शिष्ट मंडळाने घेतली वसई-विरार पालिका आयुक्तांची भेट

**विरार/प्रतिनिधी**



वसई-विरार महापालिका प्रभाग समिती 'बी' मधील नागरिकांना विविध सोयीसुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने आवश्यक विकास कामांना लवकर मंजुरी मिळावी, अशी मागणी बहुजन विकास आघाडीच्या शिष्टमंडळाने महापालिकेकडे केली. प्रभाग समिती 'बत्रमध्ये वॉर्ड क्रमांक २५, २६, २७, २८, ३० आणि ३७ चा समावेश होतो. मात्र मागील काही काळापासून या प्रभागांतील विकासकामे मार्गी लागलेली नाहीत. त्यासाठी माजी स्थायी समिती सभापती प्रशांत राऊत यांच्या नेतृत्त्वात नगरसेवक व कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाने महापालिका आयुक्त अनिल पवार यांची भेट घेतली आणि आपल्या मागणीचे निवेदन त्यांना सुपूर्द केले. आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद देत या विषयावर शिष्टमंडळासोबत सविस्तर अर्धा तास चर्चा केली. या वेळी पालिका बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता प्रदीप पाचंगे हेदेखील उपस्थित होते, अशी माहिती प्रशांत राऊत यांनी दिली. शिष्टमंडळाने सादर केलेल्या निवेदनात; मनवेलपाडा पाम मार्केट ते ऋषीविहारपर्यंत आरसीसी गटार व रस्ता डांबरीकरण करणे, पूनम बिल्डिंग ते डेक्कन बिल्डिंगपर्यंत आरसीसी गटार करणे, विवा निलगिरी टॉवर ते मोरया नगरपर्यंत आरसीसी गटार करणे, परिमल हॉस्पिटल ते तारवाडी नाल्यापर्यंत आरसीसी गटार करणे, विजयानंद पार्क ते तोंडारे हॉस्पिटलपर्यंत आरसीसी गटार, जळबाववाडी येथे आरसीसी कल्व्हर्ट करणे, मोहक सिटी ते ९० फिट मुख्य रस्त्यापर्यंत आरसीसी गटार व रस्ता डांबरीकरण करणे, डीमार्ट ते देशमुख फार्महाऊसपर्यंत जॉगिंग ट्रॅक बनविणे, ९० फुटी रोड ते संत ज्ञानेश्वर बिल्डिंगपर्यंत आरसीसी गटार करणे, तारवाडी येथे सार्वजनिक शौचालय बांधणे व विविध भागांत चेकअर्ड लादी लावणे अशा महत्त्वपूर्ण कामांचा समावेश केलेला आहे. दरम्यान; सार्वजनिक हिताच्या विकासकामांना लवकरात लवकर मंजुरी देण्यात येईल, असे आश्वासन शिष्टमंडळाला महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी दिले आहे, अशी माहिती माजी स्थायी समिती सभापती प्रशांत यांनी दिली. बहुजन विकास आघाडीच्या या शिष्टमंडळात माजी नगरसेविका चिरायू चौधरी, संगीता भेरे, हेमांगी पाटील आणि बहुजन विकास आघाडीचे कार्यकर्ते विनोद पाटील, किशोर भेरे, स्वप्नील पाटील, प्रणव चौधरी आणि सतीश म्हस्के यांचा समावेश होता.

# पाण्यासाठी कुठे साखळी उपोषण तर काही ठिकाणी मटकी फोडो आंदोलन





**प्रतिनिधी/सुनील तांबे**

उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर काही भागात पुरेसे पाणी मिळत नाही. नागरिक,पाणीपुरवठा विभागाचे लक्षवेधण्यासाठी लक्षवेधी आंदोलन करीत आहे. कुठे उपोषण तर कुठे मटके फोड आंदोलन. पाणी हे जीवन आहे.पाणी नाही मिळालेतर सगळे काही शून्य आहे. काही दिवसापासून अनियमित पाणीपुरवठा होत असल्या कारणाने नागरिक हैराण झाले आहे. काही भागात पाणी रात्री सोडण्यात येते. आणि काही भागात एक दिवसा आड पाणी सोडन्यात येते. नागरिकांना रात्रभर जागरण कराव लागत. रात्रभर जागरण करून सुद्धा नागरिकांना पाणी पुरेसे मिळत नाही. नागरिक पुरेसे पाणी मिळत नसल्याने नागरिक हवालदिल झाले आहे. उल्हासनगरमध्ये स्वराज्य संघटनेचे संस्थापक अध्यक्ष ॲड.जय गायकवाड यांचे मार्फत सुभाष टेकळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे प्रशासनाचे लक्ष केंद्रित करण्यासाठी मटकी फोडो आंदोलन करण्यात आले. या आंदोलनात समतानगर २, सुभाष टेकडी, सुभेदार रामजी आंबेडकर नगर (दहा चाळ) येतील बहुसंख्य नागरिक हिरहिरीने सहभागी झालेले दिसून येते होते. स्वराज्य संघटनेचे अध्यक्ष जय गायकवाड यांचे कडून, जर पाणीपुरवठा सुरळीत केला गेला नाही तर यापेक्षाही पाण्यासाठी तीव्र आंदोलन करू असा इशाराही देण्यात आला. यावेळी प्रभागातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

# औसा मोडवर बस-ट्रक अपघातात एकाचा मृत्यू

**औसा/प्रतिनिधी**

नागपूर-रत्नागिरी महामार्गावरील औसा टीपॉईंट येथे ए. टी बसला ट्रकने मागच्या कोपऱ्यात धडक दिल्याने झालेल्या अपघातात चौकात बसलेला भाजीविक्रेता शेतकरी ठार झाला. याबाबत अधिक माहिती अशी की नागपूर-रत्नागिरी महामार्गवरून औसा शहरात प्रवेश करणाऱ्या एसटी बसला पाठीमागून लातूर कडे जाणाऱ्या भरधाव ट्रक ने जोराची धडक दिली. बसच्या मागील भागाला जोरदार धडक बसल्याने मोडवर भाजीपाला विकण्यासाठी बसलेले तुकाराम बाजीराव जाधव (वय ५५ वर्ष राहणार करजगाव ता. औसा) यांच्या अंगावर बस आल्याने बसखाली दबून त्यांचा जागीच मृत्यू झाला. आपल्या उपजीविकेसाठी भाजी पाला विकण्यासाठी बसलेल्या निरापराध गरीब शेतकऱ्यावर काळाने घाला घातल्याने पाहणारे हळ हळ व्यक्त करीत होते. समोर चौक असतानाही आपले वाहन निष्काळजी पणे व वेगाने चालवून बसच्या मागच्या भागास धडक देऊन ट्रक तसाच पुढे वेगाने निघून गेला. अदयाप ट्रक व चालक फरार आहेत. याबाबत औसा पोलिसात अज्ञात ट्रॅकचालक विरोधात गुन्हा दाखल केला असून पुढील तपास औसा पोलीस करीत आहेत.

# 'पर्यावरणाचे रक्षण-माझी जबाबदारी' या अनुषंगाने वसई-विरार महापालिकेमार्फत कार्यशाळेचे आयोजन

**विरार/प्रतिनिधी**



वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरीकांसाठी शुन्य कचरा या संकल्पनेवर आधारीत पर्यावरणाचे रक्षण-माझी जबाबदारी या कार्यशाळेचे दि. १९ मार्च २०२५ रोजी वसई-विरार शहर महापालिका व विष्णू वामन ठाकूर चॅरिटेबल ट्रस्ट (संचालित) विवा महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने वसई-विरार शहर महानगरपालिका, मुख्यालय येथे पद्मश्री डॉ. शरद काळे, शास्त्रज्ञ (निवृत्त) भाभा एटॉमिक रिसर्च सेंटर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले. सदर कार्यशाळेत वसई-विरार शहर महानगरपालिकेचे मा. आयुक्त तथा प्रशासक अनिलकुमार पवार, मा. अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे, मा. उपायुक्त नानासाहेब कामठे आणि श्रीम. दिपा वर्मा, प्राध्यापिका, विवा कॉलेज तसेच मनपा क्षेत्रातील विविध गृह संकुल संस्थामधील नागरीक व वसई-विरार शहर महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यशाळेत पद्मश्री डॉ. शरद काळे यांनी शहरातील दैनंदिन निर्माण होणाऱ्या कचऱ्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणेकामी नागरीकांना प्रशिक्षण व मार्गदर्शन केले, तसेच घरगुती निर्माण होणाऱ्या कचऱ्यावर प्रक्रिया करुन घरच्या घरी नैसर्गिक खत तयार करणेबाबत प्रात्यक्षित दाखविले. तसेच शहरातील प्रत्येक नागरीकाने अशा प्रकारचे स्त्रोत्र पध्दतीने कचऱ्याची विल्हेवाट लावणेकामी शहरामध्ये ठिक ठिकाणी घरगुती कचऱ्याचे खत तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविणेसाठी ठिक ठिकाणी चौकी उभारणेबाबत महानगरपालिकेस सुचना केल्या.

24 TO 30 MARCH 2025 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 3/22/2025 7:41 PM Page 1



### 'जैन हिल्स'ला पेसा क्षेत्रातील वैयक्तिक वनहक्क धारकांच्या 'मसाला समूह' कार्यशाळा संपन्न

# सामूहिक शेतीला तंत्राची जोड देऊन जंगल समृद्ध करू -जिल्हाधिकारी




**जळगाव/प्रतिनिधी**

संघर्ष करून आदिवासी उभा राहत असतो आपल्याला चांगल्या कामासाठी संघर्ष करायचा आहे. यातून वैयक्तिक वनहक्क धारक आपण बनलात मात्र फक्त जमीन घेऊन विकास होत नाही तर ती कमी पाण्यात, कमी वेळेत, उपलब्ध नैसर्गिक संसाधनांचा वापर करून कशी नफ्याची करता येईल, यासाठी प्रयत्न केले पाहिजे. एकमेकांना सोबत घेऊन सामूहिक शेतीचे तंत्र समजून विश्वासू पुरवठादार होऊन जंगल व शेत समृद्ध करूया,' असे आवाहन जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी केले. जैन हिल्स येथे आदिवासी विकास विभागाच्या वतीने जैन इरिगेशनच्या सहकार्यातून आयोजीत पेसा क्षेत्रातील वैयक्तिक वनहक्क धारकांना (IFR) सामुहिकरित्या द्यावयाच्या योजनांच्या अनुषंगाने, क्षेत्रनिहाय समूह (Cluster/spice Cluster) 'मसाला समूह' तयार करणेबाबत आयोजीत कार्यशाळेत अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल, उपजिल्हाधिकारी अर्चना मोरे, लोकसंघर्ष मोर्चाच्या अध्यक्षा प्रतिभा शिंदे, जिल्हा कृषी अधीक्षक पद्मनाथ म्हस्के, पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ.प्रदीप झोड, अग्रणी बँकेचे प्रणवकुमार झा, मत्सविभागाचे अतुल पाटील, जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब अकलाडे, कृषी विज्ञान केंद्र महेश महाजन, प्रकल्प अधिकारी अरूण पवार, करार शेतीचे प्रमुख गौतम देसर्डा यांच्यासह विविध विभागातील अधिकारी व मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांच्या हस्ते दीपप्रज्वलन करुन व महापुरूषांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून कार्यशाळेची सुरवात झाली. दोन दिवसीय कार्यशाळेत रावेर, यावल, चोपडा तालुक्यातील पेसा क्षेत्रातील आदिवासी वनहक्कधारक शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. प्रत्येक विभागातील अधिकाऱ्यांनी शासनाच्या आदिवासी बहूल भागातील योजनांची माहिती दिली. प्रास्ताविक अरूण पवार यांनी केले. प्रतिभा शिंदे यांनी आदिवासी हे डोंगराशी लढून जगतो तो संघर्षातून रचनात्मक काम करतो. सातपुड्याच्या विकासात शेतीतून नंदनवन फुलवू आणि जंगल समृद्ध करू यासाठी जैन इरिगेशनच्या शेती संशोधन प्रात्यक्षिक केंद्रातील शेती करण्याची पद्धती आदिवासींनी समजून घेतली ती आत्मसात करून जीवनात परिवर्तन घडविण्याची ग्वाही त्यांनी दिली.

जिल्हाधिकारी पुढे बोलताना म्हणाले की, वैयक्तीगत वन हक्काच्या जमिनी मिळाल्यानंतर संबंधित आदिवासींच्या जीवनाच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न कायमचा सुटलेला दिसत नाही. धान्याऐवजी रोख भांडवल कसे मिळेल यासाठी प्रयत्न झालेले दिसत नाही. तीन सहा महिन्यांमधून उत्पन्न मिळत राहिले पाहिजे त्यापद्धतीने पीक पद्धत लागवड केली पाहिजे. ...पान ६ वर

# आदिवासी आणि दलितांच्या विकास योजनांवर सरकारचा कुऱ्हाडीचा घाव -हर्षवर्धन सपकाळ



**वसई/प्रतिनिधी**

केवळ मत मिळवण्यासाठी आणलेल्या लाडकी बहीण योजनेकरिता राज्य सरकारकडे आता पैसा नाही. त्यामुळे १० लाख लाडक्या बहिणींच्या नावांना कात्री लावली असून या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सरकारकडे पैसा नसल्याने आदिवासी विकास विभागाचा आणि समाजकल्याण विभागाचा निधी लाडकी बहीण योजनेसाठी वळवला जात असल्याचा आरोप प्रदेश काँग्रेसचे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. आदिवासी आणि दलितांच्या विकास योजनांवर कुऱ्हाड घातली असल्याचीही घणाघाती टीका सपकाळ यांनी यावेळी केली. प्रदेशाध्यक्षपदी निवड झाल्यानंतर प्रथमच हर्षवर्धन सपकाळ यांनी गुरुवारी पालघर आणि वसई विरारचा दौरा केला. यावेळी वसई काँग्रेस भवन येथे झालेल्या कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना त्यांनी राज्य सरकारवर आसूड ओढले. तत्पूर्वी सपकाळ यांच्या हस्ते विरार येथे काँग्रेस कार्यालयाचे उद्घाटन केले. वसईत हुतात्मा स्मारकाला भेट देऊन हुतात्म्यांना अभिवादन केले. त्यानंतर काँग्रेस भवन येथे लोकनेते अण्णासाहेब वर्तक यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली.

काँग्रेस सभागृहात प्रवेश करताना सुवासिनींनी त्यांना पारंपरिक कुपारी पद्धतीने त्यांचे औक्षण केले. उपस्थित कार्यकत्यांनी मोठ्या उत्साहात त्यांचे स्वागत केले. पालघरच्या डहाणूपासून सिंधुदुर्गपर्यंत असणाऱ्या विविध तेलसाठे, बॉक्साईट व अन्य खनिज संपत्ती ही अदानी आणि अंबानींच्या घशात घालण्याचा डाव सरकारचा आहे असा आरोप सपकाळ यांनी केला. केंद्र सरकार आणि भाजपशासित राज्यातील सरकार सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी धार्मिक ध्रुवीकरण करून समाजात फूट पाडत ...पान ६ वर

# केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या सायकल रॅलीचे वसईत पोलिसांकडून भव्य स्वागत!







**वसई/प्रतिनिधी**

सागरी किनाऱ्याच्या सुरक्षेसाठी निघालेल्या केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या सायकल रॅलीचे वसईत भव्य स्वागत करण्यात आले. महामार्गावरील पेल्हार आणि मांडवी पोलिसांनी या रॅलीच्या स्वागतासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले होते. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल (सीआयएसएफ)ने आपल्या ५६व्या स्थापना दिवसानिमित्त 'सुरक्षित तट, समृद्ध भारत' या संकल्पनेवर ग्रेट इंडियन कोस्टल सायक्लोथॉनचे आयोजन केले आहे. गुजराथ आणि पश्चिम बंगाल येथील दोन ठिकाणांहू ही सायकल रॅली निघाली आहे. ७ मार्च २०२५ गुजराथच्या कच्छ किनारपट्टीवरून निघालेल्या एका सायकल रॅलीचे वसईत भव्य स्वागत करण्यात आले. रॅलीतील केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलाच्या जवानांचे फुलांचा वर्षाव करून जल्लोषात स्वागत केले आहे. त्यांच्या स्वागतासाठी पेल्हार आणि मांडवी पोलिसांनी या रॅलीचे गोल्डन चॅरियट हॉटेल येथे एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी सायकलपटूंना सलामी दिली तर पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी गुलाबपुष्प देऊन त्यांचे स्वागत केले. यावेळी परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त जयंत बजबळे, वसईचे प्रांतअधिकारी शेखर घाडगे, तहसिलदार अविनाश कोष्टी, पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र वनकोटी, मांडवी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय हजारे उपस्थित होते. सीआयएसएफच्या अधिकाऱ्यांनी ही ऐतिहासिक सायकल मोहीम असल्याचे सांगितले. यामुळे किनारपट्टी भागातील सुरक्षा आणि जागरूकता अधिक मजबूत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बलाच्या जवानांचा शारिरीक क्षमता आणि मानसिक खंबीरतेच कस लावणारी ही रॅली असल्याचे ...पान ६ वर

# वसई तहसीलदारांना माहिती अधिकार कक्षेतून वगळले?

**माहिती अधिकाराच्या नवीन फलकावरून वाद विवाद**







**वसई/प्रतिनिधी**

मागील काही वर्षांपासून वसई तहसीलदार कार्यालयातील माहिती अधिकारी व अपिली अधिकारी यांच्याबाबतचा संभ्रम दूर करण्यासाठी माहिती अधिकार फलक लावण्याची मागणी करण्यात आली होती. बहुचर्चित व प्रलंबित असलेली या मागणीची पूर्तता आता करण्यात आली असली, तरी या फलकांद्वारे दस्तूर खुद्द तहसीलदारांना अपीली अधिकाराच्या पदावरूनच दूर केल्याचे स्पष्ट होत आहे. माहिती अधिकाराच्या कक्षेतून तहसीलदारांना डावल्यामुळे अनेक चर्चांना उधाण आले आहे. याबरोबरच माहिती अधिकाराच्या नेमून दिलेल्या परिपत्रके व नियमांना तिलांजली दिल्याचे स्पष्ट होत आहे. माहिती अधिकार कायद्यांतर्गत, जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या भूमिकेसाठी, तसेच माहिती देण्यासंबंधी नियमांसाठी, वेळोवेळी शासनाकडून परिपत्रक जारी केले जातात, जेणेकरून माहिती अधिक पारदर्शक आणि सुलभ होईल. महाराष्ट्रात माहिती अधिकार कायदा २००५ नुसार माहिती मिळवण्याची प्रक्रिया ठरवून दिली आहे. याद्वारे विविध शासकीय कार्यालयांमध्ये कनिष्ठ अधिकारी हे माहिती अधिकारी असतात तर वरिष्ठ अधिकारी हे अपिलीय अधिकारी असतात. याबाबतचे तपशील संबंधीत शासकीय कार्यालयाच्या प्रथमदर्शनी लावणे बंधनकारक असते. जेणेकरून संबंधित विभाग अथवा कार्यालयाचा कारभार पारदर्शक राहण्यास सहाय्य मिळू शकेल. मागील काही वर्षांपासून याबाबतचे फलक तहसीलदार कार्यालयातून गायब झाले होते. आता लावलेल्या नवीन फलका नुसार यातून तहसीलदारांनाच वगळण्यात आले आहे. अनेकदा नागरिकांना माहिती अधिकार अंतर्गत माहिती दिली जात नाही, दिशाभूल करणारी माहिती दिली जाते ...पान ६ वर

# पोद्दार हॉस्पिटल अँड ट्रॉमा केअर सेंटर आयोजित अस्थिरोग शिबिर




**लातूर/प्रतिनिधी**

येथील डॉ अशोक पोद्दार यांच्या पोद्दार हॉस्पिटल अँड ट्रॉमा केअर सेंटरच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही माजी वैद्यकीय शिक्षण मंत्री आ. अमित देशमुख यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या मोफत अस्थिरोग तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात एकूण ९६ रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले. या मोफत अस्थिरोग तपासणी शिबिराचे उदघाटन गृह पोलीस उपअधीक्षक गजानन भातलवंडे, माजी उप महापौर कैलास कांबळे, डॉ. चेतन सारडा, डॉ. दीपक गुगळे आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने मागच्या सन २००९ पासून दरवर्षी आ. देशमुख यांच्या वाढदिवसापासून नागरिकांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी या उद्देशाने थंड पाण्याच्या जारची पाणपोई सुरु करण्यात ...पान ६ वर

### सामान्यांच्या स्वप्नातील घरे साकारण्याचा महत्त्वाचा टप्पा पूर्ण

# पालघर जिल्ह्यातील ६०,२८८ घरकुल लाभार्थ्यांची भेट व संवाद



**पालघर/प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवस कृती कार्यक्रम अंतर्गत पालघर जिल्ह्यात ६०,८९२ घरकुलांना मंजुरी देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, त्यापैकी ६०,२८८ घरकुलांना मंजुर झाली आहेत. घरकुल लाभार्थी संवाद अभियान २०२५ स्वप्न घरकुलाचे साथ शासनाची या उपक्रमांतर्गत आज अधिकाऱ्यांनी लाभार्थ्यांसोबत संवाद साधला. या ऐतिहासिक अभियानाचा शुभारंभ आज मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक डॉ. रूपाली सातपुते, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर जगताप, तसेच जिल्हा परिषदेचे सर्व विभागप्रमुख, गटविकास अधिकारी आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत जिल्हाभरात पार पडला. तसेच जिल्ह्यात उमेद अभियाना मार्फत सुरू करण्यात आलेल्या घरकुल मार्ट चे देखील उद्घाटन करण्यात आले. गंजाड (डहाणू), चिंचघर (विक्रमगड), गारगाव (वाडा), उपलाट (तलासरी), आसे (मोखाडा), रायतळे, कासाटवाडी (जव्हार), भाताणे (वसई) आणि सावरे एंबुर (पालघर) येथे घरकुल मार्ट सुरू करण्यात आली आहेत. एम्बुर येथील घरकुल मार्टचे उद्घाटन मुख्य कार्यकारी अधिकारी भानुदास पालवे यांनी तर गंजाड येथील उद्घाटन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात ६,०२९ अधिकारी व कर्मचारी मानधनी कर्मचारी व तसेच, जिल्हास्तरीय ३१ वरिष्ठ अधिकाऱ्यांना जबाबदारी सोपवण्यात आली आहे. जिल्ह्यातील २०० किंवा त्यापेक्षा अधिक घरकुल उद्दिष्ट ...पान ६ वर

# 'जायकवाडी'च्या पाण्यासाठी उद्या घेराव आंदोलन -खा.संजय जाधव



**परभणी/लक्ष्मण उजगरे**

जायकवाडीच्या जलाशयातून परभणी जिल्ह्यातील टेलपर्यंत पूर्ण क्षमतेने कालव्याद्वारे पाणी सोडावे या मागणीसाठी शिवसेनेचे खासदार संजय जाधव हे सोमवारी जायकवाडी पाटबंधारे प्रकल्पाच्या कार्यालयास हजारो कार्यकर्त्यासह घेराव घालून टाळे ठोकणार आहेत. जायकवाडीच्या जलाशयातून डाव्या कालव्याद्वारे मोठ्या प्रमाणात पाणी सोडले गेले आहे. परंतु हे पाणी परभणी जिल्ह्यातील लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांपर्यंत पोहचले नाही. परभणीच्या वरच्या भागातील काही उपद्रवी त्या त्या भागातील तलाव, सिंचन प्रकल्पांतून हे पाणी खेचून घेऊ लागले आहेत. त्याचा परिणाम जायकवाडी कालव्यातील पाणी परभणी जिल्ह्यातील पाथरीच्या पुढे सरकेनाशे झाले आहे. यामुळे जिल्ह्यातील हजारो हेक्टर लाभ क्षेत्र, हजारो शेतकरी पाण्यावाचून वंचित आहेत. आपण जायकवाडीच्या मुख्य अभियंत्यांना या सर्व गोष्टी निदर्शनास आणून दिल्या, परंतु मुख्य अभियंत्यांनी...पान ६ वर

# सकल मातंग समाजाकडून विविध मागण्यांसाठी मुख्यमंत्र्यांना निवेदन




**वसई/प्रतिनिधी**

सकल मातंग समाज पालघर जिल्हा, वसई, विरार, नालासोपारा या भागातील शेकडो समाज बांधव वसई तहसीलदार कार्यालयावर धडकले व शांततापूर्वक पद्धतीत समाजाच्या शिष्टमंडळाने वसई तहसीलदार यांच्याद्वारे मुख्यमंत्र्यांना आपल्या विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

१ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार अनुसूचित जातीतील आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याचा अधिकार राज्य सरकार यांना बहाल करण्यात आला आहे. त्यानुसार आपल्या सरकारने सेवानिवृत्त न्यायमूर्ती अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली एका सदस्यसमिती गठीत आली आहे. परंतु बदर समितीने ३ महिन्यात अहवाल सादर करणे अपेक्षित होते, पण तसे झाले नाही. पुन्हा या समितीला मुदतवाढ देण्यात आल्याचे समजते. मुदतवाढ दिली असली तरी सुद्धा मे २०२५ पर्यंत या समितीने जलद गतीने अभ्यास करून वर्गीकरणाचा अहवाल सादर करणे अपेक्षित आहे. तसेच आरक्षण उपवर्गीकरण होत नाही तोपर्यत जूनमध्ये होणारी नोकर भरती सरकारने करू नये किंवा त्या स्थगिती द्यावी व ...पान ६ वर

# सारशी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी आरती ठाकरे यांची बिनविरोध निवड



**वाडा/प्रतिनिधी**

वाडा तालुक्यातील प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या सारशी मालोंडे ग्रामपंचायतीच्या उपसरपंच पदी आरती अनिल ठाकरे यांची निवड करण्यात आली. मावळत्या उपसरपंच उज्वला बांगर यांनी आवर्तन पद्धतीनुसार राजीनामा दिल्याने त्यांच्या रिक्त जागी उपसरपंच पदाच्या निवडीसाठी गुरुवारी (दि.२० ) दुपारच्या सुमारास ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच ड. दिनेश कोदे यांच्या अध्यक्षतेखाली सदस्यांची बैठक बोलविण्यात आली. यावेळी उपसरपंच पदासाठी आरती अनिल ठाकरे यांचा निर्धारित वेळेत एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने ...पान ६ वर

# गावाच्या विकासासाठी महिलांनी सरपंच व कार्यकारणीला साथ द्यावी -धामणकर



**वाडा/प्रतिनिधी**

आबिटघर ग्रामपंचायत आयोजित सरपंच साक्षी साठे यांच्या संकल्पनेतून आबिटघर ग्रामपंचायतीच्या प्रांगणात साकार झालेल्या भव्य दिव्य महिला मेळाव्यात मुख्य मार्गदर्शिका म्हणून बोलत असताना सिने अभिनेत्री रसिका धामणकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना गावाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी ग्रामपंचायत कार्यकारिणींला साथ दिली तर गावाचे नक्कीच नंदनवन होईल असे उद्गार काढले. ग्रामपंचायत आबिटघर सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत असते. गावच्या स्थानिक समस्या असोत अथवा अडचणीची सोडवणूक करत असतानाच महिलांना देखील ग्रामविकासाच्या कार्यात समाविष्ट करण्याहेतू सरपंच साक्षी साठे, उपसरपंच सुप्रिया पाटील यांनी आपल्या संपूर्ण कार्यकारणी अर्थात सर्व सन्माननीय सदस्यां सोबत महिला मेळाव्याचे दिमाखदार आयोजन करून प्रारंभ कला ...पान ६ वर